| 6. | भारती बुंदे |

श्री.प्रफुल गुडधेः— मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या स्थायी समिती व इतर सर्व विशेष समित्यावर नामनिर्देशित सदस्यांना नियुक्त करता येते काय?

निगम सचिवः— मा.महापौरजी, कायद्यामध्ये त्यांना तसे प्रतिबंध नाही. परंतु त्यांना व्होटिंगचे अधिकार राहणार नाही. नामनिर्देशित सदस्यांना महापौर किंवा कोणत्याही समितीचा सभापती म्हणून निवडून येण्याचा हक्क असणार नाही.

श्री.प्रफुल गुडधेः— मा.महापौरजी, याबाबत नियमावली तपासून जोपर्यंत ती नियमावली निश्चित होत नाही तोपर्यंत नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती विशेष समितीवर स्थगित ठेवावी ही मा.महापौरजी यांना माझी विनंती आहे.

निगम सचिवः— मा.महापौरजी, कायद्यामध्ये पालिका सदस्यांची डेफिनेशन दिलेली आहे. पालिका सदस्य म्हणजे 1. महानगरपालिकेचा सदस्य म्हणून रितसर निवडून आलेला व्यक्ति त्यामध्ये ज्याला महानगरपालिकेच्या कोणत्याही सभेमध्ये मत देण्याचा आणि 2. महानगरपालिकेचा महापौर म्हणून व महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सभापती म्हणून निवडून येण्याचा हक्क असणार नाही. अशा सदस्यांचा त्यामध्ये समावेश होतो.

श्री.प्रफुल गुडधेः— मा.महापौरजी, आमचा या विषयाला आक्षेप नोंदविण्यात यावा.

महापौरः— स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा.सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|

| | |
|---|---|
| 1. | अभय गोटेकर |
| 2. | किशोर वानखेडे |
| 3. | विद्या मडावी |
| 4. | सोनाली कडू |
| 5. | पल्लवी शामकुळे |
| 6. | ज्योती भिसीकर |

महापौरः– वैद्यकीय सहाय्य व आरोग्य विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा. सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | विरेंद्र कुकरेजा |
| 2. | लहूकुमार बेहते |
| 3. | नागेश सहारे |
| 4. | लिला हाथीबेड |
| 5. | विशाखा बांते |
| 6. | सरीता कावरे |

महापौरः–विधी व सामान्य प्रशासन विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा.सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | धरमपाल मेश्राम |
| 2. | मिनाक्षी तेलगोटे |
| 3. | जयश्री वाडीभस्मे |
| 4. | शकुंतला पारवे |
| 5. | सुमेधा देशपांडे |
| 6. | मनिषा धावडे |

महापौरः– शिक्षण विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा.सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | दिलीप दिवे |
| 2. | प्रमोद तभाने |
| 3. | रिता मुळे |
| 4. | स्वाती आखतकर |
| 5. | सुषमा चौधरी |
| 6. | प्रमिला मंथरानी |

महापौरः– गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाजकल्याण विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा.सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | लक्ष्मी यादव |
| 2. | उषा पॅलट |
| 3. | भाग्यश्री कानतोडे |

| | |
|---|---|
| 4. | अनिल गेंडरे |
| 5. | ऋतिका मसराम |
| 6. | प्रमोद कौरती |

महापौरः— क्रिडा विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा.सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | प्रमोद चिखले |
| 2. | सुनिल हिरणवार |
| 3. | सरला नायक |
| 4. | कांता लारोकर |
| 5. | नेहा वाघमारे |
| 6. | मनिषा कोठे |

महापौरः— महिला व बालकल्याण विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा.सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | संगीता गि—हे |
| 2. | विशाखा मोहोड |
| 3. | दिव्या धुरडे |
| 4. | मंगला खेकरे |
| 5. | मनिषा अतकरे |
| 6. | नसीम बानो |

महापौरः— जलप्रदाय विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा.सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | विजय झलके |
| 2. | भगवान मेंढे |
| 3. | महेश महाजन |
| 4. | दिपक चौधरी |
| 5. | गोपीचंद कुमरे |
| 6. | जयश्री रारोकर |

महापौरः— कर आकारणी व कर संकलन विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा. सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | संदीप जाधव |
| 2. | सुनिल अग्रवाल |
| 3. | महेंद्र धनविजय |
| 4. | रेखा साकोरे |
| 5. | शिल्पा धोटे |
| 6. | उज्वला शर्मा |

महापौरः— अग्निशमन व विद्युत विशेष समितीकरिता भारतीय जनता पार्टीतर्फे खालील 6 मा.सदस्यांची नियुक्ती झालेली आहे.

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | संजय बालपांडे |
| 2. | निशांत गांधी |
| 3. | वंदना भुरे |
| 4. | वनिता दांडेकर |
| 5. | संदीप गवई |
| 6. | भारती बुंदे |

महापौरः— मा.सत्तापक्ष नेते, यांच्या तर्फे विशेष समितीकरिता आलेली नावे समिती सदस्य म्हणुन नियुक्त झाल्याची घोषणा करते. या सभागृहात ज्या मा.सदस्यांची नियुक्ती विशेष समितीकरिता झालेली आहे त्यांचे मी अभिनंदन करते. या विषयाला भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचा आक्षेप नोंदवून दहा विशेष समिती गठीत करण्याचा विषय बहुमताने मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मान्यता प्रदान केली.

1.स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | अभय गोटेकर |
| 2. | किशोर वानखेडे |
| 3. | विद्या मडावी |
| 4. | सोनाली कडू |
| 5. | पल्लवी शामकुळे |
| 6. | ज्योती भिसीकर |

2. वैद्यकीय सहाय्य व आरोग्य विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | विरेंद्र कुकरेजा |
| 2. | लहूकुमार बेहते |
| 3. | नागेश सहारे |
| 4. | लिला हाथीबेड |
| 5. | विशाखा बांते |
| 6. | सरीता कावरे |

3. विधी व सामान्य प्रशासन विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | धरमपाल मेश्राम |
| 2. | मिनाक्षी तेलगोटे |
| 3. | जयश्री वाडीभस्मे |
| 4. | शकुंतला पारवे |
| 5. | सुमेधा देशपांडे |
| 6. | मनिषा धावडे |

4. शिक्षण विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | दिलीप दिवे |

| | |
|---|---|
| 2. | प्रमोद तभाने |
| 3. | रिता मुळे |
| 4. | स्वाती आखतकर |
| 5. | सुषमा चौधरी |
| 6. | प्रमिला मंथरानी |

5. गलिच्छ वस्ती निर्मुलन, घर बांधणी व समाजकल्याण विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | लक्ष्मी यादव |
| 2. | उषा पॅलट |
| 3. | भाग्यश्री कानतोडे |
| 4. | अनिल गेंडरे |
| 5. | ऋतिका मसराम |
| 6. | प्रमोद कौरती |

6. क्रीडा विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | प्रमोद चिखले |
| 2. | सुनिल हिरणवार |
| 3. | सरला नायक |
| 4. | कांता लारोकर |
| 5. | नेहा वाघमारे |
| 6. | मनिषा कोठे |

7. महिला बालकल्याण विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | संगीता गि–हे |
| 2. | विशाखा मोहोड |
| 3. | दिव्या धुरडे |
| 4. | मंगला खेकरे |
| 5. | मनिषा अतकरे |
| 6. | नसीम बानो |

8. जलप्रदाय विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | विजय झलके |
| 2. | भगवान मेंढे |
| 3. | महेश महाजन |
| 4. | दिपक चौधरी |
| 5. | गोपीचंद कुमरे |
| 6. | जयश्री रारोकर |

9. कर आकारणी व कर संकलन विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | संदीप जाधव |
| 2. | सुनिल अग्रवाल |
| 3. | महेंद्र धनविजय |
| 4. | रेखा साकोरे |
| 5. | शिल्पा धोटे |
| 6. | उज्वला शर्मा |

10. अग्निशमन व विद्युत विशेष समिती

| अनु क्र. | मा.सदस्याचे नाव |
|---|---|
| 1. | संजय बालपांडे |
| 2. | निशांत गांधी |
| 3. | वंदना भुरे |
| 4. | वनिता दांडेकर |
| 5. | संदीप गवई |
| 6. | भारती बुंदे |

ठराव क्र.380ः— नागपूर महानगरपालिकेच्या दिनांक 20.02.2018 चे सर्वसाधारण सभेत प्रश्न क्र. 66 मध्ये झालेल्या चर्चेनुसार मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये, प्रवर्तन विभागासंबंधित चौकशी मा. निगम आयुक्त यांचे स्तरावर करण्याचे निर्देश होते. मा. उपायुक्त (1) यांनी सादर केलेला चौकशी अहवाल (नस्तीत उपलब्ध प्रमाणे) सभागृहाच्या समक्ष सादर सादर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मागच्या सभेमध्ये जे निर्णय झाले त्याचा ए.टी.आर. पुढच्या सभेमध्ये सादर करण्याबाबत मा. महापौरजी यांचे निर्देश होते. त्यापैकी किती ए.टी.आर. ठेवण्यात आले आहे व कधीपर्यंत ठेवण्यात येतील. या मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी सुचविल्याप्रमाणे तसेच या विषयाच्या अनुषंगाने चौकशी अहवालाची प्रत सर्व मा.सदस्यांना उपलब्ध करून देण्यात यावी व पुढच्या सभेमध्ये या विषयावर चर्चा करण्यात यावी या मा.सदस्य श्री. प्रवीण दटके यांनी केलेल्या सुचनेनुसार अंमलबजावणी करण्यात येवून हा विषय पुढच्या सभागृहात सादर करण्यात यावा. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली

ठराव क्र.381ः — गणेश उत्सवा दरम्यान नागपूर शहरात मनपा द्वारे एकूण किती कृत्रीम टॅक लावण्यात आले. त्यांची एकूण संख्या किती? झोननिहाय लावण्यात आलेले कृत्रीम टॅकची जागा व त्यांची संख्या, कृत्रीम टॅकचे झोननिहाय अथवा शहर स्तरावर एकत्रित निविदा काढण्यात आल्या किंवा कोटेशन करण्यात आले किंवा कसे याबाबत माहिती तसेच सदर कामाचे कंत्राट शहर स्तरावर किंवा झोननिहाय कोटेशन एकाच कंत्राटदारास मिळाले किंवा कसे?

सदर कामाचे झोननिहाय प्राकलनाची माहिती व त्यात कंत्राटदारास कृत्रीम टॅक बनविण्या व्यतिरिक्त कोण कोणते काम करणे अपेक्षित होते. तसेच या संपूर्ण कामास कोणत्या हेडमधुन निधी उपलब्ध करण्यात आले. तसेच त्या संपूर्ण कामाचे देयके अदा झाली अथवा नाही. या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा करुन उचीत निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा. उपमहापौरजी यांच्या अध्यक्षतेखाली तीन मा.सदस्यांची चौकशी समिती नियुक्त करण्यात यावी. समितीमार्फत सादर केलेला चौकशी अहवाल पुढच्या सभागृहात ठेवण्यात यावा या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.382:– १)मनपाच्या लेखा शाखेमध्ये प्रतिनियुक्तीचे मनपाच्या आस्थापनेनुसार किती पदे आहेत. तसेच मनपाच्या लेखा शाखेत प्रतिनियुक्ती व्यतिरिक्त किती शासनाचे सेवानिवृत्त कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना नियुक्ती देतांना शासन निर्णयाच्या अधिन राहून नियुक्ती दिली काय? मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल जनहित याचीका क्र.८५/२००८ संदर्भातील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. आरईएम–१५०९/प्र.क्र.५८/२००९/१३ दि. १० जानेवारी २०१० तसेच महा. शासन साप्रवि, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७ डिसेंबर २०१६ शासनाच्या परिपत्रकानुसार अंमलबजावणी झाली काय?

२) मनपाच्या लेखा शाखे मध्ये पदोन्नतीच्या पदावर वेतन श्रेणी ९३००–३४८०० ग्रेड वेतन ४४०० या पदांवर लेखा शाखेत मनपाचे अंदाजपत्रकीय अधिकारी, लेखाधिकारी व निगम लेखापरिक्षक हे पदे असंताना मनपाच्या या पदांवर मनपाचे कर्मचारी वगळून शासनाचे वित्त विभागाचे श्री. जितेंद्र राऊत यांची लेखाधिकारी या पदावर ग्रेड वेतन ५४०० व ४६०० यांची या पदावर पदस्थापना का करण्यात येत आहे?

३) दि. २०/०७/२०१८ च्या वित्त विभागाचे विनंती बदल्याच्या आदेशामध्ये श्री. राजू नत्थूजी शेंडे यांची नागपूर महानगरपालिकेत त्यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाच्या वित्त विभागाने मनपामध्यें पद रिक्त आहे/नाही याची खातरजमा न करता बदली केल्यामुळे त्याची मनपामध्ये कोणत्या पदावर पदस्थाना करण्यात येईल? किंवा श्री. राऊत किंवा श्री. कावळे यांचे जागेवर त्यांना पदस्थाना देण्यात येणार काय? या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा करुन उचीत निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "1 (जे)" प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा. सदस्यांनी नोटीस परत घेण्याचे सुचविल्याप्रमाणे याची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

ठराव क्र.383: –नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत किती तलाव असून त्या तलावांची नावे काय? या तलावांची देखभाल करण्याची जबाबदारी कोणत्या विभागाकडे सोपविण्यात आली आहे. सध्या स्थितीत या तलावांची स्थिती कशी आहे. या तलावाचे अस्तित्व कायम राहण्यासाठी महानगरपालिकेकडुन कोणती उपाय योजना तयार करण्यात आली आहे. या संदर्भात सविस्तर चर्चा करुन उचीत निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "1 (जे)" प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

++ ++ ++ ++

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, मै पढके बताता हुँ मेरा प्रश्न क्या है. नागपूर महानगरपालिका सिमेअंतर्गत किती तलाव असून त्या तलावाचे नावे काय? या तलावाची देखभाल करण्याची जबाबदारी कोणत्या विभागाकडे सोपविण्यात आली आहे. सद्यस्थितीत या तलावाची स्थिती कशी आहे. या तलावाच्या अस्तीत्व कायम करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात प्रश्न आहे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, नागपूर शहरात एकुण 13 तलाव असून त्यांचे नावे खालीलप्रमाणे आहे. पुर्व नागपूर सक्करदरा,पार्डी,पश्चिम नागपूरमध्ये सोनेगाव, अंबाझरी, फुटाळा, पांढराबोळी,गोरेवाडा, पोलीस लाईन टाकळी, मध्य नागपूर मध्ये गांधीसागर, लेंडी तलाव, नाईक तलाव, बिनाकी मंगळवारी असे एकुण 13 तलाव आहे. या तलावाचे रखरखाव, देखभाल, व स्वच्छता करण्याचे काम आरोग्य विभागाचे आहे. व संबंधित पी.डब्लु.डी. विभागामार्फत करण्यात येत आहे. या तलावाचे अस्तीत्व कायम राहण्यासाठी महानगरपालिकेकडुन कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. त्या तलावाच्या पुनर्जिवनासाठी मास्टर प्लॅन तयार करण्यात आलेला आहे. तलावाच्या पुनर्जीवनासाठी गांधीसागर, पांढराबोळी, अंबाझरी, फुटाळा, नाईक तलाव, लेंडी तलाव यांचे विस्तृत प्राकलन राज्य व केंद्र शासनाला सादर करण्यात आले आहे. एस.एन.सी.टी. अंतर्गत महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाला सरोवरांसाठी प्रस्ताव सादर करण्यात येतात. महाराष्ट्र शासनाने 2010 साली खालील सरोवरांच्या पुर्नजीवनाकरीता मंजुरी प्रदान केलेली असून छाननी झालेली आहे. सोनेगाव तलाव 2010 मध्ये गांधीसागर तलाव 2010 मध्ये, पांढराबोळी 2014, झालेले आहे. नाईक तलावाचे सुधारीत प्राकलन 2.89 कोटी राज्य शासनाला सादर केला आहे. लेंडी तलावाचे अतिक्रमण काढण्याची कारवाई संबंधित झोन मार्फत अपेक्षित आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, यह 13 तलाव मे से कौनसे तलाव का पानी नागपूर शहर की जनता को पिने के उपयोग मे लाता है।

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी,अंबाझरी तलावाचे पाणी एम.आय.डी.सी. वाडी, या भागात देण्यात येते.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, शहराच्या बाहेरचे नाही आम्ही शहराच्या आतमधली महानगरपालिका क्षेत्रातील गोष्ट करीत आहे.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय):–मा.महापौरजी, महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही तलावाचे पाणी वापरल्या जात नाही.

श्री.कमलेश चौधरी:– मा.महापौरजी, गोरेवाडा तलावाचे पाणी आपण पिण्याच्या पाण्यासाठी वापरत आहे. मा.महापौरजी, आपल्या अधिकाऱ्यांना माहिती नाही आहे. ही परिस्थिती आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, आपल्या संबंधित अधिकाऱ्याने जी माहिती दिली आहे ती अत्यंत चुकीचे आहे. गोरेवाडा तलावाचे पाणी आपण पिण्यासाठी उपयोगात आणतो. चुकीची माहिती सभागृहात अधिकाऱ्यांनी देवु नये.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, एकुण शहरात 13 तलावापैकी ज्या तलावामधुन आपल्याला पाणी पिण्यासाठी वापरता येत असेल, किंवा येत नसेल तर याची माहिती देण्यात यावी. मा.महापौरजी, खाजगीकरणातुन आलेले जे पोकलॅन आहे त्या पोकलॅन ने नदी नाल्याची सफाई चालु आहे. ही जी पेपर ला न्युज आलेली आहे की 3 पोकलॅन गोरेवाडा तलावाजवळ उभे आहे. त्यांना ड्रायव्हर मिळाले नाही मिळाले, डिझेल मिळाले की नाही मिळाले, त्या तलावाचे आपण खोलीकरण करणार आहे काय?

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, गोरेवाडा तलावाच्या गेटवर काम करण्यासाठी 5 दिवसापासुन जेसीबी उभा आहे आणि प्रशासन झोपले आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, गोरेवाडा तलाव की गहराई बढाने के लिये जेसीबी खडी है।

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑडर, सभागृह मे चर्चा किसके प्रश्न पर शुरु है। पहले उसका प्रश्न पुरा हो जाने दे।

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, दयाभैय्या जो बोल रहे है उसके मत से हम सहमत है। अगर अधिकारी को मालुम नही होंगा की कौनसे क्षेत्र के अंदर पानी की किस प्रकार से समस्या है। अगर अधिकारी इस चिजों से अवगत नही है।

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, मेरा पहला प्रश्न यह था की हम 13 तालाब मे से नागपूर शहर की जनता कौनसे तालाब का पानी पिलाते है। और आज नवभारत मे आया है की गोरेवाडा के गेट मे 5 दिनों से पोकलॅन खडी है। उसका 900 रु प्रति घंटा किराया है। अपना जो 5 दिनों का नुकसान हुआ है इसका कौनसा अधिकारी भरपाई देंगा।

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, नागपूर शहरात गोरेवाडा तलावाचे पाणी पिण्याकरीता वापरल्या जाते. तेथे नवेगाव खैरी मधुन पाणी देतो.

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, आजकी की स्थिती मे गोरेवाडा तालाब मे कितना पानी है।

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, आज गोरेवाडा तलावामध्ये किती क्वॉन्टीटी पाणी उपलब्ध आहे त्या संदर्भात माहिती नाही.

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, जो अधिकारी को जानकारी है वह अधिकारी ने जवाब देने को होना। अगर गोरेवाडा तालाब पुरा भरा रहा तो 7 दिन नागपूर शहर की जनता को पानी पुरता। नागपूर शहर की जनता को पानी देने के लिये गोरेवाडा तालाब मे कितना पानी है। खैरी का पानी अभी गोरेवाडा तालाब मे जा रहा क्या इसके संदर्भ मे जानकारी दिजीये।खैरी का पानी गोरेवाडा तालाब मे आ रहा क्या ?

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, गोरेवाडा तालाब मे केवल 1 दिन का पानी बचा है।

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, सन्माननिय सदस्यांनी विचारले आहे की, गोरेवाडा तालावामध्ये किती पानी आहे. तेथील वस्तुस्थिती काय आहे, खैरी वरुन पाणी गोरेवाडा तलावामध्ये येते की डायरेक्ट पंम्पीगवर जाते.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, गोरेवाडा तालाब मे पानी नही है। वहापर खैरी का पानी आता है। खैरी मधुन डायरेक्ट पंम्पींग मध्ये पाणी येते.

(बेल)

श्रीमती आभा पांडे :– मा.महापौरजी, पाण्यासंदर्भातील विषय जर मा.सदस्यांनी नोटीस लावला आहे

तर सर्व प्रश्नांची उत्तरे प्रशासनाला दयायला सांगावे. जर तुम्हीच असे म्हणाल की झालं का उत्तर, मिळाले काय उत्तर तर मग तुमच्या राज्यात प्रशासन कसे राहणार आहे.

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्रीमती बॅनर्जी) :– आदरनिय, महापौर महोदया, जो पहला प्रश्न है की गोरेवाडा मे कितना पानी है। तो खुद का गोरेवाडा मे पानी आज के डेट में कुछ भी नही है। जो नवेगाव खैरी से गोरेवाडा मे आता है। जो हम डेली उचल करते है एक्झीस्टींग गोरेवाडा मे आज की डेट मे। नवेगाव खैरी आज की डेट मे 473 एम.एल.डी. पंम्पींग कर रहे है। कंटीन्युव पंम्पींग चालु है। कल 473 एम.एल.डी. था अभी तक 200 एम.एल.डी. हुआ होंगा। तलाव मे पानी अभी कॅनल से आना चालु है।

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, ज्या नवेगाव खैरीचे पाणी गोरेवाडा तलावामध्ये येत आहे ते नागपूर शहरातील किती भागामध्ये पाणी पोहचत आहे त्या संदर्भात माहिती देवु शकता काय?

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्रीमती बॅनर्जी) :– आदरनिय, महापौर नागपूर शहर मे 730 एम.एल. डी. पानी देते थे । लेकीन आज की जो कंडीशन है 270 या 280 तक पानी देते है। 400 एम.एल.डी कम है।

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, मेरा प्रश्न यह था की जितना भी पानी आ रहा है उसमे से कितना पानी कितने भाग मे पोहच रहा है। और आप पुरे शहर को दे पा रहे क्या? की नही दे पा रहे है ।

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्रीमती बॅनर्जी) :– मा.महापौरजी, हम पुरे शहर मे पानी देने की कोशीश कर रहे है। ट्रिपिंग की वजह से कही कही पानी नही भी जा सकता है।

श्री.संदीप सहारे :– मा.महापौरजी, पुर्ण पश्चिम नागपूरात 24 तास पाणी आहे. (बेल)

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री.हरीश ग्वालबंशी यांच्या प्रश्नाचे समाधान होवु दया, नंतर आपण पुढील प्रश्न पुकारा.

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, अपना शहर बढ रहा है। आनेवाले समय मे जमिन का जलस्तर कम होते जा रहा है। यह मानविक विषय हैं। आज नवभारत पेपर मे आया है की, गोरेवाडा के गेट पर 5 दिन से जे.सी.बी. खडा है यह बात सही है क्या?

कार्यकारी अभियंता, जलप्रदाय (श्रीमती बॅनर्जी) :– मा.महापौर महोदया, जे.सी.बी. 5 दिन से खडी है यह नही पता लेकीन मेरे यहा 2 दिन पहले परवानगी के लिये आया था। लेकीन परवानगी हमारी तरफ से नही है, परमीशन फॉरेस्ट को देना था, उसके बारे मे फॉरेस्ट वालों से चर्चा की अभी जे.सी.बी. वालों को दुसरे रस्ते से जाने के लिये बताया। तो कल 2 जे.सी.बी. दुसरे रस्ते से जाने के लिये तैयार हो गये।

महापौर :– फॉरेस्ट ऐरिया असल्यामुळे तेथे विना परवाना जावु शकत नाही.

श्री.हरीश ग्वालबंशी :– मा.महापौरजी, 900 रुपये घंटे से जेसीबी. का किराया है। वह जेसीबी 5 दिन से वहापर खडा है। उसका जो नुकसान हुआ वह किससे वसुल करेंगे।

महापौर :– जे.सी.बी. ला पैसे दिलेले नाही. सर्व माहिती तुम्ही कार्यकारी अभियंता यांच्याकडुन घेवुन घ्यावी.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, सभागृह मे मुल प्रश्न कौनसा पुछा गया। सभागृह मे यह पुछा गया की, नागपूर शहर मे कितने तालाब है। और तालाब की देखरेख और दुरुस्ती की जिम्मेदारी किसकी है। अभी जिस विषय पर हम चर्चा कर रहे है। उसेसे संलग्न नही है। यह प्रश्न 12 वे महिने मे डिसेंबर मे पुछा गया है। आज गोरेवाडा के दरवाजेपर जेसीबी खडा है यह प्रश्न भी इससे संलग्न नही है। मा.महापौरजी, हमारा जो मुल विषय है उसपर चर्चा करते हुअे अगर सभागृह का समय जाया करेंगे तो यह सही बात नही है।

वरील चर्चेनंतर नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत किती तलाव असून त्या तलावांची नावे काय? या तलावांची देखभाल करण्याची जबाबदारी कोणत्या विभागाकडे सोपविण्यात आली आहे. सध्या स्थितीत या तलावांची स्थिती कशी आहे. या तलावाचे अस्तित्व कायम राहण्यासाठी महानगरपालिकेकडुन कोणती उपाय योजना तयार करण्यात आली आहे. या संदर्भात सविस्तर चर्चा करुन उचीत निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून या विषयाच्या संदर्भात संपुर्ण माहिती कार्यकारी अभियंता जलप्रदाय यांनी सादर करावी या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.384:– नागपूर सुधार प्रन्यासने, नागपूर महानगरपालिकेला 572 अभिन्यासातील 176 व तद्नंतर 233 अभिन्यास नागरी सुविधाची देखभाल/दुरुस्तीसाठी ना.सु.प्र. ठराव क्र. 40/1094 दि. 08.03. 2011 अन्वये अभिन्यासे हस्तांतरीत केलेली आहे. त्यांनुषंगाने आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी दिनांक 18.11.2011 ला 572 पैकी 176 व 233 अभिन्यास मनपाने हस्तांतरीत करुन घेतले आहे. परंतु विश्वस्त मंडळाने वरील संपूर्ण बाबींची नोंद घेऊन महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम 2001 अन्वये नियमित केलेल्या व विकसित केलेल्या 154 अभिन्यासातील नागरी सुविधांची देखभाल/दुरुस्तीसाठी व या अभिन्यास उपलब्ध असलेल्या मोकळया जागेसह अभिन्यास आहे. त्या स्थितीत नागपूर महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यास मंजुरी दिली असून या अभिन्यासांपैकी 176 अभिन्यास महानगरपालिकेने हस्तांतरीत करुन घेतले असून 233 व 154 ला महानगरपालिकेकडुन मंजुरी देण्यात आली नाही. या अभिन्यासात विकास कामे करण्याकरिता होत असलेल्या अनियमिततेवर चर्चा करण्याकरिता या संदर्भात सविस्तर चर्चा करुन उचीत निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून त्यास एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.385: – मनपाच्या अधिनियमाप्रमाणे 5 लाखाच्या खालच्या झोन अंतर्गत सर्व कामाच्या नस्त्या झोन सभापती मार्फत मंजुरीसाठी पाठविण्याची तरतूद असून झोन सहा. आयुक्त कोणत्या नियमानुसार झोन अंतर्गत 3 लाखाच्या कमी रक्कमेच्या कामाच्या फाईल्सला मंजुरी प्रदान करतात. या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा. सदस्यांनी नोटीस परत घेण्याचे सुचविल्याप्रमाणे याची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

महापौर :– 2 वाजायला 10 मिनीटे कमी आहे. 1 तास आपण प्रश्नावर चर्चा करु.

प्रश्न क्र 144:– नागपूर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय वर्ष 2015–16, 2016–17 व 2017–18 चे लेखा परीक्षण संदर्भात,

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, ऑडीटच्या संदर्भात माझा प्रश्न होता. थर्ड पर्सन ऑडीट होणार असेल तर ती समिती चालु आहे की डिझ्ॉल झाली या संदर्भात माहिती देण्यात यावी किंवा चालु वर्षाच्या विकास कामाच्या ज्या नस्त्या आहे. ज्याचे बिल जमा होतात ते महालेखापरिक्षण व्दारा त्वरीत लेखापरिक्षण करण्यात येतील काय? असा प्रश्न आहे. जर ते होत असतील तर त्यांनी सांगावे.

अति.आयुक्त(श्री.शेख) :– मा.महापौर महोदया, महानगरपालिकेच्या अकाउंटचे दोन एजन्सीव्दारे ऑडीटींग होत असते. एक जे आहे ते लोकल फंड ऑडीट सेल आपण त्याला म्हणतो. ते 100 टक्के ऑडीट करते आणि दुसरे ए.जी. विभागातर्फे ऑडीट केल्या जाते. अकाउंट जनरल यांच्या मार्फत. तर स्थानिक फंड ऑडीट सेल तर्फे सन 2014–15 चे लेखापरिक्षण झालेले आहे. 2015–16 चे परिक्षण चालु आहे. आणि ए.जी. मार्फत 2016–17 चे ऑडीटींग झालेले आहे. आणि 2017–2018 चे चालु आहे. ऑडीटच्या वेळी ऑडीट टिम आपल्याकडे येते ते आपल्याला ज्या ज्या वर्षातील आपल्याकडे जे डॉक्युमेंट मागतात ते आपण त्यांच्याकडे देतो. आणि जसे मी आपल्याला सांगितेल की लोकल फंड ऑडीट जे आहे ते 100 टक्के ऑडीट असते. प्रत्येक महिन्याचे ते ऑडीट करते त्यामुळे आपले जे म्हणणे आहे की त्याचे ऑडीट केले जाते काय? तर ते केले जाते.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, थर्ड पर्सन ऑडीट जिवंत आहे की की डिझ्ॉल झालेले आहे.

अति.आयुक्त(श्री.शेख) :– मा.महापौर महोदया, थर्ड पर्सन ऑडीट आपण प्रत्येक याच्यात करीत नाही. काही प्रकरणामध्ये ज्यामध्ये आपल्याला गरज असते त्या मध्ये आपण टेक्नीकल ऑडीट किंवा थर्ड पार्टी ऑडीट आपण त्यामध्ये करीत असतो.

श्री.मनोज सांगाळे :– मा.महापौरजी, थर्ड पार्टी ऑडीट किती किंमतीच्या वर होते 25 लाख, 1 करोड की, 1 करोडच्या वर होते, कारण की आम्ही इतकी कामे केले. एन.आय.टी ची जमिन होती त्यावर आम्ही पैसे खर्च केले 60 लाख रुपये आणि ते आणि ते बांधकाम तोडण्यात आले. खाजगी मालकाने ज्याला एन.आय.टी. ने फुटबॉल ग्रांउंड च्या नावाने सहयोग नगरचे मैदान दिले होते. त्यांनी कोणत्याही विभागाची परवानगी न घेता त्या स्केटींग ग्राउंडची मोडतोड करण्यात आले आणि जे मटेरियल होते त्याची पण कुठेतरी विल्हेवाट लावण्यात आली. आणि त्याची रिपोर्ट तयार केली त्यामध्ये ते फक्त पावने आठ लाख रुपये खर्च दाखवित आहे. आणि आमचा करोडो रुपयांचे कामे आहे. त्यामध्ये थोडीशी शंका निर्माण झाली. त्यामुळे मी विचारत आहे. जेणेकरुन कर्मचारी आणि नगरसेवक हा त्या ऑडीटमध्ये

फसायला नको. ती नुकसान भरपाई आणि पोलीसचा जो रिपोर्ट झालेला आहे त्याबाबत काय करवाई झाली हे पुढच्या वेळेस विचारु, थर्ड पर्सन ऑडीट 25 लक्षापेक्षा जास्त की करोड रुपयांपेक्षा जास्त, थर्ड पार्टी ऑडीट आतापर्यत किती केले आहे.आणि करणार आहे त्याची माहिती पाहिजे. माझ्या प्रभागात कामे सुरु आहे 27 करोडचे, साडेतीन करोडचे 2 करोडचे याचे ऑडीट करणार आहे काय?

अति.आयुक्त(श्री.शेख) :— मा.महापौर महोदया, थर्ड पार्टी ऑडीट आणि टेक्नीकल ऑडीट या संदर्भात या ठिकाणी विचारले आहे. या प्रकरणाची संपुर्ण माहिती संकलित करून मा.सदस्यांना पुरविण्यात येईल.

प्रश्न क्र 145:— नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत बाजार विभागाद्वारे भाडे तत्वावर देण्यात आलेले मनपा मालकीची जागा/गाळे संदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः—वितरीत केल्याप्रमाणे

प्रश्न क्र 146:— आसीनगर झोन अंतर्गत जी.एम. बनातवाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेची इमारत बनवून तयार असून तिथे किरायाच्या घरात सुरु असलेली शाळा स्थानांतरीत संदर्भात प्रश्नाबाबत

श्री.मो.इब्राहीम तौफीक अहमद :— मा.महापौरजी, मेरा प्रश्न था बनातवाला स्कुल अंग्रेजी माध्यम जो बनकर तैयार है। वह अभी तक ट्रान्सफर क्यौ नही हुयी।

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, जी.एम.बनातवाला शाळा ही पुर्ण इमारत बनुन तयार आहे आणि किरायाच्या घरी ते चालु आहे. त्या इमारतीमध्ये किरायाच्या घरात चालणारी जी शाळा आहे ती त्या इमारतीमध्ये स्थानांतरीत का करण्यात येत नाही याची माहीती मा.सदस्यांनी विचारली आहे त्या संदर्भात माहिती दयावी.

उपायुक्त (श्री.मोहिते) :— मा.महापौरजी, बनातवाला शाळेमध्ये 8वी, 9वी आणि 10 वी स्थानंतरीत झालेली आहे. या चालू शैक्षणिक वर्षामध्ये 1 ली ते 7 वी पर्यत नविन इमारतीमध्ये शाळा भरणार आहे.

श्री.मो.इब्राहीम तौफीक अहमद :— मा.महापौरजी, 26 तारीख से स्कुल चालु होने वाली है तो अब कर करेंगे।

उपायुक्त (श्री.मोहिते) :— मा.महापौरजी, या शालेय शिक्षण वर्षात करणार आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :— मा.महापौरजी, या इमारतीचे भाडे 1,27,856 रुपये भाडे महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येत आहे. ही जागा कोणाच्या अखत्यारित आहे आणि कोणाला देत आहे. ज्या नविन इमारतीवर मनपा व्दारे 4 करोड रुपये खर्च करुन ती सर्व सोयीयुक्त इमारत तयार केली. आणि ते शिफ्टींग करण्याकरीता वर्षानुवर्षाचा कालावधी का लागत आहे. त्या संदर्भामध्ये मी तुम्हाला प्रश्न विचारला होता 19/12/2018 ला त्यानंतरही शिफ्टींगची कारवाई झाली नाही. सदर इमारत कोणाच्या कब्जात आहे. 1, 27,856 रुपये भाडे देत आहे. त्या ठिकाणी सहा.आयुक्त, शिक्षणाधिकारी ही जबाबदारी आपण कोणावर निश्चित करायची हे काम अद्याप पर्यत का झाले नाही. ही रक्कम कोणाकडुन वसुल करण्यात यावी जर इमारत तयार आहे तर हे भाडे आपण कोणत्या अधिकाऱ्याकडुन वसुल करण्यात यावे, या संदर्भात आम्ही प्रश्न दिला होता. मुद्या क्र 4 मध्ये नव्याने बांधकाम इमारतीची सुरक्षाभिंत तुटल्याचे दिसत आहे त्याचे लेखापरिक्षण करण्यात यावे. त्याचे सहानुभूतीपुर्वक उत्तर सुध्दा मा.सदस्यांना देण्यात आलेले नाही. मुद्या क्र 1 ते 4 हे लक्षात घेवुन आपण संबंधितांवर कारवाई करण्याचे पत्राव्दारे आपल्याला आदेश दिले होते. त्यावर अद्याप पर्यत कारवाई झालेली नाही. त्या इमारतीवर इतका खर्च तयार करुन सुसज्ज इमारत तयार केली असून परंतु ते कधी होणार आहे, आता जुन महिना सुरु आहे आणि आता वर्ग देखील सुरु होणार आहे यावर सविस्तर उत्तर आपण दयावे.

श्री.मो.इब्राहीम तौफीक अहमद :— मा.महापौरजी, 6 महिने के पहले मेरा प्रश्न था। 6 महिने मे करीब करीब 6 से 7 लाख रुपया जनता का पैसा वेस्ट हो गया, इसकी जबाबदारी किसकी है। 4 मजली इमारत बनके तयार है, वहापर स्कुल ट्रान्सफर क्यौ नही किये। वहापर एक आदमी दलाल है वह आपको निवेदन देते जा रहा है और आप आगे बढाते जा रहे है। हमारे संबंधित अधिकारी इसमे मुकबिल है। एक गरीब नवाज उर्दु स्कुल है, वह भी किराये की बिल्डींग मे चल रही है। जब वह स्कुल शुरु हुयी थी 2005 मे तो 2005 से 2012 तक उसका किराया था 17,613 रुपये और 2012 से 2018 तब 17 रुम है और आज भी 17 रुम है। वहापर कोई भी चिज बढी नही हैं हालाकी बच्चों की परेशानी बढी है। उस स्कुल मे पार्किंग के लिये जगह नही है। संडास बाथरुम नही है। दरवाजा नही है। दरवाजे तुटे हुये है, खिडकीया तुटी है, कॉच भी नही लगी है। स्कुलों की पेंटींग नही है और आज उसका किराया है 1

लाख 19 हजार, रुपया किराया है। 17 हजार रुपयों से किराया बढकर उसका किराया हो गया 1,19,400 रुपयों यह किस तरीके से हुवा इसकी मुझे जानकारी चाहियें।

उपायुक्त (श्री.मोहिते) :– मा.महापौरजी, मागिल शैक्षणिक वर्षाच्या मध्यामध्ये 8 वी, 9वी 10 वी आपण स्थानांतरीत केले होते. त्याचवेळी प्राथमिक शाळेचे शिष्टमंडळ अति.आयुक्त यांच्याकडे भेटले होते. त्यामध्ये मा.शिक्षण सभापती आणि मा.अपर आयुक्त यांची त्या ठिकाणी व्हीजिट झाली होती. आणि त्याच्या अडचणीवर मात काढत शिक्षणाच्या दृष्टीने व मुलांच्या दृष्टीने प्रश्न उपस्थित केले असल्यामुळे शिफ्टींग त्यावेळी राहिले होते. परंतु आता आपण ठोस भुमिका घेतली आहे आता 1 ली ते 10 वी चे शिफ्टींग या शैक्षणिक सत्रात करीत आहे.

श्री.मो.इब्राहीम तौफीक अहमद :– मा.महापौरजी, गरीब नवाज ऊर्दु स्कुल के बारे मे जवाब नही दिया है। इसके बारे मे मैने बताया की मनपा की स्कुल है। 17,613 रुपयों से किराया 1 लाख 19 हजार कैसे हो गया ?

अति.आयुक्त (श्री.राम जोशी):– मा.महापौरजी, सन्माननिय सदस्य, इस शैक्षणिक सत्र से नई इमारत मे बनातवाला स्कुल शुरु हो जायेंगा, हस्तांतरीत हो जायेगी। 8 से 10 वी तक पहले ही शिफ्ट हो चुका था। प्रश्नो मे गरीब नवाज स्कुल के बारे मे प्रश्न नही रहने के कारण हमने जवाब तैयार नही किया था। गरीब नवाज उर्दु स्कुल के संदर्भ मे आपकी भावना देखकर उसका जवाब हम लिखीत स्वरुप मे देंगे।

प्रश्न क्र 147:– मनपा स्लम मालकी हक्काचे पट्टे वाटप संदर्भात

श्री.जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, मनपा स्लम पट्टे वाटपाच्या संदर्भातला हा माझा प्रश्न होता. त्यातल्या त्यात अनधिकृत लेआउट या शहरामध्ये आहे. त्यामध्ये मा.प्रधानमंत्री योजनेअंतर्गत लोकांना घरे वाटपाचा सुध्दा जो प्रश्न आहे किंवा त्यांना जो अडीच लाखापर्यत लोन मिळत आहे. त्यात 572 व 1900 लेआउट या अंतर्गत नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळणे अशक्य झाले त्यासाठी नाममात्र शुल्क आकारुन त्यांना पट्टे देण्यात यावे. आणि एन.एम.सी. 2018 चा नविन नियम जो आलेला आहे. प्रकरण 117 या संदर्भात सन 2017 व 2018 अंतर्गत प्रधानमंत्री योजनेचा लाभ मिळण्यास पात्र ठरत असलेल्या व महसूल विभागाच्या अखत्यारीत सर्व प्रकारच्या शासकीय जमिनी व निमशासकीय जमिनीवर अतिक्रमण केलेल्या अतिक्रमन धारकांचे अतिक्रमन नियमाकुल करण्यासाठी हा नविन जी.आर. आलेला आहे त्या संदर्भात नागपूर शहरात किती झोपडपट्टी आहे आणि त्या झोपडपट्टीवर कोणाकोणाची मालकी आहे हे सर्वप्रथम आपण सांगावे.

अति.आयुक्त(श्री.शेख) :– मा.महापौर महोदया, नागपूर शहरामध्ये महानगरपालिकेच्या 15 झोपडपट्टया आहे. नझुलच्या अखत्यारितील आहे. एन.आय.टी. च्या अखत्यारीतील आहे. आपण जो प्रश्न केला आहे त्या संदर्भात प्रश्न केला आहे त्या सदंर्भात माहिती देतो. पंतप्रधान आवास योजनेमध्ये जो घटक 04 आहे. बी.एल.सी त्यामध्ये आपण या लोकांना बेनिफीट देवु शकतो. त्याचा डी.पी.आर. तयार करुन शासनाकडे ते पाठवू शकतो. मुद्या असा आहे की 572 आणि 1900 लेआउट आहे हे एन.आय.टी. च्या अखत्यारीतल्या आहे. यांचे नियमितीकरण एन.आय.टी मार्फेत केल्या जात आहे. आता बरेचसे लेआउट त्यांनी नियमित केले आहे. त्यानंतर ते इंडीव्हीजवल लोकांच्या नावाने रिलीज ऑर्डर काढतात. पण हे बघितल्यानंतर बेनीफीट देण्याची कार्यवाही करु शकतो. परंतु आपण हा जो मुद्या उपस्थित केला आहे की आर.एल. साठी आपल्याला त्यामध्ये वेळ लागतो आहे. त्यामध्ये आपल्याला असे करता येईल की जे लेआउट रेगुलराईज झालेली आहे एन.आय.टी मार्फेत त्या सर्व बेनीफीशरीज ला आपल्याला त्याचा लाभ देणे शक्य आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या पट्टे वाटपाचा जो प्रश्न आहे. आणि आपण अनेक वर्षापासुन नागपूर शहरामध्ये नागरिकांना पट्टे वाटपाच्या संदर्भामध्ये जन आंदोलने झाली आणि त्यावर शासनाने निर्णय देखील दिले की आम्ही पट्टे वाटप करु, एकीकडे पट्टे वाटपाच्या संदर्भात कोणाचा किती ताबा आहे.

अति.आयुक्त(श्री.शेख) :– मा.महापौर महोदया, पट्टे वाटपासाठी जे शासनाने जी.आर. काढलेला आहे त्यामध्ये मनपा ने बरीच फास्ट प्रक्रीया केलेली आहे. त्यामध्ये ज्या नझुलच्या जागा आहे किंवा महसुलच्या जागा आहे त्याचे सुध्दा सर्व्हेक्षण करण्याची शासनानी जबाबदारी दिलेली आहे. एन.आय.टी. च्या झोपडपट्टया आहे त्यावर जे सर्व्हेक्षण आहे ते एन.आय.टी. मार्फत केल्या जाते. त्याच्यासाठी एजन्सी

अपॉइंट केलेल्या आहे. महानगरपालिका आणि नझुलच्या जागा आहे त्याचे सर्वेक्षण आहे. त्यामध्ये महानगरपालिकेने ज्या एजन्सी नेमल्या आहे त्याच्यामार्फत सर्व्हेक्षण केल्या जाते. पट्टे वाटपाची प्रक्रीया आहे त्यामध्ये महानगरपालिकेच्या जागेवर महानगरपालिका करते, नझुलच्या जागेवर महसूल विभागामार्फत पट्टे वाटपाची प्रक्रीया केली जाते.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :— मा.महापौरजी, रेल्वे आणि नझुलची जागा असेल तर त्या ठिकाणी कोण पट्टेवाटप करतो. रेल्वेच्या जागेवर जे पट्टे धारक असतील किंवा नझुलच्या जागेवर पट्टेधारक असतील किंवा म्हाडाच्या जागेवर पट्टे वाटप असतील तर हा जो समन्वय पट्टे वाटपाच्या संदर्भात कोण घडवून आणतो.

अति.आयुक्त(श्री.शेख) :— मा.महापौर महोदया, सध्या तो जी.आर. निघालेला आहे. तो महानगरपालिकेची जागा, एन.आय.टी. च्या जागा आणि महसूलच्या जागा याच्या संदर्भातील जी.आर. निघालेला आहे. प्रायव्हेट जागा, डिफेन्सच्या जागा किंवा फॉरेस्टच्या ज्या जागा आहे त्यामध्ये जी.आर. निघालेला नाही.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :— मा.महापौरजी, मनपा आणि शासनाच्या वतीने शहरामध्ये मोठा गाजावाज केला जातो.

ॲड.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, याच्यामध्ये जे उत्तर प्रशासनाकडुन देण्यात येते की शहरामध्ये एकुण 426 झोपडपट्टया आहे. नागपूर महानगरपालिकेच्या झोपडपट्टया 15 आहे आणि एन.आय.टी. च्या माझ्या माहितीप्रमाणे नागपूर शहरामध्ये महाराष्ट्र शासन म्हणजे रेव्हेन्यु डिपार्टमेंटच्या पण आहे. ज्यामध्ये मिक्स मालकी आहे. त्यामध्ये एका झोपडपट्टीचे प्लेन टेबल सर्व्हेसाठी सांगितले होते स्लम विभागाला की तेथे मिक्स मालकी आहे. जर तेथे मिक्स मालकी आहे तर त्या ठिकाणी महानगरपालिका प्लेन टेबल सर्व्हे करु शकतील की नाही. आणि जर करु शकत असेल आणि आपण जो महाराष्ट्र शासनाचा जी.आर. सांगत आहे. तर त्या पध्दतीने त्यांचे पट्टेवाटप देखील महानगरपालिकेने का करु नये. म्हणजे फक्त एन.आय.टी.7 प्रोजेक्ट सोडले आणि ज्या एन.आय.टी. च्या मालकीच्या ज्या झोपडपट्टया आहे. त्याचे सर्व्हेक्षण आणि पट्टेवाटप नागपूर सुधार प्रन्यास ने करावे, पण एन.आय.टी.च्या व्यतिरिक्त नागपूर शहरातील ज्या ज्या नोटीफाईड झोपडपट्टया आहे. त्या सर्व झोपडपट्टयांचे प्लेन टेबल सर्व्हेक्षण आणि पट्टे वाटपाची प्रक्रीया ही महानगरपालिकेने करावी अशी विनंती करण्यासाठी उभा आहे.

श्री.जितेंद्र धोडेस्वार :— मा.महापौरजी, हा सर्व्हे करण्यासाठी महागनरपालिकेमध्ये किती स्टाफ आहे.

ॲड.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, प्लेन टेबल सर्व्हेक्षण करण्यासाठी माझ्या माहितीप्रमाणे आजपर्यंत 3 सर्व्हेक्षण एजन्सीज आहे. त्याच्यामध्ये आपल्याला जर आवश्यकता पडली तर आपण आणखी एजन्सीचे अपॉइंटमेंट करु शकतो. पण ही प्रक्रीया आपण पार पाडु शकतो की नाही हा मा.सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री.जितेंद्र धोडेस्वार :— मा.महापौरजी, नविन नविन एजन्सीच्या अपॉइंटमेंट करीत चला आणि नागपूरच्या जनतेचा पैसा तुम्ही त्या एजन्सीला देत चला. महानगरपालिकाने ठराव केला आहे त्या संदर्भात प्रशासन आणि शासनाने कुठली कारवाई करु नये. पट्टेवाटपाचा 2012 पासुन गाजावाजा केला जातो आहे. या शहरामध्ये 426 झोपडपट्टी शहरामध्ये आहे. आणि विविध शासनाच्या जागेवरती त्या झोपडपट्टी आहे. मग त्याचे प्लेन टेबल सर्व्हेक्षण अजुन पर्यत झालेले नाही. महानगरपालिकेकडे कर्मचारी नाही. ती जी एजन्सी आहे ती नियमानुसार सर्व्हेक्षण करीत नाही. ज्या ठिकाणी त्याचा पट्टा आहे त्यालाच तो पट्टा मिळणार आहे काय? त्यालाच ते नियमित करणार आहे काय?

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :— मा.महापौरजी, महाराष्ट्र शासनाने 17 नोव्हेंबर, 2018 ला शासन निर्णय घेतलेला आहे. त्या शासन निर्णयाअंतर्गत नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या जागेवर, म्हणजे शासकीय विभागाच्या जागेवर ज्या झोपडपट्टया आहे त्याचे अतिक्रमण नियमाकुल करुन त्यांना भाडेपट्टा अभिप्रेत आहे. त्यानंतर शासनानी 7 फेब्रुवारीला जी.आर काढला की स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मालकीच्या जागेवर असेल त्याकरीता नागपूर महानगरपालिकेनी भाडे पट्टा काढावे. त्यानंतर 6 मार्च, 2019 ला शासनानी दुसरा जी.आर. काढला. नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय जमिनीवरील वनविभाग वगळून झोपडपट्यांना भाडेपट्टा देण्यात यावे. सर्वेक्षण नागपूर महानगरपालिका करेल, परंतु भाडेपट्टा देण्याची जबाबदारी महसूल विभाग म्हटले तर जिल्हाधिकारी कार्यालयाला

सोपविलेली आहे.

श्री.जुल्फेखार भुट्टो :– मा.महापौरजी, भाडेपट्टा दे रहे है या लिजपर दे रहे है। क्योंकी पुरे शहर मे एकही चल रहा है की मालकी हक्क पर दे रहे है। उसका खुलासा यहापर करना चाहिये।

श्री.जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, ज्या जागेवरती पट्टेधारक म्हणुन त्याला अनुमती देणार आहे किंवा त्यांना डॉक्युमेंट देणार आहे. नागपूर शहरामध्ये 426 झोपडपट्टी आहे असे आपण सांगितले, म्हणजे 426 झोपडपट्टीमध्ये किती पॉप्युलेशन राहतो. किती असे पट्टेधारक आहे की तो मनपा ला टॅक्स देतो आहे. टॅक्स आकारणी केली आहे म्हणजे तेथून आपल्याला महसूल येत आहे. असे किती झोपडपट्टी आहे याचे उत्तर देखील आपण दयावे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :– मा.महापौरजी, लोकसंख्येच्या संदर्भात सध्या माहिती देवू शकणार नाही. परंतु एक सांगतो की नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमिनीवरील असलेल्या 50 झोपडट्टयांचे आपण सर्वेक्षण केले आहे. 13,822 चा डाटा आपण आणलेला आहे. त्यापैकी 4,487 नागपरिकांनी आपले पुर्ण डॉक्युमेंट दिले आहे. 17/06/2019 पर्यतचा रेकॉर्ड आहे. नागपूर शहरात 3 एजन्सी नियुक्त केली आहे. एकूण नागपूर शहरात 6 मतदार संघ आहे. 2 मतदार संघ याप्रमाणे तीन एजन्सी नियुक्ती केली आहे. त्याचा वर्कऑर्डर दिला होता 01/03/2019 ला सर्वेक्षण करण्याचा कालावधी दिला आहे 6 महिन्याचा त्यापैकी 3 महिन्याचा कालावधी म्हणजे ज्या शासकीय जमिनीवर आहे. नागपूर महानगरपालिकेच्या जागेवर असलेल्या 11 स्लमचा डाटा कलेक्ट केला आहे. आजपर्यत आपण 17000 स्ट्रक्चरचा डाटा कलेक्ट केला आहे. त्यामध्ये नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर असलेल्या 500 झोपडपट्टी धारकांना आपण भाडेपट्टा दिलेला आहे. सन्माननिय सदस्यांनी प्रश्न विचारला होता की हा भाडेपट्टा आहे की मालकी हक्काचा पट्टा आहे. शासनाने जो जी.आर. काढला आहे तो 30 वर्षाकरीता भाडेपट्टा देतो आहे. त्यानंतर शासनाचे जे काही निर्णय होतील, त्यानंतर पुढील करवाई करण्यात येईल.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन जे मालकी हक्काचे पट्टे आपण त्यांना देत आहे. अनेक वर्षापासून याचे सर्व्हेक्षण आणि गाजावाजा होत आहे. नागपूर महानरगपालिका ही एक स्थानिक स्वराज्य संस्था आहे आणि त्या स्वराज्य संस्थेमध्ये राहणारे नागरिक झोपडपट्टी मध्ये राहतात. म्हणजे मी जर रिक्षाचालक असेल आणि त्या झोपडपट्टीमध्ये राहत असेल अनेक वर्षापासून तेथे राहत आहे. मला माझे मुले बाळे संतती निर्माण झाली. मला मुलाबाळांचे शिक्षण आणि संवर्धन करायचे आहे. पट्टेधारकांचे सर्व्हेक्षण 2012 च्या पुर्वीपासून आम्ही पट्टे देवु, पट्टे देवू असे बोलल्या जात आहे परंतु अद्यापही काहीही झालेले नाही. मुलांच्या शिक्षणाकरीता त्याच्याकडे पैसा जर नाही तर ती प्रॉपर्टी त्याला मॉरगेज करता येत नाही. तो वर्षानुवर्ष तेथे राहतात. तो स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये राहत आहे. परंतु तो मालक म्हणुन राहत नाही. ही कारवाई शासन स्तरावर कधी करणार. त्यांना मालकी हक्क कधी देणार जेणेकरुन 10 बाय 10 ची झोपडपट्टी शासनाला, बॅकेला गिरवी करुन तो आपल्या मुलाबाळांचे संवर्धन आणि शिक्षण करेल, वर्षानुवर्ष आपण ही गोष्ट करीत आहे. आकृतीबंध झाला असतांना या महानगरपालिकेने सर्वानुमते ठराव केला. महानगरपालिकेमध्ये आपले लक्ष नाही. महानगरपालिकेत कर्मचारी नाही, एजन्सी आपण नियुक्त करतो अनेक लाखों रुपये खर्च करतो. परंतु महानगरपालिकेत काम करणारे कंत्राटी लोक जे आहे त्यांना आपण नियमित करण्याचे काम करीत नाही. त्या लोकांचे सुध्दा पुर्नस्थापन किंवा संवर्धन झाले पाहिजे हे तुम्हाला वाटत नाही. शासन निर्णीत आहे असे आपण सांगतो हे कधी पर्यत होणार आहे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :– मा.महापौरजी, हा जो भाडे पट्टा देतो आहे तो परमनंट भाडेपट्टा आहे. दुसरा प्रश्न होता की यांना वित्तीय संस्थेकडुन कर्ज घेता येईल काय ? होय, त्याकरीता शासनानी पण निर्णय घेतला आहे. 17 नाव्हेंबर ला निर्णय घेतला आहे. भाग क्र 12 जर पात्र अतिक्रमण धारकास घराचे वित्तीय संस्था कडुन आवश्यक ते कर्ज उभारण्याकरीता म्हणजे त्याला कर्ज सुध्दा घेता येते. सभागृहाच्या समोर विषय ठेवला आहे. त्या भाडेपट्टयाच्या रुपात मा.सभागृहाने मंजूरी दयावी, जेणेकरुन ज्या ज्या नागरिकांना भाडेपट्टा देतो त्या आधारे कुठलीही वित्तीय संस्था कडुन त्याला कर्ज मिळेल.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, आमच्या उत्तर नागपूर मध्ये जरीपटका नावाची वस्ती आहे ते स्लम घोषित आहे काय? त्याचे पट्टे वाटप झाले की नाही झाले त्या संदर्भात माहिती दयावी.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :– मा.महापौरजी, नावानिशी माहिती देणे सध्या शक्य नाही. 10 मिनीटामध्ये माहिती देतो.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, मला लेखी माहिती दिली तरी चालेल, चेअरमन साहेब म्हणतात की आम्हाला ही माहिती झाली पाहिजे म्हणुन सभागृहातच आपण सांगावे म्हणजे नोटींग मध्ये येवुन जाईल.

प्रश्न क्र 148:– नागपूर महानगरपालिकेत स्वास्थ निरीक्षकांची मंजूर पदे किती यापैकी किती पदे रिक्त संदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः– वितरीत केल्याप्रमाणे

प्रश्न क्र 149:– नागपूर महानगरपालिका सिमा क्षेत्रात आर.ओ. ने 20 लिटर पाण्याच्या कॅनचा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या किती? संदर्भात प्रश्न

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर मला मिळाले परंतु उत्तर काही समाधानकारक नाही. शहरामध्ये 19 ठिकाणी हा व्यवसाय चालतो. आणि 5 लोकांना एन.ओ. सी. आहे. असे त्यामध्ये दिलेले आहे. माझी अशी माहिती आहे की नागपूर शहरामध्ये शेकडो ठिकाणी हा व्यवसाय चालतो. आणि आपल्या झोनमध्ये या संदर्भात माहिती उपलब्ध नाही. आपल्या जवळ एवढे मोठे अधिकारी आहे, एवढे मोठे प्रशासन आहे. आणि ऐवढे असतांना कुठलेही पाणी आणुन त्या पाण्याला शुध्द करण्याच्या नावाखाली 20 लिटर कॅनमध्ये लोकांना जे पाणी मिळते. माझ्या माहितीप्रमाणे ते शुध्द पाणी नाही. त्याच्या नावाखाली हा गोरखधंदा पुर्ण नागपूर शहरामध्ये सुरु आहे. याला आपले झोनल अधिकारी किंवा त्या भागातील आरोग्य विभागाचे अधिकारी असतील त्यांचे याकडे दुर्लक्ष आहे. त्याबद्दल आपण माहिती दयावी की हा व्यवसाय किती ठिकाणी सुरु आहे आणि किती लोकांना आपण एन.ओ.सी. दिलेली आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.गणवीर) :– मा.महापौरजी, हा प्रश्न आरोग्य विभागाशी निगडीत आहे. आम्ही जलप्रदाय विभागातून एकूण 132 आर.ओ. चा रेकॉर्ड आपल्याकडे आलेला आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, यांच्याकडील माहिती आणि मला दिलेल्या माहितीमध्ये तफावत आहे. मला जे उत्तर दिले आहे त्यामध्ये 19 ठिकाणी हा व्यवसाय सुरु आहे. श्री.अनिलकुमार,श्री.ललीत जयस्वाल यांना एन.ओ.सी. मिळालेली आहे. श्री.मनोज रामेश्वर शिंदे यांना एन.ओ.सी. मिळाली आहे. श्री. संदीप भिसे यांना एन.ओ.सी. मिळाली आहे. श्री.मानवटकर आणि श्री.चौधरी अशा 5 लोकांना एन.ओ.सी. मिळालेली आहे. आणि यामध्ये लिहिले आहे की माहिती उपलब्ध नाही. सतरंजीपूरा झोन, मंगळवारी झोनमध्ये काहीच माहिती उपलब्ध नाही. मग हा व्यवसाय जो सुरु आहे. त्याबद्दल महानगरपालिकेचे प्रशासन काय करते.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, 20 लिटरच्या कॅनचा जो धंदा करणारे लोक आहे. त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहे. आता शहरामध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. लोकांना पाणी मिळत नाही. दुषित पाणी जर त्यांनी वापरले आणि काही लोक मृत्यू पावले तर याला जबाबदार कोण राहणार आहे. म्हणुन माझी विनंती आहे की विनापरवानगी जे धंदे लावत आहे. त्याच्यावर आपण झोनच्या मार्फेत कोणती कारवाई करणार आहे त्या संदर्भात माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) :– मा.महापौरजी, सदर प्रश्न हा आरोग्य विभागाशी निगडीत आहे. आम्ही ही माहिती गोळा करुन दिलेली आहे. एन.ओ.सी. देण्याचे काम आरोग्य विभाग करतो. त्यामुळे आरोग्य विभागाने त्या संदर्भात उत्तर दयावे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, आरोग्य विभागाने या संदर्भात सविस्तर उत्तर दयावे आणि या संदर्भात माहिती दयावी की किती ठिकाणी हे काम सुरु आहे. काय कारवाई आतापर्यत केलेली आहे.

आरोग्य अधिकारी (श्री.कांबळे) :– मा.महापौरजी, आणि मा.सभागृह या विषयासंदर्भात मी झोनकडून माहिती घेवून मी उद्या सविस्तर माहिती देईल. हा प्रश्न माझ्याकडे आला नसल्यामुळे आज सायंकाळ पर्यत पूर्ण माहिती घेवून संबंधित नगरसेवक महोदयांना मी माहिती देईल.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, हा प्रश्न खूप जुना आहे. मला याचे उत्तर दि. 08/02/2019 ला मिळालेले आहे. तेव्हा पासूनचा हा प्रश्न आहे आणि आरोग्य विभागाला त्याची माहिती नाही. आणि संबंधित विभागाने त्याची चौकशी सुध्दा केली नाही. नागपूर शहरामध्ये पिण्याच्या पाण्याचा अत्यंत गंभीर प्रश्न आहे.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, हा प्रश्न संबंधित विभागाच्या उपायुक्तांकडे गेला पाहिजे. हा प्रश्न आरोग्य विभाग प्रमुखांचा प्रश्न नाही. त्यामुळे त्या विभागाच्या लोकांनी नीट तयारी करुन ते आले पाहिजे. मा.कमीश्नर साहेब याच्या बैठकी घेतात. त्यामुळे त्या त्या विभागाचे उपायुक्त असतील, अति.आयुक्त असतील त्यांना याची परत सूचना दया. हा प्रश्न याच्याकडे नाही, त्याच्याकडे नाही. हा विषय फार गंभीर आहे. लोकांच्या तब्येती खराब होत आहे.

ॲड.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी, यामध्ये आणखी एक तांत्रिक बाब आहे. की अनेक ज्या कंपन्या आहे त्या शहराच्या सिमेच्या बाहेर करतात आणि विक्रीसाठी मात्र त्या शहरात आणतात. अशा ठिकाणी प्रशासनाला कारवाई करण्यासाठी अडचण जाते त्यावर सुध्दा लक्ष देण्यात यावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, या प्रश्नाच्या संदर्भाने एक उपप्रश्न असा आहे की, नागपूर महानगरपालिकेने वॉटर ए.टी.एम काही ठिकाणी लावले आहे. आणि वॉटर ऐ.टी.एम. कार्ड सुध्दा त्या ठिकाणी उपलब्ध करुन देतो. त्या 20 लिटरच्या पाण्यासाठी आपण दर निश्चित केले आहे काय? जर दर निश्चित केले असेल तर ते कोणी केले आणि कोणाच्या मंजूरीने केले या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :— मा.महापौरजी, आदरणिय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाप्रमाणे उपायुक्त आरोग्य विभागाने हे उत्तर देणे अपेक्षित होते असे जेष्ठ सदस्यांचे मत आहे आणि प्रशासनाला सुध्दा ते मान्य आहे. उपायुक्त श्री.शेख साहेब यांचा चार्ज माझ्याकडे आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन जेष्ठ सदस्यांचे म्हणणे आहे म्हणुन प्रशासनाला मान्य आहे. हे उत्तर योग्य नाही. माझा प्रश्न असा आहे की या प्रश्नावर कारवाई करण्याचा अधिकार नागपूर महानगरपालिकेला आहे किंवा नाही.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :— मा.महापौरजी, पाण्याच्या संदर्भात मा.सदस्यांनी जो आर.ओ. चे पाणी शहरात किती ठिकाणी विकल्या जातात आणि किती लोकांना एन.ओ.सी. दिलेली आहे. तो जो प्रश्न विचारला आहे त्याप्रमाणे 132 ठिकाणी व्यवसाय चालू आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, माझा प्रश्न अगदी स्पष्ट आहे. या विषयावर कारवाई करण्याचा अधिकार महानगरपालिकेला आहे किंवा नाही.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी):— मा.महापौरजी, शॉप ॲन्ड एस्टॅब्लीश ॲक्ट अंतर्गत आहे.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, माझ्या माहिती प्रमाणे पिण्याचे पाणी आणि हॉटेल याच्यावर कारवाई करण्याचे अधिकार फुड ॲन्ड ड्रग्स् डिपार्टमेंटला आहे. नागपूर महानगरपालिकेला नाही. माझे म्हणणे खरे आहे हे स्पष्ट करावे किंवा माझी माहिती सुधारावी.

अति.आयुक्त(श्री.राम जोशी):—मा.महापौरजी,प्रशासनाच्या माहितीप्रमाणे शॉप ॲन्ड एस्टॅब्लीश ॲक्ट प्रमाणे झोनस्तरावर मागणी प्रमाणे एन.ओ.सी. देण्यात येतात या एन.ओ.सी. देण्याकरीता जे क्रायटेरिया बघण्यात येते त्यावर किरोकोळ स्वरुपाची कारवाई म.न.पा. करते.

श्री.दयाशंकर तिवारी :— मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांचा प्रश्न असा आहे की, अवैधरित्या जे लोक व्यवसाय करीत आहे त्यांच्यावर कारवाई आणि पाण्याची क्वॉलिटी, जेथे पाण्याची क्वॉलिटी आली तेथे फुड ॲन्ड ड्रग्स डिपार्टमेंट आले. एन.ओ.सी. आपण व्यवसाय करण्यासाठी देतो. पण त्याच्यावर कारवाई करण्याचा अधिकार फुड ॲन्ड ड्रग्स् विभागाचा आहे की महानगरपालिकेचा आहे.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :— मा.महापौरजी, फुड ॲन्ड ड्रग्स कायद्याअंतर्गत एनव्हायरमेंटच्या इतर कायद्याअंतर्गत या दोन्ही गोष्टीचे अधिकार फुड ॲन्ड ड्रग्स आणि एम.पी.सी.बी. या दोन्ही संस्थेला आहे. एन.ओ.सी. देण्याची कारवाई जे झोनस्तरावरुन करण्यात आलेली आहे ती 132 एस्टॅब्लीशमेंट पैकी फक्त 21 एस्टॅब्लीशमेंटला झोन स्तरावरुन एन.ओ.सी. देण्यात आलेली आहे. कदाचित सन्माननिय सदस्यांपर्यंत पुर्ण माहिती आलेली नसेल.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, आपल्या विभागाने एन.ओ.सी. देतांना पुर्ण चौकशी आपण केली आहे काय? पाणी कुठले वापरतात, कुठुन आणतात, कशा पध्दतीने शुध्द करतात याची चौकशी तरी आपल्या विभागाने केलेली आहे काय?

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :— मा.महापौरजी, झोनस्तरावरुन एन.ओ.सी. देतांना प्राथमिक बाबी पाहण्यात आलेल्या आहे. क्वॉलिटी तपासण्याकरीता फुड ॲन्ड ड्रग्स किंवा इतर यंत्रणेने तपासायची होती ती तपासण्यात आलेली नाही. फक्त एस्टॅब्लीशमेंट ॲक्ट प्रमाणे व्यवसाय करण्याची परवानगी तेथे देण्यात

आलेली आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, आपल्याकडे एन.ओ.सी. साठी किती अर्ज प्रलंबित आहे. आपण अन्न व औषधी विभागाला आपल्या मार्फेत चौकशी करा, अशा प्रकारचे पत्र दिले आहे काय?

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :– मा.महापौरजी, अशा प्रकारचे पत्र देण्यात आलेले नाही. कारण की हा विषय झोन स्तरावरुन हाताळण्यात येत होता. आता हा प्रश्न आम्ही सिव्हील ऑफीस वरुन हाताळतो आहे. आणि यामध्ये आता आपण फुड ॲन्ड ड्रग्स् डिपार्टमेंटला इनव्हॉल करु.

श्री.प्रफुल्ल गुडधेः–मा.महापौरजी,जे वॉटर ए.टी.एम. महानगरपालिकेने लावले आहे. त्याचे दर निर्धारण करण्याची कोणती प्रक्रीया आपण पार पाडली आहे. त्या संदर्भात माहिती दयावी. त्या वॉटर ए.टी. एम. च्या समोर तुमचा फोटो लागला आहे. म्हणजे महानगरपालिका त्याला पुर्ण जबाबदार आहे आणि त्याला तुम्ही जबाबदार पुर्णतः असा मी समजतो. मा.महापौरजी, आपल्या माहितीशिवाय जर अशा प्रकारे आपल्या फोटोचा वापर जर होत असेल तर त्याची पण चौकशी करावी.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :– मा.महापौरजी, हा प्रश्न नसल्यामुळे त्याचे उत्तर नंतर देण्यात येईल.

श्री.जितेंद्र कुकडे :– मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, परिवहन विभागाच्या मागच्या वर्षीच्या बजेटमध्ये आणि यावर्षीच्या बजेटमध्ये प्रवाशांची गैरसोय होवू नये,जसे मोरभवनचे बस स्टॉप आहे तेथे प्रवाशांची संख्या सर्वात जास्त आहे. के.डी.के. कॉलेज जवळील जे बस स्टॉप आहे तेथे प्रवाशांची संख्या म्हणजे के.डी.के कॉलेजचे विद्यार्थी आणि बाकीचे विद्यार्थी त्या बसस्टॉप वर वेटींग करतात त्यांना पाण्याचा फार त्रास होतो. 25 रुपयांची पाण्याची बॉटल तेथे घेतली जाते. त्या अनुषंगाने परिवहन समितीने असे ठरविले की जेथे प्रवाशांची गर्दी असेल, त्यांच्या तहाणांची आणि प्रसाधनांची सोय परिवहन विभागाने करावी. म्हणुन एक पायलेट प्रोजेक्टवर एक वॉटर ए.टी.एम. के.डी.के. कॉलेज समोरील बसस्टॉप वर लावलेले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, माझे असे म्हणणे आहे की, वॉटर ए.टी.एम.चांगले आहे. आपण जर लावले असेल तर ते निश्चितपणाने स्वागत आहे. त्याचे दर कसे निश्चित केले आहे. हे कोण करीत आहे. याची प्रक्रीया अवलंबलेली आहे काय? हा माझा प्रश्न आहे. आपण अत्यंत चांगले काम केले त्या बद्दल कुकडे साहेब आपले अभिनंदन.

अति.आयुक्त (श्री.राम जोशी) :– मा.महापौरजी, काही भागामध्ये आपल्याकडे जे वॉटर ए.टी.एम. लावण्यात आलेल्या आहे. त्या वॉटर ए.टी.एम. ला वॉटर सप्लाय देण्याची परवानगी वॉटर सप्लाय डिपार्टमेंट कडुन देण्यात आलेली आहे. त्याच्या पाण्याची आकारणी सुध्दा आपण घेत आहे. त्यानंतर तिथे जो दर ठरविण्यात आलेला आहे. तो झोनस्तरावरुन कशा निर्देशाप्रमाणे ठरवविण्यात आलेला आहे त्याची माहिती सध्या प्रशासनाच्या जवळ नाही. ती आम्ही झोनस्तरावरुन करण्यात आलेल्या कारवाईची किंवा बचत गटाच्या माध्यमातून हे चालविण्यात आले आहे किंवा कशी कारवाई करण्यात आलेली आहे याची माहिती घेवून मा.सदस्यांनी ती पूरविण्यात येईल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, हा जो प्रश्न आहे तो स्थगित ठेवावा, या बद्दल कुठलिही माहिती नाही. फुड ॲन्ड ड्रग्स विभागाला तो कारवाईचा अधिकार आहे की, महानगरपालिकेला कारवाईचा अधिकार आहे या संदर्भात आपल्या प्रशासनाला स्पष्टता नाही. वॉटर ए.टी.एम. नागपूर शहरामध्ये किती आहे, कुठल्या कुठल्या एजन्सीने केलेल्या आहे. कुठल्या कुठल्या जागेवर केलेल्या आहे त्याची आपण परवानगी दिली आहे. त्याचा भाडेपट्टा निश्चित केलेला आहे काय? तिथे वॉटर ए.टी.एम. वर आपले नियंत्रण आहे काय? या संपूर्ण विषयाची विस्तृत माहिती या प्रश्नासह आपण पुढच्या सभेमध्ये दयावी. यामध्ये जर आपण वॉटर ए.टी.एम. चे 5 रु. लिटरचे दर निश्चित केले ओह आता त्या वॉटर ए.टी.एम. वर 5 रुपयांपेक्षा अधिक देत आहे काय? त्या बद्दल काय सिस्टीम आहे. तिथे वॉटर ए.टी.एम. कार्ड आहे ते कोणाला उपलब्ध होते कोणाला उपलब्ध होत नाही. मी जर वॉटर ए.टी.एम. कार्ड शिवाय जर तेथे पाणी भरण्यासाठी गेलो तर पाणी भरण्यासाठी मला काय व्यवस्था आहे. ती फी किती आकारली जाते. त्याची व्यवस्था आहे काय? हा संपूर्ण प्रश्न आहे त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात प्रशासनाला माहिती नसेलही तर या संपूर्ण प्रश्नाची माहिती घेवून पूढच्या सभेमध्ये रितसर माहितीसह हा प्रश्न पुढच्या सभेमध्ये ठेवावा, तोपर्यंत हा प्रश्न मा.महापौरजी, स्थगित ठेवावा ही विनंती आहे.

महापौर :– या संपुर्ण विषयाची माहिती पुढच्या सभागृहामध्ये ठेवण्यात यावी.

प्रश्न क्र 150:– नागपूर महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सी.बी.एस.सी पॅटर्न किंवा इंग्रजी माध्यम का सुरु करण्यात येत नाही संदर्भात प्रश्न.

श्री.राजेंद्र सोनकुसरे :– मा.महापौरजी, माझा प्रश्न असा होता की, महानगरपालिकेच्या सर्व शाळामध्ये सी.बी.एस.सी. पॅटर्न, किंवा इंग्रजी माघ्यम का सुरु करण्यात येत नाही. याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे काय? याबाबत सविस्तर माहिती मला पत्राव्दारे मिळालेली आहे. नागपूर महानगरपालिकेच्या शाळेमध्ये सी.बी.एस.सी. पॅटर्न किंवा इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला नाही. मला हे म्हणायचे आहे. जेव्हा देश स्वतंत्र झाला तेव्हा महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. आतापर्यत हा प्रश्न का प्रलंबित आहे. आतापर्यत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात प्रशासनाने दिरंगाई केलेली आहे त्याबाबत मला माहिती देण्यात यावी. तसेच मला मागिल 5 वर्षाची विद्यार्थ्यांच्या आकडेवारीत घट आणि वाढ झालेली आहे त्याची इत्यंमभूत माहिती देण्यात यावी. पटसंख्या कमी होण्याची माहिती सुध्दा देण्यात यावी. आणि प्रत्येक शाळेमध्ये जे ऐक्सेस मध्ये जर शिक्षक असेल तर ते किती आहे याची सुध्दा माहिती मला प्रशासनाने दयावी.

उपायुक्त (श्री.मोहिते) :– मा.महापौरजी, सी.बी.एस.सी. पॅटर्न हा संपूर्ण वेगळा उपक्रम आहे. मराठी, ऊर्दु आणि हिंदी या ज्या शाळा आहे त्या राज्य शासनानी आखून दिलेल्या नुसार आहे आणि शिक्षकांची जी निवड झाली आहे ती सुध्दा याच पॅटर्न नुसार झालेली आहे. आपल्याला जर सी.बी.एस.सी. पॅटर्न प्रमाणे अभ्यासक्रम अवलंबायचा असेल तर ही धोरणात्मक बाब आहे.

श्रीमती.वैशाली नारनवरे :– पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.महापौर मॅडम, जसे मानवाला पाण्याची गरज आहे तशीच शिक्षणाची गरज आहे. जर आपल्याला शिक्षण मिळाले नाही तर आपल्या देशाला सज्जन नागरिक सुध्दा मिळणार नाही. आणि तुमच्या समोर या आधीपण असाच प्रश्न निर्माण केला होता की, महानगरपालिकेमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु व्हायला पाहिजे परंतु तरी सुध्दा तुम्ही त्यामध्ये लक्ष दिले नाही. यावर दुर्लक्ष केले. मा.महापौरजी, मनपा शाळेमध्ये स्लम ऐरियातील मुले, रिक्षाचालक, हातगाडी वाले, मजूर असे आईवडील आपल्या मुलाला शाळेमध्ये शिकवितात तेथून विद्यार्थी घडतो, परंतु प्रायव्हेट शाळेमध्ये सी.बी.एस.सी. पॅटर्नच्या शाळांची फि जास्त असल्यामुळे त्यांचे आईवडील तेथे पाठवू शकत नाही.

श्री.राजेंद्र सोनकुसरे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, राष्ट्रीय शैक्षणिक योजना आणि डिस्ट्रिक सिस्टीमच्या रिपोर्टनुसार वर्ष 2015–16 आणि 2016–2017 मधील देशातील 60 लक्ष विद्यार्थ्याने प्राथमिक शाळा सोडलेली आहे. मागील वर्षाचा आकडा उपलब्ध नसल्याने त्या आकडयामध्ये निश्चितच वाढ झालेली आहे यात शंका नाही. आपल्या महानगरपालिकेच्या सर्व शाळा सुविधायुक्त होणे गरजेचे आहे. आपल्या मनपाच्या शाळेमध्ये ती व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे जसे बिल्डींग इन्फ्रास्ट्रक्चर, सोशल ॲन्ड कल्चरल ॲक्टीव्हीटी, ॲडव्हान्स ऐज्युकेशन, स्पोर्ट ॲक्टीव्हीटी, सुरक्षा गार्ड, डिजीटल क्लास रुम, सायन्स लॅब, टिचिंग मेथड, ऑडोटेरियम हॉल या सर्व सुविधा नसल्यामुळे दिवसेंदिवस शिक्षणाचे बाजारीकरण होत आहे. नागपूर महानगरपालिकेमध्ये असा कोणताच प्रभाग नसेल मध्यम वर्गाचे लोक आणि श्रीमंत राहत नसेल, मला हे म्हणायचे आहे. की श्रीमंताचे मुले जेव्हा बस किंवा व्हॅनमध्ये जातो, त्या ऐरियामध्ये गरिब वर्ग असतो त्यांना पण शिक्षण मिळण्याचा अधिकार आहे. जेव्हा श्रीमंत वर्गाचा मुलगा व्हॅनमध्ये किंवा बसमध्ये जातो तेव्हा त्याला पण वाटते आपला मुलगा त्या बस किंवा शाळेमध्ये जावू शकत नाही. बाकीच्या विद्यार्थ्यांना बघतो तर टाय, बुट, सुटमध्ये तो मुलगा शाळेत शिक्षण घेत असतो आणि पालकांना जसे आता ताईने सांगितले की आपल्या शहरामध्ये हातठेलेवाले, रिक्षाचालक, पानठेलावाले, भाजीपाला विकणारे असे कितीतरी गरीब विद्यार्थ्यी असतात की अशा पालकांना वाटतात की आपल्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे ते पण पैसे खर्च करायला तयार असतात. आणि आपली पटसंख्या दिवसेंदिवस का कमी होत आहे. याकरता प्रशासनाने काही कमेटी बसविली आहे काय? किंवा सभागृहापूढे सांगितले नाही. म्हणुन आपल्या महानगरपालिकेच्या शाळा बंद होत आहे याकरीता काहीतरी कठोर निर्णय मा.महापौरजी, आपण घ्यायला पाहिजे. या शहरामध्ये गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिक राहतात त्यांना सुध्दा उच्च दर्जाचे शिक्षण मिळणे आज काळाची गरज आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, मा.नगरसेवक श्री.इब्राहीम यांनी आशीनगर झोन मधील जी. एम. बनातवाला शाळेच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केला होता त्या संदर्भात प्रशासनाने उत्तर दयायला पाहिजे.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, सन्माननिय सदस्य सोनकुसरेजी का

प्रश्न बहोत व्यवस्थित है। नागपूर महानगरपालिका मे इंग्रजी माध्यम की स्कुल शुरु करने के लिये महानगरपालिकाने कोशिश की । मा.महापौरजी, आज के अंजेडे मे नागपूर महानगरपालिका ने अंग्रजी स्कुल शुरु करना चाहिये। यह विषय है या नही। अगर है तो यही उसका उत्तर है। महानगरपालिका ने देर सही आज प्रस्ताव लाकर के शुरु कर रही है। यह प्रश्न यहापर ही समाप्त होता है। कृपया प्रशासन इसपर तयारी करके आया करे।

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, नागपूर शहराची लोकसंख्या वाढत आहे आणि महानगरपालिकेच्या मराठी माध्यमांच्या विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, महानगरपालिका एका विद्यार्थ्यावर 52,000 रुपये खर्च करीत आहे. एवढया मोठया प्रमाणात जर महानगरपालिका जर खर्च करते. तर इंग्रजी माध्यमांची शाळा सुरु करण्याकरीता एवढा विलंब का?

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, महानगरपालिकेच्या शाळांची दिवसेंदिवस पटसंख्या कमी होत आहे. एक साधारण रिक्षा चालक असेल, किंवा हातगाडीवर घंटा करणारा असेल, हा सुध्दा आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जास्त पैसे देवून शिक्षण देवू शकत नाही. मला असे वाटते की, भारतीय विद्या भवन, दिल्ली पब्लीक स्कुल आणि इतर ज्या व्यवसाय करणाऱ्या शिक्षण संस्था आहे यांना लाभ पोहचविण्याकरीता महानगरपालिका कार्य करीत आहे काय? की खरोखर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करणार आहे असे माझे म्हणणे आहे. मा.सदस्य श्री. सोनकुसरेजी यांनी या सभागृहात जो प्रश्न ठेवला आहे त्या बदद्ल मी त्यांचे अभिनंदन करतो. एक चांगला प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

श्रीमती वैशाली नारनवरे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन महानगरपालिकेच्या शिक्षिका इंग्रजी माध्यम आणि सी.बी.एस.सी. च्या शाळा शिकविण्याकरीता जर प्रशिक्षित नसतील तर त्यांना प्रशिक्षण देवून या ठिकाणी इंग्रजी माध्यम आणि सी.बी.एस.सी. पॅर्टन सुरु करायला पाहिजे. तेव्हाच एक चांगला विद्यार्थी घडू शकतो. कर्मचारी वर्ग, हातमजूर किंवा रिक्षाचालक हा आपल्या विद्यार्थ्यांना चांगल्या शाळेत शिकवू शकत नाही अशा मुलांचा विचार करायला पाहिजे आणि त्यांना चांगले शिक्षण दयायला पाहिजे. विद्यार्थी जर शिकला तर एक सज्जन माणुस या शहराला मिळेल.

श्री.राजेंद्र सोनकुसरे :– मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, केंद्रामध्ये हजारो करोड रुपयांचा बजेट या वर्षी शिक्षणासाठी करुन ठेवला आहे. राज्यामध्ये सुध्दा राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी सुध्दा शिक्षणासाठी बजेट ठेवला आहे.

महापौर :– सन्माननिय सदस्यगण या विषयाच्या संबंधित आणखी एक विषय असा आहे की, सेमी इंग्लीश माध्यमाच्या शाळा सुरू करण्याच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येईल.

प्रश्न क्र 151 :– नागपूर महानगरपालिकेच्या दहन घाटावर मृतकाचा अग्निसंस्कारास लाकडे व गोव–यांची पुर्तता संदर्भात प्रश्न

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, माझी एक विनंती आहे की, ज्याचा प्रश्न आहे त्यालाच पुर्ण वेळ दिला पाहिजे. ज्या सन्माननिय सदस्यांचा प्रश्न आहे तो बोलतच नाही आणि दुसराच सदस्य त्यावर बोलतो.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, मी घाटाच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. मला कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आलेली नाही. एकुण किती दहन घाट शहरात आहे? महानगरपालिकेव्दारे आपण किती घाट मेंन्टेन करतो.

आरोग्य अधिकारी (श्री.कांबळे) :– मा.महापौरजी, 14 आणि 2 असे एकूण 16 दहनघाट शहरामध्ये आहे. महानगरपालिकेव्दारे 16 घाटाचे आपण मेंटेनन्स करतो. त्यांना सुविधा उपलब्ध करुन देतो.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, कोणकोणत्या घाटावर शव जाळण्यासाठी येतात तेव्हा कोणत्या घाटावर लाकडाचे पैसे घेतो.

आरोग्य अधिकारी (श्री.कांबळे) :– मा.महापौरजी, अंबाझरी दहन घाटावर आपण लाकडाचे पैसे घेतो.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, फक्त आपण अंबाझरी दहन घाटावरच लाकडाचे पैसे का बर घेतो.

आरोग्य अधिकारी (श्री.कांबळे) :– मा.महापौरजी, स्थायी समितीचा दि. 02/05/2016 चा ठराव आहे. त्या नुसार पर्यावरणाला हानी न पोहचता बाजूला असलेला तलाव सुशोभित रहावा, त्याकरीता स्थायी

समितीच्या ठरावानूसार आपण अंबाझरी घाटावर पर बॉडी 2211 रुपये लाकडाचे, आणि 10 किलो गोवऱ्याचे 118 रुपये असे प्रत्येक व्यक्तीकडून पैसे घेतो.

श्री.कमलेश चौधरी :– मा.महापौरजी, आपण फक्त अंबाझरी घाटवरुन 2211 रुपये प्रत्येक मानसाकडून घेत आहे. आणि असा दुसरा कोणताही घाट नाही की तेथे पैसे घेण्याची पध्दत आपल्याकडे सुरु आहे. येथे येणाऱ्या लोकांची जी संख्या आहे ती जास्तीत जास्त मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या मतदार संघातील आहे. तेथे मोठे मोठे स्लम आहे. तेथे पश्चिम नागपूर, पांढराबोडी, फुटाळा तलाव, हजारी पहाड, सुरेंद्र नगर, येथील लोक सुध्दा तेथे येतात. आणि ही सर्व बाबी लक्षात घेवून असे वाटत आहे की कुठे ना कुठे नागपूर महानगरपालिका ही तेथे राहणाऱ्या लोकांसोबत भेदभाव करीत आहे. किती दिवसांपासून पैसे घेणे सुरु आहे. हा लहानसा विषय नाही. लोक कोणत्या परिस्थितीमध्ये घाटावर येते हे मला सांगण्याची गरज नाही. हे सर्वांना माहिती आहे. आणि तरी या प्रकारची पध्दत नागपूर महानगरपालिकेकडुन एकाच घाटावर होत असेल, तर कुठे ना कुठे आपण त्यांच्यावर अन्याय करीत आहे.

आरोग्य अधिकारी (श्री.कांबळे):–मा.महापौरजी, अंबाझरी दहनघाटावर प्रती व्यक्तीमागे लाकडाचे पैसे घेण्याचा मागचा उद्येश हाच आहे की पर्यावरण वाचावे, लोकांमध्ये जागृती व्हावी. की लाकडामुळे पर्यावरणाची हानी होते. त्यामुळे अंबाझरी दहनघाटावर लाकडासोबतच ब्रिकेडस् आणि एल.पी.जी. या व्दारे आपण प्रत्येक व्यक्तीकडुन कुठल्याही प्रकारचे पैसे घेत नाही.

श्री.कमलेश चौधरी:– मा.महापौरजी, या संदर्भात आपल्याला चुकीची माहिती आहे. आपण तेथे जावून पहावे ते ब्रिकेडचे आपण जे बोलत आहे त्यामध्ये अर्धे शव जळले आणि अर्धे शव तसेच आहे. महानरपालिकेचा कर्मचारी तेथे देखरेख करीत आहे तेथे एखादया दिवशी खुनखराबा होवून जाईल, ब्रिकेडचे पैसे आपण घेत नाही परंतु त्या ब्रिकेडमध्ये शव जळत नाही त्यामुळे लोकांची भावनेला ठेस पोहचते. कमीत कमी अशी तरी व्यवस्था करा की महानगरपालिकेचा जो नगरसेवक आहे त्यांच्या पत्राव्दारे लाकूड फ्री करावे. हा खूप गंभीर विषय आहे. तिथे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की तेथे कोणत्या ना कोणत्या दिवशी खुनखराबा होवून जाईल, हा विषय खूप गंभीर आहे. आणि हा विषय लोकांच्या भावनेशी जुळलेला विषय आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री.कमलेश चौधरी यांनी जो मुद्या मांडला आहे की, महानगरपालिकेने त्या अंबाझरी दहन घाटावर शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला त्या मागची एक धारणा होती की, पर्यावरण पुरक लोकांना सवय लागण्यासाठी ब्रिकेडच्या माध्यमातुन असो किंवा विद्युतच्या माध्यमातुन असो किंवा गॅसदाहिनीच्या माध्यमातून असो, लोकांनी अत्यंसंस्कार करीत असतांना लोकांनी पर्यावरणपूरक गोष्टींचा वापर करावा, हा त्या मागचा उद्येश होता. परंतु हे करीत असतांना आपण लोकांपुढे दुसरा पण ऑप्शन ठेवला होता. हे जर करणार नसाल, तर आपल्याला पैसे मोजावे लागतील, त्या हेतू मधुन आपण हा प्रकल्प नागपूर शहरामध्ये प्रायोगिक तत्वावर अंबाझरी दहन घाटावर ते सुरु केले होते. महानगरपालिकेचा हेतु चांगला आहे. परंतु सन्माननिय सदस्य श्री.कमलेश चौधरी यांनी जी भावना व्यक्त केली. त्या भागामध्ये मोठया प्रमाणात स्लम आहे आणि ही जी मानसिकता आहे. ती एका दिवसामध्ये लोकांची बदलु शकणार नाही. आणि जर बदलू शकणार नसेल, तर अशा स्थितीमध्ये ज्या वस्त्यामध्ये गरीब लोक असतील तर गरीब माणसाकडून जर एकमेव दहन घाटवरुन पैसे घेत असाल तर मला असे वाटते की तो भेदभाव या शहरातील नागरिकांवर होत आहे. त्यामुळे सोबतच त्यांनी सूचना दिली तर जे लोक महानगरपालिकेच्या लाकडाचे पैसे देवू शकत असतील तर निश्चितपणाने ते महानगरपालिकेने लाकडाचे पैसे घ्यावे, मात्र स्लम वस्त्यांमध्ये नगरसेवक जर रिकमंड करीत असेल, किंवा महानगरपालिकेमध्ये या आधी सर्व दहन घाटावर शुल्क आपण घेत होतो त्यावेळी जर सन्माननिय नगरसेवकांनी जर पत्र दिले तर त्याला मोफत लाकडे पुरविण्याची पध्दती याआधी सुध्दा होती. म्हणुन मा. महापौरजी, माझी आपल्या मार्फत प्रशासनाला विनंती आहे की, सन्माननिय नगरसेवकांनी तेथे म्हटले की त्यांची आर्थिक स्थिती ठीक नाही त्यामुळे त्यांना मोफत लाकडांचा पुरवठा करावा, अशाप्रकारची जर नगरसेवकांची शिफारस असली तर त्या गरीब व्यक्तीकडून आपण कुठलेही पैसे आकारु नये, मला असे वाटते की सभागृहामध्ये या संदर्भात सर्व सदस्यांचे एकमत झाले पाहिजे. आणि निश्चितपणाने या दृष्टीकोणातून आपण तो विषय मंजूर करावा.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, या विषयाची पार्श्वभुमी सांगतो, त्यावेळी मी महापौर होतो आणि श्री.विकास ठाकरे विरोधी पक्षनेते होते. त्यावेळी वारंवार लाकुड खरेदी या विषयावर भ्रष्टाचार आणि

घोटाळयाचा प्रश्न येत होता. दुसरा पर्यावरण पुरक जो विषय आहे. ती ओरड कशामुळे आहे. मा.कमलेश चौधरी यांचे मत एकदम ग्राहय आहे. कारण गरीबाला त्रास होतो. सव्वा ते दीड महिना त्या घाटावर एकही ब्रिकेड नाही. मा.आरोग्य प्रमुख येथे उभे आहे त्यांना विचारावे तेथे ब्रिकेड आहे काय?

आरोग्य अधिकारी (श्री.कांबळे) :– मा.महापौरजी, ज्या कंत्राटदाराला आपण काम दिले होते त्यांनी दोन महिन्यापासून काम करणे बंद केले. त्याला आपण नियमानुसार नोटीस दिली.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, घाटावर लाकडे, गोवरी आणि डिझेल शवदाहिनी किंवा एल.पी.जी. पाहिजे. कारण या प्रकल्पाला 4 वर्ष झाले आहे. 4 वर्षात आताच ओरड व्हायचे कारण काय? कारण आता तेथे ज्या भावनेने सुरु केले ती भावना जपल्या जात नाही आणि लोक लाकडे मागायला जातात. घाटावर गोव–या, ब्रिकेड, एलपीजी दहन शववाहिनी, डिझल शवदाहिनी देवू शकत नसाल तर लाकडे मोफत दिले पाहिजे. त्यामुळे ही ओरड आहे. दुर्देवाने येथे सांगावे लागते की, मा.संदीप जाधव स्थायी समिती अध्यक्ष होते आणि त्यामध्ये एकच घाट नाही तर 4 मोठे घाट होते. मोक्षधाम, गंगाबाई घाट अजून दोन घाट त्याच धर्तीवर सुरु करायला पाहिजे परंतु आपल्या प्रशासनामध्ये असे सन्माननिय लोक आहे की त्यांना ते सुरुच करायचे नाही. त्यांना परत लाकडांच्या टेन्डर आणि व्यवहारामध्ये इंटरेस्ट आहे. त्यामुळे गंगाबाई घाटावर सर्वात जास्त नागपूर शहरातील अंतिम संस्कार होतात. मोक्षधामवर होतात. वैशाली नगरवर होते. हे जर घाट आपण पर्यावरणपुरक सुरु केले तर मला असे वाटते की अनेकांना तेथे रोजगार मिळतील आणि मा.महापौरजी, लाकडांच्या विषयात आपण कमी पडतो, परंतु नगरसेवकांच्या पत्रावर आपण सुरु करावे ही बंद झालेली प्रथा परत सुरु करावी असे त्यांचा मताला माझा वैयक्तीक विरोध आहे कारण ती प्रथा बंद झाली त्यामध्ये परत ऑडीट ऑब्जेक्शन आहे. त्यामुळे नगरसेवकांचे पत्र आणि लाकडांची किंमत आणि लाकडे मोफत देण्यावर प्रचंड तफावत होते. त्यामुळे त्यामध्ये परत नगरसेवक अडचणीमध्ये येतील. त्यामध्ये समित्या होतील त्यामध्ये अनेक विषय आहे. जर गोव–या, ब्रिकेड, एलपीजी दहन शववाहिनी, डिझल शवदाहिनी हे मोफत देवु शकत नसेल तर लाकडे आपण निश्चित मोफत दिले पाहिजे. आपण एक–एक घाट पर्यावरणपूरक केला पाहिजे कारण ही आजच्या काळाची ती गरज आहे. मी प्रफुल्लजींच्या एका मताशी मी सहमत आहे. त्यांची माफी मागून मी सांगतो की त्यांच्या दुसऱ्या मताशी मी सहमत नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय दटके साहेबांनी आपले जे मत या ठिकाणी व्यक्त केले त्यांच्या मताशी मी 100 टक्के सहमत आहे. नगरसेवकांच्या पत्राच्या संदर्भामध्ये याच्या आधी जी प्रथा होती. तो एक उपाय म्हणुन मी सांगितला होता. मात्र त्यामध्ये त्यांनी जे फायडींग्स् दिलेले आहे त्यामध्ये निश्चितच घोळ होण्याची शक्यता आहे. निश्चितपणाने मी त्यांच्या मताशी सहमत आहे. त्यामुळे सर्वच घाटावर आपण पर्यायी म्हणजे जर ते उपलब्ध नसेल तर लाकडे पुरवावे यांच्या सूचनेला माझे समर्थन आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. मा.सदस्य श्री. कमलेशजींने चांगला विषय आणला इतर घाटावर जर मोफत लाकडे मिळत असतील तर आपण अंबाझरी घाटावर पण दयावे. हा विषय आपण आरोग्य समितीकडे पाठवून याला आपण मंजूरी दयावी.

श्री.विरेंद्र कुकरेजा :– मा.महापौरजी, मेरी आपसी विनंती है की बाकी के घाटोंपर भी ब्रिकेडस् चालु होना चाहियें।

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात एक सांगू इच्छितो की, आपले सत्तापक्ष नेते आहे श्री.संदीप जोशी मेडीकल हॉस्पीटल मध्ये 10 रुपयांमध्ये दिनदयाल थाली चालवितात. श्री. दयाशंकरजी असतील, प्रफुल्लजी असतील, असे अनेक लोक आहे. हे घाट सुध्दा अशा संस्थांना आपण चालवायला दिले ज्या सेवाभावी आहे. अशा संस्थांना जर आपण चालवायला दिले. कमलेशजी यांची जी तक्रार आहे. आपल्याकडे काम असे आहे की कोणीतरी घाट चालवायला गेले की 20 लाख रुपयांची बॅंक गॅरंटी, आणखी काही मागितले जाते म्हणून सेवेच्या माध्यमातून 1 ही रुपया न कमविता अशा काही संस्था जर चालवायला तयार असतील तर याही प्रश्नाला आपण समोर जावे अशी माझी विनंती आहे.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, नारी घाट आहे. त्या घाटाचे भुमिपुजन दटके साहेबांनी केले होते. त्या घाटावरील कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात यावी.

महापौर :– प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. निगम सचिवांनी स्थगन प्रस्तावाचे वाचन करावे.

निगम सचिवः– मा.सदस्य, श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी नागपूर महानगरपालिका कामकाज नियमावली 1 (X) अन्वये स्थगण प्रस्तावाची नोटीस दिली आहे. त्याचा मजकूर याप्रमाणे आहे. नागपूर

शहरातील भीषण पाणी टंचाई अनियमित पाणीपुरवठा व असमान पाणीपुरवठयामुळे शहरातील नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. त्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी चर्चा उपस्थित करण्यास स्थगन प्रस्ताव मान्य करुन चर्चा उपस्थित करण्यासाठी आपण अनुमती प्रदान करावी. प्रस्तावक मा.सदस्य श्री. प्रफुल्ल गुडधे आणि अनुमोदक मा.सदस्या प्रणिता शहाणे.

मा.महापौरजी, सन्माननिय ॲड.धर्मपाल मेश्राम यांनी एक स्थगन प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या स्थगन प्रस्तावाचा मजकूर याप्रमाणे आहे. शहरातील पाणी प्रश्नावर चर्चा घडवून आणण्यासाठी स्थगन प्रस्ताव.

महापौर :— स्थगन प्रस्तावावर चर्चा करण्याची अनुमती आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, पाणी प्रश्नावर जून महिना झाला आज 20 तारीख आहे. 20 तारखेला आपण चर्चा घेत आहे. नागपूर शहरामध्ये पाणी प्रश्न अत्यंत गंभीर आहे. मागच्या वर्षी आपण 7 डिसेंबरला पाणीप्रश्नावर भर हिवाळयामध्ये चर्चा केली. 7 डिसेंबरला हिवाळा होता, पाण्याचा तेवढा काही गंभीर प्रश्न नव्हता. परंतु पाण्याचा गंभीर प्रश्न नसतांना मात्र वितरणाचा जो प्रश्न होता, त्या वितरणाच्या प्रश्नाच्या संदर्भामध्ये या नगरसेवकांनी आपआपल्या भावना या सभागृहामध्ये व्यक्त केल्या. मा.महापौरजी, नेहमीच येतो उन्हाळा, दरवर्षी उन्हाळा येतो आणि दरवर्षी आपण पाणीप्रश्नावर चर्चा घेत असतो. आणि सर्व सन्माननिय सदस्य त्यावर साधकबाधक चर्चा करीत असतात. नेमका नागपूर शहरामध्ये पाणी प्रश्न आहे काय? आणि कुठल्या स्वरुपाचा आहे. मुळतः पाण्याची उपलब्धता नाही. नागपूर शहराची लोकसंख्या वाढली, याचे काही कॉम्बीनेशन बसून राहिले आहे काय? यावर सातत्याने या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. पाण्याची उपलब्धता आहे. डिसेंबर महिन्यामध्ये पण होती. तरी डिसेंबर महिन्यामध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. हा प्रश्न नेमका पाण्याचा होता की, वितरणाचा प्रश्न होता. पाण्यावर जून महिन्यामध्ये चर्चा करीत असतांना पुन्हा वितरणाच्या प्रश्नावर चर्चा घेवून राहिलो की, पिण्याच्या पाण्यावर चर्चा करीत आहे. मा.महापौरजी, लोकसभेची निवडणूक झाली. 23 तारखेला मतगणना झाल्यानंतर आचारसंहिता उठली. जवळ जवळ 1 महिना 3 दिवस होती. पण या 1 महिन्यामध्ये आपण कुठलेही पाण्याच्या संदर्भामध्ये या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित केलेली नाही. जर सत्तापक्ष ती चर्चा उपस्थित करणार नसेल, तर विरोधी पक्षाची त्या चर्चेची मागणी केली पाहिजे असे वर्तमानपत्रामध्ये मोठया प्रमाणात येते. की विरोधी पक्ष सुध्दा गंभीर नाही. पाणी प्रश्नावर ज्या पध्दतीने लोक बोलत आहे. पाणी प्रश्न काही गंभीर नाही पाण्याची उपलब्धता भरपूर आहे. आणि मा.महापौरजी, वेळोवेळी वर्तमानपत्रामध्ये सन्माननिय पालकमंत्री असतील, सन्माननिय महापौर, स्वतः असतील, सन्माननिय सत्तापक्ष असतील, सन्माननिय स्थायी समिती अध्यक्ष असतील, पाणी पुरवठा समितीचे सन्माननिय अध्यक्ष असतील, त्या सर्व लोकांनी वर्तमानपत्राच्या माध्यमातून नागपूर शहरातील नागरिकांना एक भरवसा दिला आहे की नागपूर शहरामध्ये कुठलिही पाण्याची टंचाई नाही. नागपूर शहरामध्ये पाण्याची टंचाई नाही अशा पध्दतीचे स्टेटमेंट वर्तमान पत्राच्या माध्यमातून दिले आहे. वास्तविक खरोखर पाण्याची टंचाई नाही काय? जर पाण्याची टंचाई आहे तर नागपूर शहरामध्ये दरवर्षी निघणारे मोर्चे निघाले नाही. नागरिकांचे मोर्चे निघत नाही. जर मोर्चे निघत नाही तर पाण्याची टंचाई नाही असा समज आपण केला आहे. मा.महापौरजी पहिले घागर मोर्चे निघत होते. त्याची तालीम आपल्याला अधिक होती. विरोधी पक्ष तालीमीमध्ये कमी पडतो.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, मी आपणास विनंती करतो की, महानगरपालिकेच्या कुठल्याच पदाधिकाऱ्यांनी पाण्याची स्थिती मुबलक आहे किंवा चांगली आहे असे स्अेटमेंट दिले नाही. पाणी कमी पडु देणार नाही. असे स्टेटमेट आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, शब्दाचा शब्दशेल आपण करु शकता, एका विशीष्ट तालमीमध्ये तयार झाले असल्यामुळे आपण निश्चितपणाने त्याचा शब्दशेल करु शकता. आपण तालीम घेवून बोलून राहिले आहे. मा.महापौरजी, पाण्याची कमतरता भासू देणार नाही. आणि पाण्याची स्थिती व्यवस्थीत आहे. यामध्ये मला तरी खूप जास्त फरक वाटत नाही. या ठिकाणी वर्तमानपत्रानी जर खोटया बातम्या छापल्या असतील तर मग भाग निराळा.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, मी परत एकदा विनंती करतो की कुठल्या पदाधिकाऱ्यांनी असे स्टेटमेंट दिले हे त्यांनी सांगुन दयावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, मा.पालकमंत्र्यांचे स्टेटमेंट आहे.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, ते स्टेटमेंट असे होते की पाण्याची कमतरता पडु देणार नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, पाण्याची कमतरता पडु देणार नाही. हा जो विषय या ठिकाणी दटके साहेबांनी सांगितले ते अगदी बरोबर आहे. आम्ही पाण्याची कमतरता पडु देणार नाही. प्रसंगी मृत साठा सुध्दा आम्ही उचल करु आणि नागपूर शहराची पिण्याच्या पाण्याची गरज आम्ही भागवू, या शहरातील नागरिकांना आम्ही पिण्याचे पाणी कमी पडु देणार नाही असे स्टेटमेंट आले. मा.महापौरजी, आपण मा.मुख्यमंत्र्यांची 14 एप्रिलला भेट घेतली, आणि मा.मुख्यमंत्र्यांना आपण निवेदन केले की, पाण्याचा मृत साठा जो आहे पेंच धरणातील तो वापरण्याची आपण परवानगी दयावी. आणि मा.महापौरजी, 15 तारखेला एक बातमी आली की निवेदन पण दिले आणि सोबत सोबत आपल्याला परवानगी पण मिळाली, मा.महापौरजी एका दिवसामध्ये शासनाने आपल्याला मृत साठा वापरण्याची परवानगी दिली, अशा वर्तमानपत्रामध्ये बातम्या प्रसिध्द झाल्या,मा.महापौरजी, त्याची माहिती आपण सभागृहाला दयावी. पेंच धरणातील मृत साठा उचलण्याची परवानगी राज्य शासनाने आणि वॉटर कमीशनने दिलेली आहे काय? आणि दिली असल्यास कोणत्या तारखेला दिली त्याचे पत्र उपलब्ध आहे काय त्याची माहिती प्रशासनाने सभागृहाला दयावी.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, हा प्रश्नोत्तराचा तास नाही. की एक–एक प्रश्न विचारला जातील आणि एका–एका प्रश्नावरती उत्तर दिल्या जातील, हा स्थगन प्रस्ताव आहे. आपल्याला जे बोलायचे आहे ते बोलावे नंतर एकत्रित उत्तर देण्यात येईल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी जे सांगितले आहे ते मी मान्य करतो. मान्य केले पाहिजे लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे म्हणणे सुध्दा मान्य केले पाहिजे, सत्तापक्षाचे म्हणणे सुध्दा मान्य केले पाहिजे. ते संख्येने किती आहे हे तेवढे महत्वाचे नाही. काल मा.पंतप्रधानांनी लोकसभेमध्ये म्हटले की संख्येवर आम्ही विश्वास ठेवत नाही. पण दुर्देवाने आपण संख्येवर विश्वास करतो आहे. माझ्याकडे प्रचंड बहुमत आहे. आणि बहुमताच्या बळावर आम्ही वाटेल तसे कामकाज आम्ही रेटु शकतो अशा पध्दतीची भावना आपली सुरुवातीपासुन राहिली, निदान आता तरी आपण मा.पंतप्रधानांचे अवलोकन करावे, बहुमतापेक्षा विरोधी पक्ष अल्प संख्येमध्ये जरी असले....

ॲड.धर्मपाल मेश्राम :– मा.महापौरजी, चर्चा भरकटत आहे मला असे वाटते. अत्यंत महत्वाचा विषय आहे. स्थगन प्रस्तावावर आपण चर्चा करीत आहे. पिण्याच्या पाण्यावर, उपलब्ध जलसाठयावर, वितरण व्यवस्थेवर, येणाऱ्या अडचणींवर, आणि ज्या काही कोर्टाच्या भानगडी समोर सुरु आहे त्यावर देखील आपण चर्चा करीत आहे. मी सर्व सदस्यांना या ठिकाणी नम्र विनंती करेल, की त्यांनी उपाययोजना वर देखील चर्चा केली पाहिजे. आपण जे काही धोरण ठरविण्यासाठी, नियम तयार करण्यासाठी किंवा विषयांना ज्या पध्दतीने रेटण्यासाठी पुढे आलेलो आहेत त्यामध्ये उपाययोजना सूचविणे हे देखील अत्यंत महत्वाचे आहे असे मी समजतो.

श्री.प्रफुल्ल गुडधेः–मा.महापौरजी, सन्माननिय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले, की या उपाययोजना कुठल्या असल्या पाहिजे. याची चर्चा नव्याने करण्याची आवश्यकता नाही. या सभागृहामध्ये या आधी चर्चा झालेली आहे. आपण ओ.सी.डब्लु. सोबत झालेला करारनामा वाचुन पहा, यामध्ये सर्व उत्तर आहे. सन्माननिय सदस्य वकील आहे. त्यांनी तो करारनामा वाचावा आणि स्वतः करारनाम्याच्या तरतुदीच्या अनुषंगाने उपाययोजना शोधाव्या. मा.महापौरजी त्यांना आता पाणीपुरवठा समितीचे सभापती पद जर दिले तर बरे होईल.

ॲड.धर्मपाल मेश्रामः–मा.महापौरजी,ही जबाबदारी एकटया पाणीपुरवठा समितीच्या सभापतीची नाही. ही जबाबदारी किंबहुना मा.आयुक्तांची, मा.महापौरांची, मा.सत्तापक्ष नेत्यांची नाही, ही जबाबदारी या सभागृहात बसलेल्या प्रत्येक सदस्यांची आहे. ही जबाबदारी नागपूर शहरातील सर्व नागरिकांची आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :– मा.महापौरजी, पाणी ही बेसीक निड आहे. आणि ते शासनाचे आद्यकर्तव्य आहे. साठा करणे, पुरवठा करणे, नियोजन करणे, विनियोग करणे हे शासन आणि प्रशासनाचे आद्यकर्तव्य आहे.

ॲड.धर्मपाल मेश्राम :– मा.महापौरजी, आपण देखील त्याच शासनाचा एक भाग आहे हे समजून घ्यावे.

श्री.प्रफुल्ल गुडधेः– मा.महापौरजी, ओ.सी.डब्लु. सोबत जो करारनामा केला. त्या करारनाम्यामध्ये सर्व बाबी अंतर्भुत आहे. मा.महापौरजी, मी नव्याने काहीच सांगणार नाही. 7 तारखेच्या विशेष सभेचे प्रोसेडिंग सुध्दा या सभेमध्ये आहे. आणि या विषयपत्रिकेच्या सोबत असलेल्या प्रोसिडींगमध्ये वितरण व्यवस्थेतील

अडचणी आजही नागपूर शहरामध्ये पर्याप्त पाणीसाठा आहे. जरी तो कमी असला, आणि मान्सुन लांबणीवर जात असला तरी पाण्याची जी उचल होत आहे. मा.महापौरजी, आज 700 एम.एल.डी. पर्यंत उचल ही नागपूर शहरात होत आहे. ही लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये कितीतरी अधिक प्रमाणात होत आहे. मा. महापौरजी, पाण्याची उपलब्धता आहे. मात्र जे वितरण व्यवस्थेतील दोष आहे. ते दोष दुर करण्याच्या दृष्टीकोणातून, सर्व सभागृहातील चर्चेचा आपण जर तपशील घेतला, आपण ऐन हिवाळयामध्ये जी चर्चा केली, त्या चर्चेला उत्तर देतांना सन्माननिय सत्तापक्षांनी त्यांचे भाषण पुन्हा एकदा वाचुन दाखवावे, त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी ज्या उपाययोजना सुचविल्या, त्या उपाययोजना वर प्रशासनानी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी होती. त्या सुचनांची अंमलबजावणी करून घेतली काय? मुळतः हा माझा प्रश्न आहे. मा.महापौरजी, मागच्या सभेमध्ये मी सांगितले होते की याच्यावर एक ॲक्शन टेकन रिपोर्ट तुम्ही तयार करा. पाण्याची उपलब्धता किती आहे, नेटवर्क ऐरियातील पॉप्युलेशन किती आहे. 24 बाय 7 योजना कुठल्या भागामध्ये आपण पुर्णत्वास आणणर आहे. कुठल्या भागामध्ये 24 बाय 7 योजना आणल्या गेली नाही. त्याच्या मागचे कारणे काय ? त्याला जबाबदार कोण? या संदर्भातील ॲक्शन टेकन रिपोर्ट, मा. महापौरजी, या संदर्भातील सूचना मी केली होती. त्यावेळचा ए.टी.आर. आणि आजचा विषय सर्व सारखे आहे. जवळपास सारखे विषय आहे. परंतु त्यावर ॲक्शन हे प्रशासनाला घ्यायचे आहे. आणि हे जर ॲक्शन प्रशासन घेत नसेल तर ते निश्चित चुकीचे आहे. मा.महापौरांना माझी विनंती आहे की, प्रशासनाला शेवटची तंबी आपण दयावी, अशा अधिकाऱ्यांवर कडक कारवाई आपण आणि हे सभागृह सुचवू ती कारवाई 100 टक्के करण्यात यावी. मा.महापौरजी, सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो विषय ठेवला की ॲक्शन टेकन रिपोर्ट या ठिकाणी तयार आहे काय? आपण एकत्रित उत्तर दयावे. प्रशासनाच्या माध्यमातुन असा कुठलाही ॲक्शन टेकन रिपोर्ट तयार झालेला नाही. जर केला नसेल तर प्रशासनातील कुठल्या अधिकाऱ्यांना आपण त्यासाठी जबाबदार धरतो. आणि ती जबाबदारी जर निश्चित केली असेल? तर कोणती कारवाई केली आहे. या ठिकाणी गॅरंटी दिली की 100 टक्के आम्ही कारवाई करु. मा. महापौरजी, मोमीनपुऱ्याच्या पाणीपुरवठयाच्या संदर्भात देखील चर्चा झाली. त्यामध्ये सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी म्हटले की नगरसेवकांमुळे हा पाणीपुरवठा जबाबदार होत आहे. नगरसेवकांच्या धमक्या आहे. आणि त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की 4 महिन्यानंतर व्हीडीयो येतील की कुठले नगरसेवक कशा पध्दतीने आपण बोलले आहे. ते येणार आहे. अबे पानी तो लेके देख, अबे कनेक्शन तो मोमीनपुरा मे लेके दिखा, पुर्ण जबाबदारीने रेकॉर्ड वर बोलत आहे. हे सर्व व्हीडीयो जपून ठेवले आहे. मग याला जबाबदारी कोणाची. मा.महापौरजी, एखादा नगरसेवक, त्या भागामध्ये जर पाणीपुरवठा प्रभावित करीत आहे. या ठिकाणी आपण समर्थन केले की, अशुध्द पाण्याचा पुरवठा होवुन राहिला. मान्य केले की अशुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे. डिसेंबर महिन्यामध्ये मान्य केले, आज जून महिना सुरु आहे. आज 6 महिन्यामध्ये अशुध्द पाण्यामध्ये आपण किती सुधारणा केली. किती कंझुमरकडे अशुध्द पाण्याचा पुरवठा होत होता मात्र आता शुध्द पाण्याचा पुरवठा होत आहे. याची काही आकडेवारी आहे. आणि पाणीपुरवठा करीत असतांना फक्त म्हणतो की रिकव्हरी होवुन राहिली नाही. पैसे आलेले नाही. वितरण व्यवस्थेमध्ये दुसरा त्यांचा जो दावा आहे. धरमपेठ झोनमध्ये बिलींग होते फक्त 56 टक्के, मा.महापौरजी ती जबाबदारी आपण ओ.सी.डब्लु. च्या करारनाम्यामध्ये निश्चित करुन दिली आहे. 56 टक्के बिलींग होते याला नगरसेवक जबाबदार आहे. जर नगरसेवक जबाबदार असतील तर असे कुठले नगरसेवक आहे की ज्यांच्यामुळे हे 56 टक्के बिलींग होत आहे. मा.महापौरजी, या संदर्भात आपण कुठली चर्चा करणार आहे काय ? पाण्याच्या प्रश्नाच्या संदर्भामध्ये समान पाणीवितरण व्हायला पाहिजे. आणि आपण प्रिसींपली मान्य केले की समान पाणी वितरण व्हायला पाहिजे. आपण वर्तमानपत्रामधुन जाहीर केले की कुठलीही कपात नाही. आता सभागृहामध्ये आपण स्पेसिफीक उत्तर दिले पाहिजे की, नागपूर शहरातील नागरिकांना आम्ही 100 लिटर पर मानसी पाणी देणार आहे. 120 लिटर देणार आहोत, 130 लिटर देणार आहोत, त्यामध्ये काही कपात करणार आहे. त्यामध्ये स्टॅन्डर्ड काय आहे. आणि पाण्याच्या उपलब्धतेप्रमाणे आपले जे नियोजन आहे पुढच्या महिन्यापर्यतचे त्या नियोजनामध्ये महानगरपालिकेची क्षमता फक्त 100 लिटर पाण्याची आहे. आणि या शहरातील सर्व नागरिकांना आम्ही 100 लिटर पाणी उपलब्ध करुन देवु, मा.महापौरजी, या शहरातील नागरिक मान्य करतील, आणि आम्ही देखील मान्य करु की पाणी कपात जर होत असेल, तर समसमान पाणी कपात झाली पाहिजे. मग इंदोऱ्यातील लोकांना वेगळी पाणी कपात, धरमपेठ मधील लोकांना वेगळी पाणी कपात, पार्डीच्या लोकांना वेगळी पाणी कपात, जयताळाच्या लोकांना वेगळी पाणी कपात मा.

महापौरजी ही तफावत दुर करण्याची आवश्यकता आहे या संदर्भात आम्ही सातत्याने प्रश्न निर्माण केला. मग प्रशासनाकडुन या संदर्भात कुठली कारवाई झाली. आज महानगरपालिकेला माहिती नाही की आपण निश्चित किती पाणीपुरवठा करीत आहे. दरमानशी किती पाणी पुरवठा करायचा आहे. किती पाण्याची उपलब्धता आहे त्याचे काही कॅलकुलेशन नाही. मा.महापौरजी, म्हणुन आपण ओ.सी.डब्लु. सारखी एक एक्सपर्ट संस्था आणली होती. त्या संस्थेने या सर्व विषयाचे नियोजन केले पाहिजे, ती जबाबदारी निश्चित केली होती. मात्र ती जबाबदारी ती कंपनी पार पाडत नाही. त्याच्यावर प्रशासनाचे कुठलेही नियंत्रण नाही. कुठल्याही डेलीगेटला काहीही माहिती नाही. अशा पध्दतीने संपूर्ण नागपूर महानगरपालिकेच्या पाणीपूरवठा विभागाचे पुर्ण कामकाज चालु आहे. मा.महापौरजी, मी मोमीनपुरामध्ये गेलो, मा.विरोधी पक्ष नेत्यांनी दौरा ठेवला होता. आम्ही तीन मतदार संघामध्ये फिरलो साधारणतः 19 ते 20 तारखेला फिरलो, सन्माननिय सदस्य श्री.मनोज सांगोळे यांच्या परिसरामध्ये गेलो होतो तेथे पिण्याच्या पाण्याचा टाईमिंग दोन वेळचा आहे. सकाळी 8.30 ते 9.00 वाजेपर्यत त्याच्यानंतर पुन्हा अर्धातास बंद 9.30 ते 10.30 एका दिवशी दोन वेळा पाणीपुरवठा होत आहे. मी कारण विचारले अधिकाऱ्यांना असे का करतो. बाबा दिपसिंग नगर यामध्ये 7.30 ते 8.30 हा पिण्याच्या पाण्याचा टायमिंग आहे. दुसरा टायमिंग आहे 9.30 ते 10.30 म्हणजे 2 तास आपण पाणीपुरवठा करीत आहे. आणि बाबादिपसिंग नगर मध्ये प्रत्यक्ष मा.सदस्य श्री.मनोजभाऊ नव्हते त्यावेळी मा.सदस्य श्री.दिनेश यादव, मा.सदस्य श्री.कमलेश चौधरी होते.

ॲड.धर्मपाल मेश्राम :— स्थगन प्रस्तावावर मा.जेष्ठ सदस्य गुडधे साहेबांचे जर संपले असेल तर मी स्थगन प्रस्तावावर बोलु इच्छितो, कारण की त्यांच्याकडे विषय दिसत नाही.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, फायरच्या गाडया, चोकेजच्या गाडया या सार्वजनिक विहीरीवरुन भरायला पाहिजे. नागपूर शहरामध्ये अशा काही विहीरी आहे त्या 12 ही महिने पाणी देवु शकते, जसे लालगंजमध्ये बाहुली विहीर आहे अशा विहीरी वरुन फायर आणि चोकेजच्या गाडया भरायला पाहिजे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, मा.धर्मपाल मेश्राम साहेबांनी म्हटले की, यांच्याकडे काही मुद्दे नाही. एकदम बरोबर आहे मा.महापौरजी, हे जे मुद्दे आहे ते नव्याने मांडण्याची आवश्यकता नाही. या अगोदर या सभागृहामध्ये सर्व सन्माननिय सदस्यांनी मांडलेले आहे. त्यावर चर्चा झालेली आहे. नेमके प्राब्लेम काय आहे. त्यावर ॲक्शन टेकन रिपोर्ट आपण तयार करणार आहे काय? पाणी प्रश्नाच्या वितरण व्यवस्थेचे दोष आपल्या सकट प्रशासनाला सर्वांना माहिती आहे. त्यावर उपाययोजना प्रशासनाने काय केल्या आहे आणि किती दिवसात करणार आहोत, पाणी अजुनही 700 एम.एल.डी. पर डे ची उचल होत आहे. या ठिकाणी कार्यकारी अभियंता यांनी उत्तर देतांना सांगितले की त्या नवेगाव पासुन ते गोरेवाडा पर्यत पाणी येत आहे ते 425 एम.एल.डी. येत आहे म्हणजे याचा अर्थ पाणी आहे. म्हणजे पाणी वितरण व्यवस्थेचा प्रश्न आहे. अतिरिक्त पाणी उचलत आहे ते नियमित लोकांपर्यत कसे जाणार आहे या संदर्भातील ॲक्शन टेकन रिपोर्ट आपण सभागृहामध्ये कधी पर्यत सादर करणार आहोत आणि त्या रिपोर्टवर चर्चा करणे मला वाटते की ते संयुक्तीक होणार आहे.

ॲड.धर्मपाल मेश्राम :— मा.महापौरजी,....

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम यांना बसवा, यांना सांगा की कोणाचे भाषण चालु असतांना अशा पध्दतीचा अडथळा आणु नये, त्यांना जर कुठल्याही पध्दतीचे मत मांडायचे असेल, तर संसदीय आयुधाचा वापर करावा. त्यानंतर त्यांनी आपले मत मांडले पाहिजे. त्यांनी पॉइंट ऑफ ऑर्डर किंवा पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन घेवुन उभे रहायला पाहिजे. मा.महापौरजी आपण त्यांना समज दयावी.

ॲड.धर्मपाल मेश्राम :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी,ते महापौरांनी ठरवायचे की, कोणाला समज दयायची आहे, कोणाला नाही. मी म्हटले होते मा.जेष्ठ सदस्यांचे मुद्दे संपले आहे काय? त्यांनी आपल्या भाषणाचा पुनश्चः वाचन करावे, त्यांनी म्हटले की या सर्व गोष्टीवर चर्चा झालेली आहे. फक्त माझी विनंती ऐवढीच आहे. याचा दुसरा अर्थ काय आहे. याचा अर्थ असा आहे की त्यांच्या जवळचे मुद्दे आता संपले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, अशा पध्दतीने जर सभागृहाचे कामकाज चालत असेल, एवढया गंभीर विषयावर जर कोणी एवढया नॉनसिरिअस पध्दतीने जर बोलत असेल,

ॲड.धर्मपाल मेश्राम :— पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, आम्ही या विषयावर गंभीर नाही हा आरोप

चुकीचा आहे. जर गंभीर नसतो तर सत्तापक्षाचा नगरसेवक म्हणुन या विषयावर स्थगन प्रस्ताव दिला नसता.

श्री.दयाशंकर तिवारी :– मा.महापौरजी, सन्माननिय जेष्ठ सदस्य, श्री.प्रफुल्ल गुडधेजी इन्हे अपना भाषन पुर्ण करने दे। अगर किसी विषय पर आपको हरकत है, तो हरकत का मुद्या खडे करके, पॉइंट ऑफ ऑर्डर लेकर के उन्हे विराम करने के लिये कहे, यह विषय सामान्य चर्चा का नही है। क्योकी उन्हे इस विषयपर स्थगन प्रस्ताव दिया है। स्थगन प्रस्ताव मे मुल रुप से बाकी सदस्यों को भी मेरा निवेदन है की जैसे मनोज सांगोळे ने बीच में कहा। जिस व्यक्ती का स्थगन प्रस्ताव है उसने आपने भाषन को पुर्ण रुप से सदन के पटल पे रख देना चाहिये। प्रशासन भी उनका भाषन पुरा होने पर उत्तर देगें वह भी बीच मे हस्तक्षेप नही करेंगे, यह मुल भावना है। अगर उनके किसी शब्द के उपर मे सभागृह मे किसी सदस्यों को ऐतराज होता है तो उसने पॉइंट ऑफ ऑर्डर लेकर हस्तक्षेप करे अन्यथा न करे यह मेरा कृपापुर्ण निवेदन है।

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, मी भाषण करीत असतांना काही प्रश्न उपस्थित केले होते. सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी म्हटले की हा प्रश्नोत्तराचा तास नाही हा स्थगन प्रस्ताव आहे. आपण भाषण करावे. पक्षनेत्यांच्या मताचा मी सन्मान केला. या सभागृहाची परंम्परा आहे. मी चौथ्यांदा या सभागृहाचा सदस्य आहे. चौथ्यांदा सदस्य असतांना आमच्यापुढे काही आदर्श होते. दयाभैय्या आमचे आदर्श आहे. सभागृहाचे कामकाज आम्ही त्यांच्यापासून शिकलो आहे. दयाभैय्या नी भुमिका घ्यावी म्हणुन आम्ही त्यांच्याजवळ जावुन आम्ही त्यांच्याजवळ नाराजी व्यक्त करतो. सन्माननिय नानाजी शामकुळे होते, सन्माननिय अनिलजी सोले होते, सन्माननिय शेखर सावरबांधेजी होते. या संपूर्ण सभागृहाची एक परंम्परा राहिलेली आहे. आणि त्या सर्व लोकांचा आम्ही मानसन्मान केलेला आहे. मा.महापौरजी, सत्तापक्षांना माझी विनंती आहे. मी माझ्या पक्षांचा नेता असतो तर मी माझ्या पक्षांच्या सदस्यांना सांगितले असते, परंतु मी पक्षाचा नेता नाही. मी एक साधा नगरसेवक आहे. सत्तापक्षांना विनंती करतो की, आपण आपल्या सर्व नगरसेवकांचे ट्रेनिंग घ्यावे, सभागृहामध्ये इंटरविन करीत असतांना आपण कुणापुढे इंटरविन करीत आहे. मी या सभागृहाचा जेष्ठ सभासद आहे. हे आठवणीने या सभागृहात सांगतो. हा पोरखेळ लावलेला आहे. मा.महापौरजी मी चेअरचा सन्मान करतो.

ॲड.धर्मपाल मेश्राम :– पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, सत्तापक्षांनी काय करायचे आहे ते सत्तापक्ष नेत्यांनी ठरवायचे आहे. विरोधी पक्षाने काय करायचे आहे ते विरोधी पक्ष नेत्यांनी ठरवायचे आहे. आणि कोण कोणाचे किती ऐकतो ते सभागृहामध्ये सर्व विदीतच आहे. ते शहराने पाहिलेले आहे. मी सत्तापक्षांचे आदर निश्चितपणे करतो, पण ही चर्चा ज्या स्थगन प्रस्तावाच्या संदर्भात सुरु आहे ती चर्चा वारंवार भरकटल्या जात आहे. असतीलही कोणी चौथ्यांदा, पाचव्यांदा, दहाव्यांदा, याचा अर्थ असा नाही की त्यांना सर्वच कायद्याचे ज्ञान आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, बाकी कुठल्याही अन्य सदस्यांनी आक्षेप व्यक्त केला असता तर मी समजु शकलो असतो. मा.महापौरजी, हे सन्माननिय सदस्य एल.एल.बी. आहे. कायद्याचे ज्ञान आहे यांना, यांना राज्यशास्त्र माहित आहे. सभागृहाची नियमावली माहिती आहे, ही लोकशाही माहित आहे. या लोकशाहीचे फंग्शनिंग कसे होते ते फक्त संख्याबळावर होत नाही. त्याची व्हॅल्युव आहे त्याचे मुल्य आहे त्या मुल्यांच्या आधारावर ही लोकशाही रन होते. आणि त्यांना माझा आदर करावा ही अपेक्षा नाही. मी त्याची कधी डिमांडही करीत नाही. मी तशी मागणी पण केली नाही. ठीक आहे तो विषय संपवितो. पिण्याच्या पाण्याचा गंभीर विषय आहे. सातत्याने याच्यावर चर्चा होत आहे. माझी एकमेव मागणी आहे की पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात ॲक्शन टेकन रिपोर्ट आपण ज्या पध्दतीने मान्य केला, सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी मान्य केला मा.महापौरजी, आपण त्यावर रुलिंग दिले तो ॲक्शन टेकन रिपोर्ट 6 महिन्यानंतर तयार झाला काय? हा पहिला प्रश्न, दुसरा प्रश्न असा आहे की, तो जर रिपोर्ट तयार झाला तर तो पुढच्या सभागृहामध्ये केव्हा सादर करणार आहेत, किंवा दोन तीन दिवसात पुन्हा सभागृह घेणार आहे काय? आणि तो जर तयार झाला नसेल, तर तो का तयार झाला नाही, त्याला कोण जबाबदार आहे. ती जबाबदारी कोणी स्वीकारणार आहे काय? हा दुसरा प्रश्न, तिसरा प्रश्न हा माझा असा आहे की नागपूर शहरातील नागरिकांना आपण किती लिटर पाण्याची उपलब्धता करुन देत आहे. 100 लिटर, 125 लिटर, 135 लिटर, याची निश्चित आहे काय? त्यामध्ये कुठली कपात केली आहे काय? ती कपात आपण कधी पर्यंत करणार आहे त्याचे आपण नियोजन केले आहे काय? हा तिसरा प्रश्न, चौथा प्रश्न असा आहे की,

लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान आपण ओसीडब्लु ने पेंच मधुन जी अतिरिक्त पाण्याची उचल केली ही गोष्ट खरी आहे काय ? 10 मार्च पासुन 12 एप्रिलच्या दरम्यान ओसी.डब्लु. ने अतिरिक्त पाण्याची उचल केली 695 पासुन 553 एम.एल.डी. पर्यत केलेली आहे. अशा बातम्या वर्तमानपत्रामध्ये आलेल्या होत्या त्याची सत्य असत्यता किती आहे. अशी  परवानगी प्रशासनानी दिली होती काय? दिली होती तर कुठल्या कारणाव्दारे दिली होती. एप्रिल महिन्यामध्ये 753 एम.एल.डी. पर्यत जर पाणीपुरवठा केला होता. एप्रिल 11 नंतर आपण तो का कमी केला. याचे नेमके कारणे काय? या संदर्भातील ॲक्शन टेकन रिपोर्ट या सभागृहामध्ये जो पर्यत सादर होत नाही तो पर्यत अशा कुठल्याही चर्चा वांझोटया आहे. यातुन काहीही निष्पन्न होणार नाही. आपण सातत्याने या चर्चा करतो परंतु यामधुन काहीही निष्पन्न होणार नाही. मा. महापौर आपल्या माध्यमातुन, सत्तापक्षांच्या माध्यमातुन, हे उत्तर अपेक्षित आहे. सोबतच जो मृत साठयाचा जो आपण उचल करीत आहे. त्या मृत साठा उचलण्याची परवानगी आपल्याला प्राधीकरणाने दिलेली आहे काय? कुठल्या तारखेला दिली आणि त्याची उचल आपण कुठल्या तारखेपासून करीत आहे. या सर्व विषयाचा आपण सविस्तर अहवाल कधीपर्यत सभागृहात ठेवणार आहे ही अपेक्षा मी या ठिकाणी व्यक्त करतो. पाणी प्रश्नाच्या गंभीर विषयावर मला येथे बोलण्याची संधी प्रदान केली. या वातारणामध्ये अशी संधी मिळणे दुरापास्त आहे. हे असतांना सुध्दा आपण ही संधी मला प्रदान केली, त्या बद्दल मी मनपुर्वक आपले आभार मानतो, हा पाणी प्रश्न आपण किती गांभीर्याने सोडविता, हे आपल्यावर अवलंबुन आहे. प्रशासन त्यामध्ये किती गंभीर्याने राहते ते आपल्यावर अवलंबुन आहे. आमचे सहकार्य ज्या ठिकाणी गरजेचे आहे त्या ठिकाणी निश्चितपणाने विरोधी पक्षांचा एक जबाबदार नगरसेवक म्हणून सत्तापक्षाला आणि प्रशासनाला सहकार्य करण्याची आमची भुमिका आहे. मात्र एकतर्फी कारभारातुन, आम्ही म्हणतो तेच खरे, आम्ही म्हणतो तेच मान्य करा, तेच सत्य आहे असा अट्टाहास जर आपण करीत असाल, तो अट्टाहास पुर्ण करणार नाही. आणि त्याचा विरोध केल्याशिवाय राहणार नाही. मी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या संदर्भात ॲक्शन टेकन रिपोर्ट आपण कधी पर्यत देणार आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, पाण्याच्या गंभीर प्रश्नावर मा.जेष्ठ सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे पाटील यांनी या ठिकाणी त्यांनी स्थगन प्रस्ताव आणला, या ठिकाणी त्यांनी सविस्तर चर्चा केली, पाण्याची परिस्थिती, पाणी जरी मुबलक नसले तरी, पाणी लोकांना समान पध्दतीने मिळाले पाहिजे. पाण्याचे समान वितरण झाले पाहिजे, त्या संबंधामध्ये मा.आयुक्तांना आमचे सर्व नगरसेवकांचे लिखीत पध्दतीने निवेदन देण्यात आलेले आहे आणि त्यांच्याशी चर्चा झाली मा.महापौरांशी देखील चर्चा झाली. संबंधित अधिकाऱ्यांना मा.आयुक्तांनी आदेश दिले की आपण विविध नगरसेवकांच्या भागात जेथे समस्या असतील त्या भागात जावून प्रत्यक्ष पहाणी करावी. आम्ही नागपूर शहराच्या अनेक भागामध्ये माझ्यासह अनेक नगरसेवक होते. नगरसेवकांच्या प्रभागामध्ये अत्यंत गंभीर प्रश्न आहे. आम्ही उत्तर नागपूरला, मनोजभाऊ सांगोळे यांच्या प्रभागात गेलो होतो, त्या ठिकाणी टाकीच्या खाली इतकी घाण की ते पाणी पाहिल्यानंतर आपल्याला उलटया येतील, अशा प्रकारची परिस्थिती त्या ठिकाणी निर्माण झाली होती. कार्यकारी अभियंता, जलप्रदाय त्यावेळी आमच्या सोबत उपस्थित होत्या, आपण जर सतर्क राहिलो नाही, आपण गोष्टी करतो, की आम्हाला शुध्द पाणी मिळाले पाहिजे, अशुध्द पाण्यावर आपण उपाययोजना करु, अनेक ठिकाणी अशुध्द पाणी आणि असमानतेचा व्यवसाय या ठिकाणी आम्हाला पाणी वितरणामध्ये दिसला, त्याच्यामध्ये समान वितरण पध्दती दिसली नाही. निवडणूकीच्या पुर्वी याच सभागृहामध्ये मा.पालकमंत्र्यांनी मिटींग ठेवली होती आणि त्यांनी गंभीरतेने सांगितले या सभागृहामध्ये पाण्याची समस्या येणार आहे. त्यामुळे समान पाणी वितरण पध्दती ताबडतोब करावी, विहीरी साफ कराव्यात, विहीरींवर पंप लावावे, जेथे अतिरिक्त पाणीसाठा आहे तो उपयोगात आणावा, त्यामुळे आपल्याला भविष्यामध्ये पाणी मिळेल, आणि आपला जो साठा आहे तो आपल्याला पुर्ण उन्हाळयाभर मिळेल, परंतु अशी काही परिस्थिती झाली नाही. एकीकडे 24 तास पाणी मिळते, कुठे दोन तास पाणी मिळते, कुठे मिळत नाही. कुठे टॅकर येत नाही. कुठे टॅकरचे हायड्रंन्ट बंद होवुन जाते. एक ते दोन ट्रिप काही लोकांना मिळते काही लोकांना मिळत नाही. मा.महापौरांशी चर्चा केली, परंतु सर्व नगरसेवक आपआपल्या भागामध्ये त्रस्त आहे. मोमीनपुऱ्यासारख्या भागामध्ये काही ठिकाणी पाणी देण्याचा त्यांनी प्रयत्न केला परंतु काही ठिकाणी पाणी अशुध्द आहे. ओसीडब्लु. ला आपण आदेश दयावे, ओ.सी.डब्लु जर अशुध्द पाणी देत असेल, तर आपण पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्यावर कायद्यानुसार एफ.आय.आर. दाखल करु शकतो. अनेक ठिकाणी सातत्याने पाणी वाहते आहे असे अनेक व्हीडीयो मी सातत्याने पाठविले आहे. त्याच्यामध्ये लाखो लिटर पाणी लिकेजेस मधुन वाहते आहे. ते लाखो लिटर

पाणी जर आपण लिकेजेस मधुन वाचविले असते तर महिनाभर पाणी आपल्याला पुरले असते इतके पाणी लिकेजेस मधुन वाहते आहे त्याची गंभीरता कोणीही घेत नाही.

श्री.जुल्फेकार भुट्टो :— मा.महापौरजी, मोमीनपुरा मे बहोत सारी जगह मे लाईन डालने का काम बाकी है। बहोत धीमी गतीसे ओसीडब्लु. का काम चल रहा है। पिछले 5 से 6 साल पहिले ओसीडब्लु वाले वहापर लाईन डालना चाहते थे, कई जगह वहापर लोगो ने लाईन नही डालने दी, उसके बाद हमने लोगों को समझाया, अच्छा पानी मिलेगा लोग बिमारी से बचेंगे। दुषित पानी जो वेस्ट हो रहा वह वेस्ट नही होंगा। उनको समझाके बताया, उसके बाद वह क्षेत्र मे पाईप लाईन डलवाने के लिये तैयार हो गये। 20 दिन के पहले वहापर सभी लोगों ने दौरा किया था । रमजान का महिना चालु होने के कारण हमने नया काम चालु नही करने को बताया था। हमकों आश्वासन मिला था की रमजान के दुसरे तिसरे दिन यह काम चालु हो जायेंगा, लेकीन कुछ जगह डली थी वहापर नये कनेक्शन देने का काम चालु है, और नयी पाईप लाईन 3 से 4 किलोमिटर वहापर लाईन डालना है, वहापर लाईन डालने के काम नही हो रहा है। हमे कारन बताया जाता है की वहापर जो काम करनेवाले कॉट्रॅक्टर है वह नही आ रहे है। तो मेरी आपसे रिक्वेस्ट है की वह काम जल्द से जल्द शुरु किया जाया। और मोमीनपुरा प्रभाग मे स्वच्छ पाणी देने की कृपा करे ।

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, यावर सविस्तर चर्चा आपण यावर केलेली आहे. येणाऱ्या दिवसांमध्ये नागरिकांना स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे. मा.नगरसेवकांना जो त्रास होत आहे त्यांच्या भागामध्ये त्या त्रासातुन मुक्त करण्याचे कामाचे आपण प्रशासनाला निदेश दयावे अशी मी आपणांस विनंती करतो. (बेल)

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, एका अत्यंत महत्वाच्या स्थगन प्रस्तावावर चर्चा या ठिकाणी सन्माननिय प्रफुल्ल गुडधे यांनी या ठिकाणी घेतली. मी सर्वप्रथम आपले मनापासून अभिनंदन करतो की आपण हा प्रस्ताव या ठिकाणी स्वीकारला, हा प्रस्ताव या ठिकाणी स्वीकारुन याच्यावरती सन्माननिय प्रफुल्लजी गुडधे यांना आपला प्रश्न या ठिकाणी ठेवायला संधी दिली. बोलतांना आपल्या भाषणामध्ये त्यांनी सांगितले, आम्ही म्हणतो तेच करा, या पध्दतीची भुमिका तुमची असते, स्थगन प्रस्तावावर माझ्या प्रभागातील समस्या मी सांगतो. त्या देखील आम्ही ऐकण्याचा प्रयत्न केला. परंतु एकीकडे सन्माननिय सदस्य श्री. प्रफुल्लजी गुडधे असे म्हणाले या ठिकाणी आपल्या सदस्यांना आपण शिकवले पाहिजे, आपल्या सदस्यांचा आपण वर्ग घेतला पाहिजे. मा.महापौरजी, हा भारतीय जनता पक्ष आहे. या ठिकाणी 112 सदस्य आहे. या ठिकाणी 112 सदस्यांना इच्छा असतांना देखील नेता जर उभा आहे तर इच्छा असतांना उभे होण्याचे धारीष्ठ देखील दाखवत नाही. त्याला कारण असे आहे की नियम आहे. त्यांना माहिती आहे की आपला सत्तापक्ष नेता उभा आहे तर तो उभा असतांना, तो बोलत असतांना मी काहीही बोलणार नाही ही आमच्या ठिकाणची शिस्त आहे आणि दुसरीकडे तुमचे विरोधी पक्षनेता बोलत असतांना मागुन एक जण बोलतो मग दुसरा जण बोलत आहे. हे तुमच्या पक्षाची शिस्त आहे. त्यामुळे आमच्या पक्षातील लोकांना काय शिकवायचे हा आमचा विषय आहे. या संपूर्ण सदनाला माहिती आहे की, प्रफुल्लजी ज्या वर्षी निवडुन आले त्याच वर्षी मी देखील निवडुन आलो, प्रविणजी देखील निवडुन आले. 2002 पासून आम्ही या सदनाचे संपूर्ण काम बघत आहे. मा.सुनिलभैय्या, मा.दयाभैय्या, मा.तानाजी वनवे त्या पुर्वी एकदा निवडुन आलेले होते. या सदनाची गरिमा आम्ही देखील बघितली आहे. या सदनामधले संपूर्ण व्यवहार आम्ही देखील बघितले आहे. मागचे 15 वर्ष या सदनाने अनुभवलेले आहे नियमामध्ये कोण वागले, कोण वागले नाही. नियमामध्ये नसतांना एक नव्हे तर 30—30 सदस्यांना उचलुन या सदनातुन बाहेर नेण्याचे धारीष्ठ कुठल्या पक्षाच्या महापौरांनी दाखविले हे देखील सदनाला माहिती आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधेः— मा.महापौरजी, मी व्यक्तव्य करीत असतांना माझ्याकडुन काही चुक झाली काय हे सत्तापक्ष नेत्यांनी सांगावे, मी निश्चितपणाने मान्य करायला तयार आहे.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, ज्यावेळी आपण बोललात त्यावेळी आपली चुक निश्चित झालेली नाही. परंतु आपण बोलत असतांना असे म्हटले की सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी आपल्या नगरसेवकांचा वर्ग घ्यावा.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, ही अपेक्षा रास्त आहे.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, 100 टक्के आपली अपेक्षा रास्त आहे. परंतु जेष्ठ सदस्य म्हणुन तुम्ही आपल्याला सांगत आहे तेव्हा आपल्याही कारकीर्दीमध्ये काय काय झाले, आणि या सदनाने काय

काय बघितले, हे देखील सांगणे माझे काम आहे. आणि ते मी केलेले आहे. बाकी दुसरे मी काहीच केलेले नाही. आणि त्यामुळे जो विषय आहे तो विषय निश्चित गंभीर आहे. एक गोष्ट या ठिकाणी मी कबुल करतो. प्रशासनाच्या संदर्भात मी तिव्र नाराजी या ठिकाणी व्यक्त करतो. या ठिकाणी ॲक्शन टेकन रिपोर्ट ठेवायला सांगितला होता. मध्यंतरीच्या कालावधीमध्ये आपण सर्व जन कुठे ना कुठे बिझी होतो. परंतु डिसेंबर मध्ये झालेल्या सभेचा ॲक्शन टेकन रिपोर्ट या सभागृहामध्ये प्रशासनाने ठेवला नाही ही त्यांची अत्यंत मोठी चुक आहे. याची जबाबदारी देखील फिक्स करणे हे देखील अत्यंत महत्वाचे आहे याची देखील मला जाण आहे. ज्यावेळी एवढी गंभीर चर्चा त्या डिसेंबर महिन्यामध्ये झाली होती, त्या डिसेंबर महिन्यातील चर्चेनंतर ॲक्शन टेकन रिपोर्ट हा सादर करावा, हा आदेश मा.महापौरांनी दिले होते. समसमान पाणीकपात झाली पाहिजे, या बद्दल दुमत असण्याचे कारण नाही. या ठिकाणी कुणाच्याही वार्डात घाणेरडे, दुषित पाणी येत असेल, त्याला देखील जबाबदार निश्चितच आपण सर्वजण आहोत. आणि त्यामुळे हे सर्व होत असतांना त्यावेळी जो ॲक्शन टेकन रिपोर्ट दयायचा आदेश मा.महापौरांनी प्रशासनाला आदेश दिला होता तो ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर करण्यामध्ये प्रशासन कमी पडले आहे. हे सर्वोच्च सदन आहे. आणि हे सभागृह ज्यावेळी आदेश देते त्यावेळी हे आदेश 6–6 महिने होवुन जर पाळल्या जात नसेल तर त्याला जबाबदार कोण आहे याची देखील दखल प्रशासनाने घेणे अत्यंत आवश्यक आहे. नागपूर शहरामध्ये पिण्याच्या पाण्याची स्थिती काय आहे? मग जयताळामध्ये काय आहे? पार्डीमध्ये काय आहे? पाणी सगळीकडे असायला पाहिजे, कुठे जर नसेल तर त्याची कारणमिमांसा करणे देखील गरजेचे आहे. ज्यावेळी आजची स्थिती तुम्ही आणि आम्ही बघत आहे. कुठल्याही स्थितीचे समर्थन करण्याची आवश्यकता नाही. परंतु तुमच्या आणि आमच्या बाजुला कामठीमध्ये 7 दिवसांनी पाणी मिळते. तुमच्या आणि आमच्या बाजुला असलेल्या अकोला शहरामध्ये 14 दिवसांनी पाणी मिळते आहे. तुमच्या आणि आमच्या जवळ असलेल्या बुलढाणा शहरामध्ये 20 दिवसानंतर पाणी मिळत आहे. आज ही महानगरपालिका कुठे ना कुठे निश्चितपणे पाणी देण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि काही ठिकाणी आपण निश्चितच कमी पडतो आहे याची देखील मला जाणीव आहे. आज या स्थगण प्रश्नाच्या निमित्ताने केवळ मला एकच सांगायचे आहे की, मा.महापौरजी प्रशासनाने आपण दिलेला आदेश पाळलेला नाही. आपण ॲक्शन टेकन रिपोर्ट दयायला सांगितला होता तो दिलेला नाही. माझी आपणाला विनंती आहे. आज या ठिकाणी आपण प्रशासनाला पुन्हा अंतिम आदेश दयावा, अंतिम तंबी दयावी, यानंतर येणाऱ्या सदनाचा जर विचार केला तर ते 20 जुलैचे सदन होईल, आणि तोपर्यत तुम्हाला आणि आम्हाला माहिती आहे आणि बरेच वर्ष आपण येथे बघत आहे की पावसाळा येतो मग दुसऱ्या नविन समस्या सुरु होतात मग पिण्याचा पाण्याची डिमांड कमी होते. तुम्ही आणि आम्ही हा विषय विसरतो. नविन विषयामध्ये जातो. त्यामुळे तुम्हाला माझी विनंती आहे की 7 दिवसाच्या आत हा ॲक्शन टेकन रिपोर्ट आपल्यापुढे सादर करायला प्रशासनाला सांगावे, 6 महिन्यापुर्वी सांगितले होते, काही ना काही तयारी झाली असेल, नसेल झाली तर 7 दिवसाच्या आत, इप्लीमेंटेशनला वाट पहायची गरज नाही. आजच्या सभागृहाचे मिनिटस् होतील 4 दिवसानंतर तर आजची 20 तारीख आहे. येणाऱ्या 28 तारखेच्या आत ॲक्शन टेकन रिपोर्ट या सदनापुढे सादर करायला आदेश प्रशासनाला दयावे. 8 दिवसांत हा ॲक्शन टेकन रिपोर्ट आल्यानंतर सर्व जेवढे राजकीय पक्ष आहे त्यांच्या प्रमुखांना बोलावून त्याची कॉपी त्या प्रमुखांना दयावी, जेष्ठ सदस्य म्हणुन जे दोन्ही सदस्य आहे श्री.प्रफुल्लजी गुडधे आहे. श्री.धर्मपाल मेश्राम आहे. या दोघांना देखील याची कॉपी दयावी. 28 तारखेच्या आत जर त्याची कॉपी जर मिळाली नाही तर या प्रशासनाचे प्रमुख म्हणुन या संपुर्ण विषयाला जबाबदार म्हणुन सन्माननिय आयुक्त राहतील, आयुक्तानंतर जे कोणी अधिकारी जबाबदार राहतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे अधिकार सभागृहाला आहे त्यामध्ये कुठल्याही प्रकारची दया माया न दाखविता अत्यंत कठोरपणे जे जे अधिकारी जलप्रदाय विभागाचे असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश या प्रस्तावाच्या निमित्ताने या ठिकाणी दयावे एवढीच विनंती मी या प्रसंगी करतो आणि माझ्या शब्दाला विराम देतो.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय सत्तापक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो विषय मांडला, प्रशासनाच्या माध्यमातुन आपण काही उत्तर घेणार आहे काय? की त्या ॲक्शन टेकन रिपोर्टमध्येच सर्व राहणार आहे.

श्री.संदीप जोशी :– मा.महापौरजी, शेवटी ॲक्शन टेकन रिपोर्ट आयुक्तातर्फेच येणार आहे. त्याच्यामुळे ॲक्शन टेकन रिपोर्टच्या माध्यमातुनच उत्तर येईल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, प्रशासनाने 6 महिन्याच्या कालावधीमध्ये ॲक्शन टेकन रिपोर्ट तयार करु शकले नाही. प्रशासनाकडुन ठोस आश्वासन घ्या की 7 दिवसात ते तयार करणार आहे काय?

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, मला असे वाटते की, सदनानी मागणी केली आहे. मा.महापौर देखील त्यावर रुलिंग देतील झाले नाही तर 28 तारखेनंतर जे कुठले अधिकारी आहे त्यांना तात्काळ निलंबित करण्याचे आपण आदेश दयावे.

महापौर :— मा.सत्तापक्ष नेता जे बोलले त्यावर प्रशासनाला आदेश देतो की त्यांनी तात्काळ 7 दिवसांत सत्तापक्षांनी दिलेल्या सूचना आहे त्याप्रमाणे ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर करावा, त्यांची संपूर्ण जबाबदारी मा.आयुक्तांनी घ्यावी.

महापौर :— निगम सचिवांनी लक्षवेधीचे वाचन करावे.

निगम सचिव :— मा.सदस्य श्री.प्रफुल्लजी गुडधे यांनी नागपूर महानगरपालिका कामकाज नियम क्र 1 (X) अन्वये लक्षवेधीची नोटीस दिलेली आहे. ती याप्रमाणे आहे. नागपूर शहरातील ईथेनॉल वर चालणारी पर्यावरणपूरक वातानुकूलीत 27 ग्रीन बस स्कॅनिया कंपनीने महानगरपालिकेच्या परिवहन विभागाशी कुठलीही विचारणा न करता परस्पर परत नेल्या, करारनाम्यात या संबंधी काय तरतुद आहे व करारनाम्यातील तरतूदीचे पालन बस परस्पर नेल्याने मनपा ने काय कारवाई केली. याबाबतीत मा. आयुक्तांचे लक्ष वेधण्यासाठी नोटीस, प्रस्तावक मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे अनुमोदक मा.सदस्या श्रीमती प्रणिता शहाणे.

महापौर :— आयुक्तांनी निवेदन करावे.

निगम आयुक्त :— मा.महापौर महोदय, उपआयुक्त आपल्या अनुमतीने निवेदन करतील.

परिवहन व्यवस्थापक (श्री.जगताप) :— मा.महापौरजी, हे खरे आहे की नागपूर महानगरपालिकेत ईथेनॉलवर चालणाऱ्या वातानुकूलीत पर्यावरण पुरक 27 ग्रिन बसेस स्कॅनिया कंपनीने म.न.पा. परिवहन विभागाला कोणतीही विचारणा न करता ट्रेलर वर लोड करुन नेल्या आहे. करारनाम्याच्या ज्या तरतुदी आहे. त्या तरतुदीमध्ये एकत्रितपणे जर विचार केला तर स्कॅनिया कंपनीचा जो म.न.पा. सोबत कॉट्रॅक्ट आहे तो फक्त सर्व्हिस कॉट्रॅक्ट पर किलोमिटरचा होता. याच्यामध्ये कुठलिही असेट मग यामध्ये बसेसची व्हॅल्यु असो, पार्किंग प्लेसेस असो, यामध्ये मनपाची कुठलीही मालकी नव्हती आणि भांडवली गुंतवणूक नव्हती. स्कॅनिया कंपनीतर्फे एकतर्फी करार हा 12 ऑगस्ट 2018 पासुन एकतर्फे त्यांनी रद्य केला. त्यामध्ये लिटीगेशन मध्ये दोन गोष्टी आहे. केलेल्या कार्यवाही मध्ये 7.5 करोडची बॅक गॅरंटी आहे ती फोरफिट केलेली आहे. आणि त्या फोरफिट केलेल्या बॅक गॅरंटीच्या संदर्भात तो मा.न्यायालयामध्ये तो गेलेला आहे. दुसरे त्यांनी 12 ऑगस्ट, 2018 रोजी तो एकतर्फी जो करारनामा रद्य केला आहे. त्यानंतर आरबीट्रेशन नियुक्तीच्या मार्गावर तो गेला, कुठल्याही रिकन्सीलेशनकडे न जाता. त्यावर सुध्दा सबमिशन मी केलेले आहे. त्याचे ब्रिच ऑफ कॉट्रॅक्ट काय काय होते. या प्रकारे आपण ॲक्शन केलेली आहे. यामध्ये आपण लिगल ओपिनियन सुध्दा घेत आहे की बॅक गॅरंटी आपण फोरफिट केलेली आहे. तसेच करारनाम्यातील ज्या गंभीर त्रुटी होत्या त्या त्रुटीवर देखील अभ्यास करुन कायद्याच्या सल्लागाराचे अभिमत मागितले आहे.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, 15 नविन गाडया आपल्या नागपूर शहरात आलेल्या आ त्यामध्ये त्या गाडयांचा इंशुरन्स संपत आहे. महानगरपालिकेच्या तिजोरीवर त्याचा भार पडत आहे. त गाडया सुरु का केलेल्या नाही त्या संदर्भात माहिती देण्यात यावी.

ठराव क.386:— नागपूर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. १९८ दिनांक २०/०३/२०१८ अन्वये सार्वजनिक सायकली सामाईकरण योजना नागपूर महानगरपालिका तसेच महामेट्रो रेल कार्पोरेशन नागपूर यांचे क्षेत्रात राबविणेकरीता पात्र/इच्छुक ऑपरेटर सोबत करारनामा/सामंजस्य करार करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान आहेत.

हयाच धर्तीवर ई-रिक्षा, साईकल, ई-साईकल, ई-स्कुटर, ई-कार करीता स्वतंत्र व सामाईकीकरणासह योजना राबविणेकरीता मा. आयुक्त, म.न.पा. यांना पात्र/इच्छुक ऑपरेटर सोबत करारनामा/सामंजस्य करार करण्याचा सुध्दा अधिकार प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून जो करारनामा मेट्रोशी होईल तो करारनामा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा या मा. सदस्य श्री.प्रविण दटके यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.387:— सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन 2018—19 या आर्थिक वर्षा करीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथ्थान अभियाना अंतर्गत मंजूर अनुदानातुन पश्चिम नागपूर क्षेत्रा साठी रू. 12499241/— रक्कमेच्या 04 कामांना मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे कडून शासनाचा आर्थिक सहभाग 50% टक्के रू. 6249622/— व महानगरपलिकेचा आर्थिक सहभाग रू. 6249619/— या अटीवर मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सन 2018—19 च्या एकुण 04 कामाकरीता म.न.पा. चा एकुण 50% आर्थिक सहभाग रू. 6249619/— च्या खर्चाला मंजुरी प्रदान करण्याचा व हा खर्च पद क्र. A42001360905 अंतर्गत करण्यात येईल. याकरीता ठराव क्र. 693 दि. 30.01.2019 नुसार मा. स्थायी समीतीने मंजुरी प्रदान केलेली आहे. करीता उपरोक्त प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महासभेपुढे ठेवण्याचा प्रश्न विचारात घेणे.

| अनु क्र | कामाचे नांव | प्राकलनीय राशी (रू.) | 50% शासन निधी हिस्सा (रू.) | 50% म.न.पा. हिस्सा (रू.) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र. 12 येथील प्रेरणा कॉलनी ते मकरधोकडा पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रू. 6017035 | . 3008518 | 3008517 |
| 2 | प्रभाग क्र. 11 येथील संगम नगर गोरेवाडा येथे रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | रू. 2259902 | 1129951 | 1129951 |
| 3 | प्रभाग क्र. 11 येथील गोरेवाडा मेन रोड ते माधव आश्रम पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | रू.1722953 | 861477 | 861476 |
| 4 | प्रभाग क्र. 11 येथील बोरगाव येथे गोकुल हाऊसिंग सोसायटी येथे रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | रू. 2499351 | 1249676 | 1249675 |
| | एकुण राशी | 1,24,99,241 | 62,49,622 | 62,49,619 |

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, मौजा भामटी 1.25 हेक्टर शेतीची जमिन दाखविलेली आहे. बांधकाम परवानगीसाठी अर्ज केला. जे मालक असतील शासनाच्या अटीनुसार त्याचा वापर बदलण्यासाठी त्यांनी केलेला आहे. मुल्यांकनाच्या 5 टक्के म.न.पा.ला भरावे लागणार आहे. त्यांनी जर फर्स्ट इन्स्टॉलमेंट भरला आणि नंतर जर त्यांनी पैसे भरले नाही. तर याला जबाबदार कोण आहे. म्हणुन या विषयाचे गांभीर्य घेवून आपण ते मंजूर करावे.

ठराव क्र.388:— विकास योजना —नागपूर.

मौजा — भामटी, खसरा क्र. ४७/१ ड, आराजी ०.४९ हे.आर., जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना ही शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टिपीएस—२४९६/२६४३/प्र.क्र.३००(अ)/९७ / नवि—९, दि. ०७.०१.२००० व वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस —२४००/१६२८/प्र.क्र.२००/२०००/नवि —९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर झाली असून ती दि.०१.०३.२००० व दि. २१.०९.२००१ पासून अंमलात आली आहे. शासनाने नागपूर शहराची विकास योजना भागश: दि. ०७.०१.२००० रोजी मंजुर करून वगळलेल्या भागाची ;म्गबसनकमक च्तंजद्ध विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस—२४९६— २६४३—प्र.क्र. ३३०(बी)—९७ — नवि —९, दि. ०७.०१.२००० अन्वये पुन:प्रसिध्द केलेली होती. उक्त वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाने निर्णय क्र. टिपीएस—२४००—१६२८—प्र.क्र. २००—२०००—नवि—९, दि. १०.०९.२००१ अन्वये मंजुर केली असून सदर विकास योजना दि. २१.०९.२००१ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस— २४०१/८५५/प्र.क्र. ७६/ नवि—९, दि. २७. ०२.२००२ अन्वये नागपूर महानगरपालिकेस नागपूर सुधार प्रन्यासच्या ७ योजनाखालील क्षेत्र सोडून उर्वरीत नागपूर शहरातील संपुर्ण क्षेत्राकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेतील मौजा — भामटी, खसरा क्र. ४७/१ ड, आराजी ०.४९ हे.आर ही जमीन शेती जमीन वापर क्षेत्रात अंतर्भूत आहे. उक्त जागेचा जमीन वापर बदलवून रहिवासी जमिन वापर क्षेत्रात अंतर्भुत करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना

अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करण्याचे प्रस्तावित असून सदर क्षेत्राकरीता महानगरपालिका, नागपूर हे नियोजन प्राधिकरण आहे.

शासन निर्देश क्र. टिपीएस—२४१६/प्र.क्र. ४३/१६/नवि—९, दि. २०.०४.२०१६ अन्वये कलम ३७ अन्वये फेरबदलास मंजुरी देतांना, प्रस्तावाखालील जमिनीच्या वार्षिक मुल्यदर तक्त्यातील (Annual Statement Rates) संबंधीत जमीन मुल्यदराच्या ५% दराने अधिमुल्य आकारण्याबाबत व अशा अधिमुल्य रकमेमधून शासनास मिळणाऱ्या ५०% हिश्याच्या रकमेचा भरणा शासनाच्यावतीने स्थानिक नगर रचना अधिकारी यांचेकडील लेखाशिर्षाखाली चलनाव्दारे भरणे व उर्वरीत ५०% रक्कम नियोजन प्राधिकरण यांच्या लेखाशिर्ष खाली अर्जदारास जमा करणे आवश्यक आहे.

सबब सदर प्रस्तावातील फेर बदलासंबंधी संवैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यास्तव मौजा — भामटी, खसरा क्र. ४७/१ ड, आराजी ०.४९ हे.आर., या जमिनीचा शेती हा जमिन वापर बदलवून उक्त जमिन रहिवासी जमिन वापर क्षेत्रात अंतर्भुत करण्यास्तव महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप / हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.389:— जाहीरात क्र. 520/पी.आरदि. 17/01/2018 च्या अनुषंगाने सहा. आयुक्त /वार्ड अधिकारी (अज)—01 पदाकरीता जाहीरात देण्यात आलेली होती. या जाहीरातीच्या अनुषंगाने 24 उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले असुन 6 उमेदवार अर्ज पडताळणी अपात्रा ठरले. उर्वरीत 18 उमेदवारांची लेखी परिक्षा महाऑनलाईन तर्फे दि. 06/10/2018 ला घेण्यात आली.

लेखी परिक्षेतील 18 उमेदवारांपैकी शासन निर्णय दि. 19/10/2007 नुसार परिक्षेत प्राप्त गुणांनुक्रमानुसार 5 उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरीता दि. 08/02/2019 रोजी बोलाविण्यात येवून निवड समितीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून लेखी परिक्षेचा व मुलाखतीचा निकाल, तसेच निवड यादी व प्रतिक्षा यादी नागपूर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द दि. 08/02/2019 रोजी प्रसिध्द करण्यात आला.

दि. 08/02/2019 रोजी घेण्यात आलेल्या प्रत्यक्ष मुलाखती मध्ये लेखी परिक्षेत व मुलाखतीत गुणवत्ता यादीनुसार श्री. घनश्याम जी. पंधरे यांचे निवड यादीत असुन प्रतिक्षा यादीत श्री. योगेश श्रीराम गेडाम यांचे नांव आहे.

सहा. आयुक्त हे पद वर्ग 1 दर्जाचे असल्यामुळे या पदाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (1) नुसार नियुक्ती प्राधीकरण म.न.पा. महासभा असल्यामुळे वरील उमेदवारांस नियुक्ती देण्याबाबतचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयाच्या संदर्भात कायदेतज्ञ ॲड.कप्तान यांचे अभिमत घेवून हा विषय पुढच्या सभागृहापुढे ठेवण्यात यावा या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार विषय पुढच्या सभागृहापुढे ठेवण्यात यावा. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.390 :— नागपूर महानगरपालिकेच्या दि. 21.01.2016 रोजी पारीत ठराव क्र. 204 अन्वये 4500 ऐवजदार सफाई कर्मचारी यांना सफाई कर्मचाऱ्यांच्या पदांवर स्थायी करण्याकरिता वर्षनुवर्षे वारंवार व तेच ते प्रशासनीक कारण पुढे न करता त्यांना त्यांचे स्थायी होण्याच्या अधिकारापासुन वंचित न करता, म.न.पा. ठराव क्र. 88 दि. 20.04.2015 अन्वये ज्या धर्तीवर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना मनपा सेवेत नियमित केले. त्याच धर्तीवर ऐवजदार कर्मचाऱ्यांना स्थायी करण्याचा नोटीस विचारार्थ व निर्णयास्तव सादर करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून हा विषय वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीकडे वर्ग करण्यात यावा या मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय मंजूर करण्यात येते. मा.महापौरजी यांनी केलेल्या

घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.391ः — नागपूर मनपाच्या लाड—पागे शिफारसीनुसार सफाई कामगार पदोन्नत होऊन ड्रायव्हर या पदावर पदोन्नत झाल्यानंतर नागपूर मनपाच्या पदस्थापनेत ड्रायव्हर यांचे (वेतन श्रेणी 5200—20200 ग्रेड पे 1900) असून हे पद वर्ग — 3 मध्ये गणल्या जात होते. सफाई कामागार पदोन्नत होऊन काही कामगार जमादार/हवालदार म्हणून पदोन्नत झाले तर काही कामगार ड्रायव्हर म्हणून पदोन्न्त झाले.

जमादार हवालदार यांचे पद वर्ग 4 मध्ये आणण्यासाठी या पदाची (वेतन श्रेणी 4400—7440 ग्रेड पे 1300—1800) सुधारणा करण्यासाठी तसेच हे पद वर्ग 4 मध्ये आणण्यासाठी व त्यांच्या वारसांना लाड—पागे कमेटीचा लाभ मिळण्यासाठी मनपा ठराव क्र. 186 दि. 20.02.2018 अन्वये सभागृहाने ठराव पारीत केला. मात्र सफाई कामगार पदोन्नत होऊन ड्रायव्हर पदावर पदोन्नत झाल्यास त्यालाही जमादार/हवालदार प्रमाणेच ड्रायव्हर हे पद वर्ग 4 मध्ये आणण्यासाठी या पदाची (वेतन श्रेणी 4400—7440 ग्रेड पे 1300—1800) सुधारणा करण्यासाठी तसेच हे पद वर्ग 4 मध्ये आणण्यासाठी व त्यांच्या वारसांना लाड—पागे कमेटीचा लाभ मिळण्यात यावा याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून हा विषय वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीकडे वर्ग करण्यात यावा या मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय मंजूर करण्यात येते. मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.392ः — प्रभाग क्र. 9 अंतर्गत कामठी रोड वरील पाटणी आटोमोबाईल जवळ भारत सिनेमा परिसरात स्क्रोल विनिमय प्रा.लि. तर्फे डायरेक्ट श्री. लक्षमण मनोहर सावंत द्वारा राय उद्योग लि. यांनी सुरु केलेल्या, मौजा—सिताबर्डी, खसरा क्र. 101/2, 102/2, 108 न.भू.क्र. 1870/1,1872 येथील प्रस्तावित बांधकामामुळे 70 वर्षे जुनी ट्रंक लाईन डॅमेज झाल्याने त्याची जबाबदारी निश्चित करण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव या विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून हा विषय वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीकडे वर्ग करण्यात यावा. समितीने या विषयाच्या संदर्भात अहवाल सभागृहासमोर सादर करावा या मा.सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेनुसार हा विषय मंजूर करण्यात येते. मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.392—अः— मनपा ठराव क्र. 296 दि. 20.10.2018 अन्वये महानगरपालिकेच्या सेवेत असतांना मृत्यु झालेल्या वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरलेल्या ऐवजदार सफाई कामगारांना वारसापैकी एकाला समक्रमांकाचे, म्हणजेच मृत्यु ऐवजदाराच्या क्रमांकाचे ऐवजीकार्ड देऊन त्याला मनपाच्या सेवेत रुजू करण्याकरिता तसेच ऐवजदार सफाई कामगार वैद्यकीय कारणामुळे मनपाच्या सेवेत रुजू न झाल्यामुळे तसेच 2 वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी गैरहजर असणाऱ्या अशा ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांचे रद्द करण्यात आलेले ऐवजदार कार्ड पुनर्जिवित करण्यात येऊन त्यांना पुन्हा कामावर घेण्यास्तव सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून मा. सदस्यांनी नोटीस परत घेण्याचे सुचविल्याप्रमाणे याची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

ठराव क्र.393ः — नागपूर महानगरपालिका ठराव क्र. 94 दि. 15.09.2017 मध्ये संशोधन/दुरुस्ती/स्पष्टता करीता नोटीस. ''महानगरपालिकेने उक्त ठरावान्वये महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सेप्रनि—1098/प्र.क्र. 7/98/12 दि. 25.1.1999 अन्वये नागपूर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना संगणक हाताळणी/वापरा बाबतचे ज्ञान प्राप्त करून विहित प्रमाणपत्र दि. 31. 12.2017 पर्यंत सादर करण्यास मुदतवाढ प्रदान केली आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. 2002/प्र.क्र. 14/2/12 दि. 2 सप्टेंबर 2003 अन्वये सध्या शासन सेवेत असलेल्या गट ''अ'' ''ब'' आणि ''क'' मधिल वयाची 50 वर्ष पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्या पासून सूट प्राप्त आहे. आणि सदरहू निर्णय दि. 25.1.1999 पासुन लागू आहे.

नागपूर महानगरपालिकेचे प्रशासन ठराव क्र. 94 दि. 15.9.2017 चा चुकीचा अर्थ काढून सध्या मनपा सेवेत असलेले गट ''अ'' ''ब'' आणि ''क'' मधील वयाची 50 वर्ष पूर्ण केलेल्या

अधिकारी/कर्मचारी यांना संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्याचे सक्ती करीत असून त्यांचे वेतनवाढ/कालबध्द पदोन्नती/पदोन्नती थांबविण्याचे कार्य करीत आहे. हे कार्य शासकीय नियम दि. 2 सप्टेंबर, 2003 आणि मनपा ठरावा च्या विरूध्द व नियमबाहय आहे.

करीता मनपा ठराव क्र. 94 दि. 15.9.2017 मध्ये स्पष्टता आणण्या करीता दि. 21 सप्टेंबर, 2003 च्या शासन निर्णय अन्वये मनपा सेवेतील गट ''अ'' ''ब'' आणि ''क'' मधिल वयाचे 50 वर्ष पूर्ण केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यास मान्यता प्रदान करते. तसेच या कारणामुळे ज्या अधिकारी/कर्मचारी यांची पदोन्नती/कालबध्द पदोन्नती/वार्षिक वेतनवाढ थांबविण्यात आलेले आहेत ते त्यांना त्यांचा देय दिनांका पासून लागू करण्यात येते.

तसेच महानगरपालिकेतील असे कर्मचारी ज्यांची दि. 31.12.2007 ते जन्म दिनांकानुसार वयाची 50 वर्ष पूर्ण झाली त्या दिनांका पर्यंत वेतनातून वसूलीला महाराष्ट्र शासन (शासन निर्णय) सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) क्र. मातंस–2018/प्र.क्र. 53/से. 5/39 दिनांक 20 नोव्हेंबर 2018 अन्वये वेतनातून वसुली करण्यास स्थगिती देण्यात येते. सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून शासन परिपत्रक 2019 नुसार MSCIT न केल्यामुळे या पूर्वी वेतनवाढी दिल्या असल्यास व 50 वर्ष पुर्ण झाले असल्यास वेतनवाढीमुळे अतिप्रदानाची वसुली करण्यात येवू नये तसेच दिनांक 31.12.2017 पर्यंत 50 वर्ष पुर्ण झाले असल्यास MSCIT परीक्षेतुन सुट देण्यात यावी.या मा.सदस्य श्री.निशांत गांधी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.394ः – एम्प्रेस मॉल सिटीच्या अनाधिकृत बांधकामाबाबत मा. आमदार अनिलजी सोले यांनी राज्य शासनाकडे तक्रार असता, मा. मुख्यमंत्र्यांनी आदेश देवून तीन सदस्यीय समिती द्वारे या बांधकामाचे चौकशीचे आदेश दिले होते. या त्रिसदस्यीय मध्ये नगररचना विभाग, अति. आयुक्त श्री. अजिज शेख हे सदस्य होते. समितीचा अहवाल हा सर्वसाधारण सभेच्या पटलावर ठेवून समिक्षा व सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून हा विषय स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीकडे वर्ग करण्यात यावा या मा.सदस्य श्री. प्रवीण दटके यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.395ः – नागपूर शहर तीव्रगतीने ग्लोबल सिटी व स्मार्ट सिटी होण्याच्या दिशेने वाटचाल करीत असुन नागपूर शहर विकासाच्या वाटचालीत अग्रेषित होतांना स्मार्ट सिटी तेव्हाच होवू शकते जेव्हा त्यात शहरातील नागरीकांचा सक्रिय सहभाग असेल.

शहरातील नागरीकांचा सक्रिय सहभाग होण्याकरीता व त्यांना आपले शहर कसे असावे हे विचार प्रोत्साहित करण्याकरीता नागपूर महानगरपालिका तर्फे Mayor Innovation Award प्रस्तावित करण्यात येत आहे.

Mayor Innovation Award चे प्रामुख्याने 2 मुख्य घटक असेल.

1) स्पर्धात्मक आयोजनाद्वारे निवड करणे

2) शहरातील विविध क्षेत्रामध्ये नाव लौकिक केलेल्या मान्यवरांना उत्कृष्ट सीटीजन अवार्ड प्रदान करणे

अवार्ड क्रमांक 1 आणि अवार्ड क्रमांक 2 करीता प्रक्रिया दरवर्षी जानेवारी महिन्यात सुरू करण्यात येईल.

अवार्ड करीता मा. महापौरजी यांच्या अध्यक्षते खाली एक उच्च स्तरीय ( Mayor Innovation Council ) समितीचे गठन करण्यात येईल. ही समिती कामकाजाचे नियम निर्धारित करेल. व समितीचा निर्णय अंतिम असेल.

महानगरपालिका Mayor Innovation Award दरवर्षी नित्याने आपल्या स्थापना दिवस 2 मार्च रोजी समारोहपूर्वक आयोजित करून पारितोषिक प्रदान करतील. या विषयावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून नागपूर महानगरपालिकेतर्फे 'महापौर इनोव्हेशन अवार्ड 2019' चे आयोजन दोन टप्प्यांमध्ये करण्यात आले होते. पहिल्या टप्प्यात 'द हॅकशॉन' तसेच दुस–या टप्प्यात ''द मेयर इनोव्हेशन अवार्ड' या अंतर्गत

सर्वोत्कृष्ट दहा संकल्पना निवडुन नागपूर महानगरपालिकेच्या वर्धापनदिनी त्यांना महापौर इनोव्हेशन अवार्ड पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. अशा संकल्पनांच्या उद्यमशिलतेला चालना मिळावी या दृष्टीने निवडुन आलेल्या 10 संकल्पनांची अंमलबजावणी व्हावी या दृष्टीने निधी उपलब्ध करण्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी या मा.सदस्य श्री.निशांत गांधी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.396 :– नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीच्या दिनांक 09.10.2018 रोजी भरलेल्या सभेत खालीलप्रमाणे ठराव क्रमांक 313 मंजूर करण्यात आला.

ज्याअर्थी नागपूर महानगरपालिका क्षेत्राात दोन प्राधिकरणीकडे इमारत मंजूरीचे अधिकार आहे. त्याअर्थी नागपूर सुधार प्रन्याने ठरावाद्वारे रू. 1 कोटी पेक्षा जास्त भुगतानाचे देयक निघत असलेल्या भुखंडधारकांना टप्पा टप्पाने देयके भरण्याची सुविधा दिलेली आहे. तेंव्हा महानगरपालिकेच्या नियंत्राण क्षेत्राात सुध्दा अशी पध्दत अंमलात आणल्यास नागरीकांना सोयीचे होईल. एकंदरीत इमारत बांधकाम रेखाचित्रा मंजूर करतांना आकारण्यात येणारे शुल्क अनेक जमिन मालक व विकासकांना एकमुस्त भरणे शक्य होत नाही. आर्थिक मंदीमुळे बांधकाम क्षेत्राामध्ये जी प्रगती व्हावयास पाहिजे ती होत नसुन त्यामुळे या व्यवसायावर मंदीचे सावट निर्माण झालेले आहे. याचा परिणाम महानगरपालिकेच्या आर्थिक स्त्राोतावर सुध्दा झालेला आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे व नागपूर क्षेत्राातील जमिन मालक व विकासकांना सुध्दा शुल्क भरतांना सोईचे व्हावे याबाबत विकासकार्याची मागणी आहे. या दृष्टीकोनातून टप्पा टप्पाने शुल्क भरावयाचा नागपूर सुधार प्रन्यासने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे महानगरपालिकेने सुध्दा असा निर्णय घेणे योग्य राहील.

करीता महानगरपालिकेच्या क्षेत्राात विकास व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीकोनातून सर्व समावेशक निर्णय स्थायी समितीने घेवून रू. 1 कोटी पेक्षा अधिक शुल्क येणारे जमिन मालक व विकासकांना टप्पा टप्पाने शुल्क घेवून बांधकाम परवानगी देण्याच्या धोरणास स्थायी समितीने मंजूरी प्रदान करून उपरोक्त बाब धोरणात्मक निर्णयाकरीता महानगरपालिकेच्या सभागृहाकडे मंजूरी करीता पाठवावी. तसेच आणखी असे की, उपरोक्त धोरणात्मक निर्णय म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्यापूर्वी विभागाने ना.सु.प्र. ने मंजूर केलेल्या ठरावाचा अभ्यास करून व विभागाच्या सुचना अंतर्भुत करून पाठवाव्या.श

त्यानूसार स्थायी समितीने पारीत केलेल्या ठरावाचे अवलोकन करता प्रशासनाने खालीलप्रमाणे ठरविले आहे.

1. श नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्राात कोणत्याही जमिनीचा वा इमारतीचा वापर सुरू करण्यावर वा तिच्या वापरात बदल करण्यावर किंवा या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 अन्वये ज्यासाठी परवानगी आवश्यक आहे अशा कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा विकास करण्यावर उक्त अधिनियमाचे कलम–124 अ मधील तरतूदीनूसार विनिर्दीष्ठ केलेल्या दरांनी विकास आकार बसविणे आवश्यक आहे.
2. जमिनीच्या वर्गीकरणानूसार उक्त अधिनियमाचे कलम–124 ब मध्ये विकास आकाराचे दर आणि तो बसविण्याची कार्यपध्दती नमूद आहे.
3. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम 2010 नूसार अधिनिमयाच्या दुसऱ्या अनुसूचिच्या स्तंभ–4 मध्ये विनिर्दीष्ठ केलेल्या दरांनी विकास आकार बसवील व त्याची वसुली करील असे कलम–124 ब (2) मध्ये नमूद आहे.
4. विकास आकार परिगणीत करून विकासकास मागणीपत्रा दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या कालावधीत उक्त रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. उक्त कालावधीत रक्कमेचा भरणा न केल्यास 18ः दराने व्याजाची आकारणी करणेची तरतूद अधिनियमाच्या कलम 124 इ (3) मध्ये नमूद आहे.
5. निवासी वापराकरीता बांधकाम क्षेत्रााच्या बाजारमुल्य दराच्या 2ः प्रमाणे तर वाणिज्य वापराकरीता 4ः दराने विकास आकाराची परिगणना करण्यात येते.

6- वरील सर्व बाबी पाहता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 मधील तरतूदीत टप्प्या टप्प्याने विकास आकार वसुल करणेची तरतूद नाही.

7. बांधकाम परवानगी देतांना विकास आकार व्यतिरीक्त खालील बाबींकरीता शुल्काची आकारणी

करण्यात येते.

(प) इमारत पंजीयन शुल्क – रू. 5 ६ प्रती चौ.मी. प्रमाणे

(पप) अनामत रक्कम – प्राकलनीय राशीच्या 1ः वा कमाल रू. 75,000६

(पपप) बिल्डींग मटेरीयल स्टॅकींग चार्जेस – प्राकलनीय राशीच्या 1ध्2 ः वा कमाल रू. 50,000६

(पअ) जिना/पॅसेज/लिफ्ट चे 30ः मर्यादेत बांधकाम क्षेत्रा – बांधकाम क्षेत्राावर जमिनी दराचे 10ः प्रमाणे निवासी करीता 20ः प्रमाणे वाणिज्य करीता.

(अ) बंदीस्त बाल्कनी क्षेत्रा – बांधकाम क्षेत्राावर जमिन दराचे 20ः प्रमाणे

(अप) सिव्हर लाईन कनेक्शन – बांधकाम क्षेत्राच्या रू. 2.50 ६ प्रती चौ.मी.

(अपप) हेरीटेज संवर्धन – विकास आकाराच्या 2ः प्रमाणे

(अपपप) कामगार कल्याण उपकर – प्राकलनीय राशीच्या 1ः दराने सदर रक्कम–कामगार कल्याण विभागाच्या लेखाशिर्षातंर्गत जमा करणे अनिवार्य आहे.

(पग) 30% अधिमुल्य आकारून अतिरीक्त चटईक्षेत्रा निर्देशांक – शासनाने विनियम क्र. N-2.9 (6) निर्धारीत केलेल्या प्रिमियम दरानूसार आलेल्या एकुण रक्कमेपैकी 50ः रक्कम म.न.पा. व 50ः रक्कम शासनाकडे जमा करणे अनिवार्य आहे.

(ग) TOD (Transit Oriented Development) अंतर्गत अतिरीक्त चटईक्षेत्रा निर्देशांक – शासनाने विनियम क्र. 40, अपेण्डीक्स – ˘ निर्धारीत केलेल्या प्रिमियम दरानूसार आलेल्या एकुण रक्कमेपैकी 50ः रक्कम म.न.पा. व 50ः रक्कम मेट्रोकडे NMRCL जमा करणे अनिवार्य आहे.

वरील बाबी पाहता विकास परवानगी देतांना शासन, कामगार कल्याण विभाग व छडत्ब्स् कडे रक्कमा जमा करणे अनिवार्य आहे. तेव्हा विकास आकाराच्या रक्कमा टप्प्या टप्प्याने परिगणीत करून मागणीपत्रा देणे उचित होणार नाही.

उपरोक्त सर्व बाबींचा सर्वकष विचार करता व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 मधील कलम–124 नूसार विकास आकार परिगणीत करून वसुल करणेच्या कार्यपध्दतीत उपरोक्त रक्कमा टप्प्या टप्प्याने विकासकाकडून वसुल करणेचे प्रावधान नसल्याने अशी कार्यवाही म.न.पा. मध्ये अवलंबविणे योग्य होणार नाही.

मा. स्थायी समितीने दि. 09.10.2018 रोजीच्या ठराव क्र. 313 अन्वे दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मा. महासभेत सादर करणे अधिनियमाच्या तरतूदीनूसार योग्य होणार नाही. तसेच याबाबत इतर नियोजन प्राधिकरणाकडे चौकशी केली असता अशाप्रमाणे विकास आकार टप्प्या टप्प्याने आकारणीबाबतची कार्यपध्दती नसल्याचे कळले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मा. स्थायी समितीने दिलेल्या निर्देशानूसार सदर विषय मा. महासभेपूढे प्रस्तावित करणे योग्य होणार नाही. असे प्रशासनाने यापूर्वी सुचित केले होते.

त्या अनुषंगाने स्थायी समितीच्या दिनांक 09.10.2018 रोजीच्या सभेतील ठराव क्र. 313 वर प्रशासनाने वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयाची नोंद घेण्याचा प्रश्न पुन्हा स्थायी समितीने विचारात घेऊन मुंबई महानगरपालिकेने बांधकाम परवानगी प्रकरणांच्या धर्तीवर म्हणजेच नागपूरला ज्या प्रकरणी मुळ एफ.एस. आय. व्यतिरीक्त टी.ओ.डी. क्षेत्राात अनुज्ञेय अतिरीक्त एफ.एस.आय. व टी.ओ.डी. क्षेत्रा व्यतिरीक्त अनुज्ञेय 30 टक्के मर्यादेत अधीमुल्य आकारून पेड प्रिमियम एफ.एस.आय. अनुज्ञेय होते. त्या प्रकरणात आकारावयाच्या एकुण शुल्कापैकी म.न.पा. चा हिस्सा 50 टक्के एवढा असून उर्वरीत 50 टक्के हिस्सा एन. एम.आर.सी.एल. व शासनाकडे अनुक्रमे भरणा करावा लागतो. अशा प्रकरणी जर आकारण्यात आलेले शुल्क रू. 1 कोटी पेक्षा जास्त असल्यास व फक्त नागपूर महानगरपालिका त्या शुल्काच्या रक्कमेत हप्ते पाडुन सवलत देणेच्या मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर खालीलप्रमाणे शर्ती व अटींवर नागपूर महानगरपालिकेत सुध्दा लागु करून सवलत देण्याचा प्रस्ताव म.न.पा. सभागृहाकडे सादर करण्यास स्थायी समिती ने ठराव क्र. 810, दि. 21.02.2019 रोजीच्या सभेस मंजूरी प्रदान केलेली आहे.

मा. स्थायी समितीने ठराव क्र. 810, दि. 21.02.2019 पारीत केल्याच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव खालीलप्रमाणे मा. सभागृहपूढे विचारात घेणेबाबत,

नागपूर शहराच्या विकास नियंत्राण नियमावलीतील तरतूदीनूसार खालीलल बाबींवर अधिमूल्यांची रक्कम देय असून त्यामध्ये राज्य शासनाचा व नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचा हिस्सा

आहे.

1. विनियम क्र. N-2.9 (6) नूसार 30: अधिमुल्य आकारून अतिरीक्त चटईक्षेत्रा निर्देशांक :– यानूसार 50: राज्य शासनाच हिस्सा असून 50: नागपूर महानगरपालिकेचा हिस्सा आहे.
2. विनियम क्र. 40, अपेण्डीक्स – नूसार Transit Oriented Development अंतर्गत समाविष्ठ भुखंडावर अनुज्ञेय अतिरीक्त चटईक्षेत्रा निर्देशांक – नूसार 50: नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचा हिस्सा असून 50: नागपूर महानगरपालिकेचा हिस्सा आहे.

नागपूर महानगरपालिकेने उपरोक्त प्रत्येकी म्हणजेच उपरोक्त क्र. 1 व 2 मधील अधिमुल्याची रक्कम रू. 1.0 कोटीपेक्षा जास्त असल्यास त्यामुध्ये हिस्स्याच्या रक्कमेचे हप्ते पाडून सवलत देणेचा प्रश्न विचारात घेणे व राज्य शासनाच्या व नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्या हिस्स्याचे हप्ते पाडणेचा प्रस्तावास मान्यता घेणेकरीता प्रस्ताव राज्य शासनास पाठविणेचा प्रश्न विचारात घेणे.

विकास नियंत्राण नियमावलीनूसार बांधकाम परवानगी देतांना आकारण्यात येणाऱ्या शुल्कापैकी अधिमुल्याच्या नागपूर महानगरपालिकेला प्राप्त होणाऱ्या हिस्स्याच्या रक्कमेवर देण्यात येणाऱ्या सवलतीवर विचार केल्यास शासनाच्या विनियम क्र. N-2.9 (6) व नागपूर मेट्रो रेल कॉरीडोर
मधील क्षेत्राात बांधकाम परवानगी देतांना आकारण्यात येणाऱ्या अधिमुल्याच्या रक्क्मेपैकी नागपूर महानगरपालिकेच्या हिस्स्यावर खालीलप्रमाणे सवलत देणेचा प्रस्ताव नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचे अभिप्राय घेऊन शासनास सादर करणेचा बाबींवर निर्णय घेणे.

अ) 70 मी. पर्यंतची प्रस्तावित उंची असलेल्या इमारती.

| Intial payement | At the end of Months with interest | |
|---|---|---|
| | 12th | 24th |
| 1st Installment | 2nd Installment | 3rd Installment |
| 33% | 33% | 34% |

c½ 70 eh- fdaok R;kis{kk tkLr maph izLrkfor vlysY;k bekjrh-

| Intial payement | At the end of Months with interest | | |
|---|---|---|---|
| | 12th | 24th | 36th |
| 1st Installment | 2nd Installment | 3rd Installment | 4th Installement |
| 25% | 25% | 25% | 25% |

नकाशा मंजूरीच्या वेळेस पहिला हप्ता भरून घेणे बंधनकारक राहील आणि उर्वरीत रकमेवर 12: प्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात येईल. सदर शिल्लक रकमांची ठरलेल्या वेळेत अदाई न केल्यास त्यावर 18: प्रमाणे दंडनीय व्याज आकारले जाईल.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयाला प्राप्त उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

उपसुचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 नियम 124 ई ( 3) प्रमाणे विकास शुल्क 30 दिवसात न भरल्यास 18 टक्के प्रतिवर्ष प्रमाणे व्याजाची रक्कम आकारण्याची तरतुद आहे. ही तरतुद फक्त विकास शुल्काकरिता लागु आहे. इतर शुल्कासाठी 30 दिवसाची आणि 18 टक्के व्याज लावण्याची तरतुद नाही. त्यामुळे विकास शुल्काची रक्कम सोडुन मागणीपत्राची इतर रक्कम एक महिन्याऐवजी तीन महिन्यात भरण्याची दुरूस्ती करण्याचा सुचनेला मान्यता देवून उपसूचनेस एकमताने मंजूरी प्रदान करण्यात यावी.

सूचकः– हस्ता/– डॉ.रविंद्र भोयर
अनुमोदकः–हस्ता/– विरेंद्र कुकरेजा

ठराव क्र.397:– नागपूर महानगरपालिका महासभेतील दिनांक 29/01/2019 च्या ठरावा क्र. 355

अन्वये मनपांची क्रीडा संकूले कशी चालवायची याकरीता पुणेचा क्रीडा अभ्यास दौरा करून तेथील क्रीडा संकूले चालविली जातात. त्या पद्धतीने मनपा नागपूरची क्रीडा संकूले चालवावी या मा. सत्तापक्ष नेते श्री. संदिप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजुर करण्यात आला.

मा. आयुक्त म.न.पा. यांचे दिनांक 25/02/2019 चे पूणे अभ्यास दौरा करणेस्तव मंजुरीनुसार मा. क्रीडा सभापती श्री. नागेश सहारे यांचे नेतृत्वात श्री. प्रमोद तभाने, उप क्रीडा सभापती श्री. राजेश मोहिते (उपायुक्त, क्रीडा) व श्री. नरेश सवाईतूल (प्रभारी, क्रीडा अधिकारी) यांनी दिनांक 5 मार्च ते 7 मार्च 2019 ला पुणे येथे क्रीडा अभ्यास दौरा केला.

पुणे क्रीडा अभ्यास दौऱ्यातील सर्व सदस्यांनी पुणे येथील क्रीडा संकूले चालविण्याच्या पद्धतीचे अभ्यासपूर्ण निरीक्षण केले सर्वानुमते निष्कर्ष व अभिप्रायासह अहवाल सादर केला. सविस्तर अहवालाची प्रत नस्तीला संलग्न आहे.

1) नागपूर महानगरपालिका क्रीडा विभागाकरीता कायम स्वरूपी कर्मचारी आकृतीबंध तयार करणे आवश्यक आहे.

2) नागपूर मनपाची आर्थिक बाब लक्षात घेता क्रीडा संकूले स्वत: चालविणे परवडणारे नाही. कारण किमान 5 ते 17 कर्मचारी एका क्रीडा संकूलाकरीता आवश्यक आहेत. त्यांच्या वेतनावर मोठा खर्च होईल.

3) नागपूर महानगरपालिका परिसरात असलेली मनपाची क्रीडा संकूले चालविण्याकरीता 3 वर्षाकरीता ई—निविदा (स्पर्धात्मक) द्वारे अवलंब करणे योग्य राहील. किरकोळ दुरूस्ती पात्र निविदाकाराने करणे व मुख्य दुरूस्ती म.न.पा. ने करणे अशा अटींचा समावेश करून खेळाडू शुल्क म.न.पा. द्वारे ठरविणे योग्य राहील.

4) ई—निविदा प्रक्रिया स्थावर विभागाद्वारे (झोनमार्फत) करणे गरजेचे राहील.

5) ई—निविदा प्रक्रिया केल्यास किरकोळ दुरूस्तीचा प्रश्न सोडविता येईल. तसेच प्रशिक्षक खेळाडूंकडून शुल्क आकारतात या बाबींवर सुध्दा नियंत्रण ठेवता येईल.

6) ई—निविदा प्रक्रिया केल्यास म.न.पा. च्या उत्पन्नात सुध्दा वाढ होईल.

अ) खालील क्रीडा संकुलांचा समावेश करण्यात येईल. तसेच सध्या या क्रीडा संकुलामध्ये प्रति खेळाडू, प्रति तास, प्रति महिना खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येत आहे.

| अक्र. | संकुलाचे नांव | बॅडमिंटन | जिम | जलतरण | स्केटिंग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज संकूल | 500/- | 500/- | 400/- | ---- |
| 2 | सतरंजीपूरा बॅडमिंटन क्रीडा संकूल | 500/- | ---- | ---- | ---- |
| 3 | बॅडमिंटन हॉल, महाल | 500/- | ---- | ---- | ---- |
| 4 | विवेकानंद नगर क्रीडा संकूल | 500/- | ---- | ---- | ---- |
| 5 | डॉ. आंबेडकर क्रीडा संकूल ☆ | ---- | 650/- | 800/- | 500/- |
| 6 | गणेश नगर स्केटिंग रिंग ☆ | ----- | ---- | ---- | 500/- |

उपरोक्त क्रीडा संकूलांपैकी डॉ. आंबेडकर क्रीडा संकूल व गणेश नगर स्केटिंग रिंग यांची निविदा प्रक्रिया करून संचालित करण्यात आलेली आहेत.

उपरोक्त खेळाडू शुल्क अवलोकन केले असता खेळ निहाय प्रति खेळाडू शुल्क, प्रति तास प्रति महिना खालीलप्रमाणे असावेत असे सुचवावेसे वाटते.

| ब) | बॅडमिंटन | जिम | जलतरण | स्केटिंग |
|---|---|---|---|---|
| | 500/- | 650/- | 800/- | 500/- |

उपरोक्त ब नुसार खेळाडू शुल्क निश्चित करून ही क्रीडा संकूले ई—निविदा प्रक्रियेतून चालवावयास दिल्यास योग्य होईल. खेळाडू व नागरीकांची सोय, चांगली क्रीडा संकुले, माफक

दरात नागरीकांना उपलब्ध होतील. तसेच म.न.पा. चे उत्पन्नात वाढ होईल. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रीडा संकूल देखभाल दुरूस्तीकरीता आज म.न.पा. वार्षिक 25 लक्ष रू. एजन्सीला देत असून त्या रकमेची बचत सुद्धा होईल.

विषयाच्या अनुषंगाने विषयाचे प्रारूप महासभेपुढे सादर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा. सत्तापक्षनेते यांच्या तोंडी सुचनेनुसार बॅटमिंटन करीता रू. १०००/— शुल्क आकारण्यात यावा या सुचनेसह सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली

ठराव क्र.398ः— अंबाझरी आयुध निर्माणी कारखाना, अंबाझरी यांना वेणा जलाशयातून महाराष्ट्र जीवन प्राधीकरणामार्फत पाणी पुरवठा होतो. सन 2018 च्या पावसाळयामधे कमी पाण्यामुळे वेणा प्रकल्पात अपुरा पाणी साठा आहे. सबब आयुध निर्माणी अंबाझरी, नागपूर व महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नागपूर यांनी अंबाझरी जलाषयातुन उन्हाळा 2019 करीता 1.5 दलघमी पाण्याची मागणी केली होती. त्यामध्ये मा. सत्तापक्ष नेते श्री. संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेवरून 0.5 दलघमी वाढ करून 2 दलघमी पाणी, पाण्याच्या उपलब्धतेच्या अधीन राहून दि. 28.12.18 च्या महासभेने मंजुरी प्रदान केली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधीकरणास सदर पाण्यापोटी एम.आय.डी.सी. नागपूर यांना लागू असलेला पाणी आकार (Tarrif) रू. 7.39 प्रति किलो लिटर यास सुध्दा मंजुरी प्राप्त होती. परंतु महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांनी दि. 15.01.2019 च्या पत्रात 0.45 दलघमी पाणी वाडी व दौलामेटी या गावाकरीता पुरवठा करणार असल्याने 0.45 दलघमी पाण्याकरीता घरगुती दर लावावे अशी विनंती केली आहे.
सबब दि. 28.12.2018 च्या महासभेत मंजुरीच्या अधीन राहून वाडी व दौलामेटी या गावांना पाणी पुरवठा होणाऱ्या पाणी मात्रेस सद्या महानगरपालिका सी.आर.पी.एफ.ला अंबाझरीच्या पाण्याकरीता नागपूर सदर पाणीपट्टी दर व दर मुल्यांकन नुसार आकारण्यात येत असलेला दर रू. 5.19 प्रति किलो लिटर याप्रमाणे आकारणी करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा. सत्तापक्षनेते यांच्या तोंडी सुचनेनुसार प्रत्येक वर्षी 5 टक्के दरवाढ करावी या सुचनेसह सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.399ः— मौजा — जाटतरोडी, न.भु.क्र. 492 येथील व महानगरपालिका मालकीच्या 10496.50 मी. जागेवर आयसोलशन हॉस्पिटल (इमामवाडा) आहे. महानगरपालिकेच्या सन 2012—13 चे अंदाजपत्रकामध्ये सदरहु दवाखाना आधुनिक रिसर्च सेंटर होण्यास्तव बी.ओ.टी. तत्वावर उभारण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. तथापी या अनुषंगाने पूढील कार्यवाही झालेली नाही.

महाराष्ट्र राज्यात Swiss Challenge पध्दतीने पायाभुत सुविधा प्रकल्प हाती घेण्याविषयीचे धोरण, शासन निर्णय क्र. एससीएस 2017/प्र.क्र. 174/रा.म. 2, दिनांक 16 फेब्रुवारी 2018 नुसार निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये दुर्लक्षित राहीलेल्या सार्वजनिक हिताचे वैशिष्ठपूर्ण प्रकल्पाची निवड जनतेमधुन अथवा उद्योजकाकडुन स्वःताहुन करण्यात येते. तसेच नाविण्यपूर्ण पध्दतीने निधी उभारणीचे आर्थीक दृष्टया किफायतशिर व आधुनिक तत्रंज्ञानाचा वापर असलेले प्रकल्प हाती घेण्यात येतात. प्रथम प्रस्ताव सादर करण्या—या कंत्राटदारास मुळ सुचक संबोधण्यात येते व त्यानंतर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येवून अन्य पात्र कंत्राटदाराकडुन स्पर्धात्मक पध्दतीने निविदा मागविण्यात येतात. सदर पध्दतीने दयावयाच्या कामांच्या विविध टप्प्यावरील विकास मंजुरीसाठी मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र पायाभुत सुविधा सक्षम प्राधिकरण (Maha Idea) असते. (शासन निर्णय नस्तीमध्ये टाचण आहे.)

विभागास, मे. बेनिफिसीयल हॉस्पिटीलिटी ॲण्ड हेल्थ केअर प्रा.लि. तर्फे आयसोलेशन दवाखाना (इमामवाडा) च्या जागेवर संसर्गजन्य रूग्नाकरीताचे सुविधेसह व NABH मानकाचा समावेश करून आधुनिक तंत्रज्ञानाचे नविन संकल्पनेवर आधारीत दवाखाना प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव दिला आहे व विस्तृत अहवालाचे सादरीकरण केले आहे. सबब, सदर्हु प्रकल्प, संसर्गजन्य रूग्नास सुविधेसह उपचार पध्दती आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत असल्याने मौजा जाटतरोडी, न.भु.क्र. 492 येथील सुमारे 10496.50 चौ.मी. जागेवर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर Swiss Challenge पध्दतीने शासन निर्णय दिनांक 16.02.2018 नुसार निविदा प्रक्रिया करून हॉस्पिटल बांधकाम प्रकल्पाचे कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त, म.न.पा. यांना प्रदान करण्याच्या (तसेच अश्याच प्रकारचे प्रकल्प स्विस चॅलेंज पध्दतीने अवलंबविण्यास व त्याचे कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्याच्या) प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.400:– "सर्वांसाठी घरे-२०२२" या धोरणाचे प्रभारी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग चे शासन निर्णय एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दिनांक १७ नोव्हेंबर,२०१८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग)(अ) ची सुधारीत तरतुद बाबत दिनांक १४ जानेवारी,२०१९ रोजची महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिसूचना, शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१८/प्रक्र.३०९/नवि-१४, दिनांक ७.०२.२०१९, शासन निर्णय(शुध्दीपत्र) क्र. नासुप्र-२०१५/प्र.क्र. ५३/नवि-२६, दिनांक २६.०२.२०१९, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१५/नवि-२६, दिनांक ६.०३.२०१९ व शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१५/नवि-२६, दिनांक ८.०३.२०१९ च्या तरतुदीन्वये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवरील, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या सर्व शासकीय विभागांच्या (वन विभाग वगळून) जमिनीवरील, नागपूर सुधार प्रन्यास च्या जागेवरील, नागपूर महानगर विकास प्राधिकरण जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करुन भाडेपट्टयाने देणे अभिप्रेत असल्याने अतिक्रमण धारकांस द्यावयाच्या भाडेपट्टयाच्या प्रारुपांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग)(अ) च्या सुधारीत तरतुदीचा, उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदी नुसार अटी व शर्ती अंतर्भूत करणे गरजेचे असल्याने यापूर्वी नागपूर महानगरपालिका सभागृहाने ठराव क्र. १७६ दिनांक २०. ०२.२०१८ अन्वये मंजूर केलेल्या भाडेपट्टयाचे प्रारुपात बदल करणे गरजेचे आहे. खालील प्रमाणे अटी व शर्ती अंतर्भूत केलेल्या सुधारीत भाडेपट्टा करारनामा प्रारूपास मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न विचारात घेणे.

नागपूर महानगरपालिका, नागपूर

........................................................, स्लम कोड क्र........................ मधील भोगवट्याखालील जागेचा ३० वर्षीय स्थायी भाडेपट्टा

अधिमुल्य राशी :-................. वार्षीक भुभाटक :-....................... बाजारमुल्य :-...........................

पार्टी क्र.१ :- आयुक्त, नागपूर महानगरपालिका मार्फत नियंत्रण अधिकारी, झो.प.वा.सेल तथा सहा. आयुक्त (कर), म.न.पा. सिव्हील लाईन्स, नागपूर

आणि

पार्टी क्र.२ :- ........................................................................ झोपडीधारक

वय :-........... वर्षे

राहणार :- ..............................................................................................
..................................................................................................

ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका (पार्टी क्र.१) यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग), महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दिनांक १७ नोव्हेंबर,२०१८, शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र. ३०९/नवि-१५ दिनांक ०७/०२/२०१९ व शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१५/नवि-२६ दिनांक ०६/०३/२०१९ अंतर्गत तरतुदी अन्वये मौजा ........................................ खसरा क्र................................ ......... चे झोन क्र.........., म.न.पा., नागपूर येथील महानगरपालिके द्वारे करण्यात आलेल्या प्लेन टेबल सर्व्हे नकाशानुसार, महानगरपालिकेचे मालकीच्या एकूण आराजी ........................... चौ.मी. जागेवरील

प्लेन टेबल सर्व्हे नकाशानुसार झोपडी क्र.................... कर विभागाचे घर क्र. ................., घर टॅक्स रू.................../- वार्ड क्र........... अंतर्गत झोपडीधारकाचे भोगवट्याखालील .............. चौ. मी. जागा खालील अटीवर ३० वर्षाचे स्थायी भाडेपट्टयावर वाटप करावयाचे ठरविलेले आहे.

आणि ज्याअर्थी, या झोपडपट्टीतील प्लेन टेबल सर्व्हे नकाशानुसार झोपडी क्र................. असलेली जागा, पार्टी क्र.२ यांचे वहीवाटीत व ताब्यात आहे.

आणि ज्याअर्थी, पार्टी क्र.२ खालील अटींवर या भुखंडाचा भाडेपट्टा घेण्यास तयार आहे.

त्याअर्थी, या भाडेपट्टयाचा करारनामा खालील अटी व शर्तीवर करण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१. महानगरपालिके द्वारे करण्यात आलेल्या प्लेन टेबल नकाशानुसार ........................... झोन कार्यालयाचे क्षेत्रातील .................................. या झोपडपट्टी अंतर्गत मौजा- .......................... खसरा क्र........................ असलेल्या जागेची एकूण आराजी .................. चौ.मी. क्षेत्रावरील महानगरपालिके द्वारे करण्यात आलेल्या प्लेन टेबल सर्व्हे नकाशानुसार झोपडी क्र. ................... व झोपडीधाकरकाचे भोगवटयाखालील असलेली ................. चौ.मी. (..................... चौ.फुट) जागा पार्टी नं. २ यांना संयुक्तपणे दिनांक ................... पासून ...................... पावेतोच्या ३० वर्षाचे भाडेपट्टयावर भाड्याचा वार्षीक दर रू.१/- प्रती चौरस फुट (अक्षरी एक रूपया चौरस फुट) दरवर्षी महानगरपालिका निधीत जमा करणेच्या अटीवर देण्यात येत आहे.

२. पार्टी नं. २ अतिक्रमणधारक हे अनुसूची जाती/अनुसूचीत जमाती/इतर मागासवर्गीय प्रवर्गातील/आर्थीक दृष्ट्या दुर्बल प्रवर्गातील असल्याने अधिमुल्य रक्कमेची आकारणी तसेच महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दिनांक ०३ जानेवारी,२०१७ मधील तरतुदीनुसार त्यांना भाडेपट्टयाने द्यावयाचे जागेकरीताचे दिनांक ०१/०१/१९९५ पासून वसुल करावयाचे एकूण एकत्रित सेवाशुल्काची आकारणी करता येणार नाही.

३. १५०० चौ.फुट क्षेत्रफळापेक्षा जास्त जागेवर अतिक्रमण असलेल्या अतिक्रमणधारकांनी १५०० चौ.फुट पेक्षा जास्त/अधिकचे असलेले त्याचे अतिक्रमण स्वतः निष्काषीत केल्या शिवाय अशा अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण नियमानुकूल झाले असे गृहीत धरू नये.

४. नागपूर महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करतांना अतिक्रमण धारकांनी अतिक्रमित केलेल्या जागेपैकी रस्ता, गटारे, पाणीपुरवठा यासारख्या अत्यावश्यक मुलभूत सोयी सुविधांसाठी आवश्यक असलेले क्षेत्र कोणत्याही मोबदल्याशिवाय नागपूर महानगरपालिकेकडे वर्ग करण्याची लेखी हमी अतिक्रमणधारकांनी दिलेली असल्यानेच अतिक्रमित जागा नियमानुकूल करून भाडेपट्टा देण्यात येत आहे.

५. अतिक्रमणधारक यांना वार्षीक भाड्याचा दर रू.१/- प्रती चौरस फुट (अक्षरी एक रूपया चौरस फुट) प्रमाणे येणाऱ्या वार्षीक भाड्याची रक्कम वर्षाच्या प्रथम आठवडयात दरवर्षी नागपूर महापालिका निधीत जमा करणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत वार्षीक भाडे रक्कम नागपूर महापालिका निधीत जमा न केल्यास नागपूर महानगरपालिका सदहू अतिक्रमित जागेचा भाडेपट्टा रद्द करून जागेचा ताबा परत घेईल.

६. जागेचा भाडेपट्टा प्रथम ३० वर्षाकरीता राहील व मुदतीनंतर महानगरपालिका व शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने त्यावेळेच्या स्थितीस अनुसरुन सक्षम प्राधिकरणाचे अनुमतीने भाडेपट्टा नुतनीकरणाचे कार्यवाहीचा निर्णय घेण्यात येईल. ही बाब पार्टी नं. २ यांना मान्य राहील.

७. अतिक्रमित जागेचा पुनर्विकास करतांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील व विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार आवश्यक त्या सोईसुविधा देणेकरीता तयार केल्या जाणाऱ्या एकत्रित अभिन्यास करीता गरज भासल्यास आवश्यक जागा उपलब्ध करून देणे अतिक्रमणधारकांस बंधनकारक राहील.

८. पार्टी नं. २ यांना या जागेवरील अस्तित्वात असलेले वा प्रस्तावित बांधकामास सक्षम प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त करणे व अनधिकृतरित्या असलेले बांधकाम काढून टाकणे आवश्यक राहील.

९. नागपूर महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमित जागा ही अतिक्रमण धारकांकडून निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येत असल्याने व वापरली जाणार असल्याने अतिक्रमित जागा नियमानुकूल करून भाडेपट्टा देण्यात येत आहे.

१०. "या भाडेपट्टयाद्वारे नियमानुकूल केलेले अतिक्रमण क्षेत्रफळा व्यतिरीक्त नागपूर महानगरपालिकेच्या वा इतर संस्थेच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आल्यास हा भाडेपट्टा रद्द करण्याचा अधिकार नागपूर महानगरपालिकेस असेल.

११. भाडेपट्टा धारकाने कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास पार्टी नं. १ अथवा त्यांचेकडून नियुक्त अधिका-यास भाडेपट्टा रद्द करण्याचा अधिकार अबाधित राहील. हयामुळे पार्टी न.२ हयांना या जागेबाबत वा बांधकामाबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार राहणार नाही.

१२. या भाडेपट्टयातील अटी व शर्ती पार्टी नं. १ व २ ला मान्य आहेत. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाचे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यासंबंधीचे शासन निर्णय दिनांक १७.११.२०१८, शासन निर्णय दिनांक ०७/०२/२०१९, दिनांक ०६/०३/२०१९ व दिनांक ०३/०१/२०१७ मधील अटींचे पालन पार्टी नं. २ ला करावे लागेल. कोणत्याही शर्तीचा अथवा अटींचा अर्थ लावण्याचा अधिकार पार्टी नं. १ अथवा त्यांचेकडून नियुक्त अधिका-यास राहील व तो अर्थ पार्टी नं. २ ला बंधनकारक राहील.

१३. सदर भाडेपट्टा करार पंजीबध्द करण्याकरीता नियमानुसार लागणारी स्टॅम्प डयुटी खर्च व पंजियन शुल्क इ. चा भरणा करण्याची जबाबदारी ही पाटी नं. २ यांची राहील.

१४. या भाडेपट्टा करारामधील पार्टी नं. १ व २ मधील प्रत्येकी त्यांचे वारसान, एजंट, प्रशासक व या भुखंडापासून ज्यांना फायदे मिळतील असे सर्व लोक अंतर्भुत समजण्यात येतील.

१५. ........................ या स्लम क्षेत्रातील झोपडी क्र. ............. असलेल्या जागेचे संलग्न प्लेन टेबल सर्व्हे नकाशा व महानगरपालिकेत उपलब्ध घर निहाय संलग्न यादी ही या भाडेपट्टा कराराचा भाग आहे.

१६. अतिक्रमणधारकास घराचे बांधकाम करण्यासाठी वित्तीय संस्थांकडून आवश्यक ते कर्ज उभारणेकरीता त्यांचे नियमानुकूल करण्यात आलेले क्षेत्र/बांधकाम तारण ठेवण्यासंदर्भात महसूल विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

भाडेपट्टयाने द्यावयाचे जागेची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे :-

उत्तरेस -
दक्षिणेस -
पूर्वेस -

पश्चिमेस -

नियंत्रण अधिकारी/सहा. आयुक्त (कर)
झो.प.वा.सेल
महानगरपालिका, नागपूर

साक्षीदार :-
१) सही :-................................

नांव :-................................
रा. :- ...............................

(पाटी क्र.१)

२) सही :-................................
नांव :-................................
रा. :- ...............................

भाडेपट्टेवार
(पाटी क्र.२)

दिनांक :-

++ ++ ++ ++

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, विषय क्र 325 हा भाडेपटटयांचा विषय आहे. आणि भाडेपट्टयांचा नावाऐवजी मालकीपट्टा मिळाला पाहिजे. आता जे प्लेन टेबल सर्व्हे जो सुरु आहे. तो चुकीच्या पध्दतीने सुरु आहे. एक व्यक्ती झोनमध्ये जेव्हा रजिस्ट्रीसाठी एन.आय.टी. ऑफीसमध्ये गेला. तेव्हा त्याच्या लक्षात आले त्याचे नावच त्या ठिकाणी नाही. त्याचे घर आहे. टॅक्स भरलेला आहे. सर्व गोष्टी त्याच्याकडे आहे परंतु एन.आय.टी. च्या अधिकाऱ्यांनी त्याला वापस पाठविले. तर प्लेन टेबल सर्व्हे चुकीचा झालेला आहे. मग नंदनवन असो, हसनबाग असो, किंवा नागपूर शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी प्लेन टेबल सर्व्हे चुकीच्या पध्दतीने झालेला आहे त्याला आपण दुरुस्त करावा आणि त्या लोकांच्या रजिस्ट्री आपण करुन दयावे.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, जो पट्टा देतो आहे तो आपण 30 वर्षाकरीता देतो आहे. त्याला तारण ठेवण्याचा अधिकार हा पट्टेधारकांकडे असला पाहिजे त्यानंतर हा विषय मंजूर केला पाहिजे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— भाडेपट्टयांच्या संदर्भात मला काही प्रश्न विचारायचे आहे. यामध्ये प्रथम भाडेपट्टयांची लिज जी आहे ती 30 वर्षाची केलेली आहे. मात्र रिनिवल च्या संदर्भामध्ये सक्षम प्राधिकरण अनुमतीने भाडेपट्टा नुतनीकरणाच्या संदर्भामध्ये निर्णय घेईल. या संदर्भात थेट तरतुद केलेली आहे. 30 वर्षानंतर रिनिवल क्लॉज जो आहे तो स्पेसीफीक टाकलेला नाही. तो निरंतर रिनिव करता येईल काय? या संदर्भात उत्तर नाही. मुद्या क्र 7 मध्ये अतिक्रमीत जागेचा पुनर्विकास करतांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक त्या सोयीसुविधा करता तयार केलेल्या जाणाऱ्या एकत्रित अभिन्यास करता गरज भासल्यास आवश्यक जागा उपलब्ध करुन देण्यास बंधनकारक आहे. मात्र त्याच्या मोबदल्याच्या संदर्भामध्ये कुठलाही या ठिकाणी उल्लेख नाही. त्यानंतर या ठिकाणी मुद्या क्र 8 मध्ये म्हटले आहे की अतिक्रमीत झोपडी धारकांनी बांधकाम मंजूर करुन घेतले पाहिजे. आता बांधकाम मंजूर करुन घेत असतांना डी.सी.आर. च्या मंजूरीप्रमाणे जर बांधकाम मंजूर करुन घेतले तर त्याच्या साईड मार्जीन, फ्रंट मार्जीन स्पेसमध्ये कुठल्याही पध्दतीचे बांधकाम शिल्लक राहणार नाही त्यामध्ये महानगरपालिका काय कारवाई करणार आहे हा पण प्रश्न या ठिकाणी अनुत्तरीत आहे. समजा झोपडपट्टी धारकांचा 1000 स्केअर फुटाचा पट्टा त्यांनी मार्जीन न सोडता जर बांधकाम केले तर त्या संदर्भात त्याचे बांधकाम पडणार या संदर्भातील तरतुद या ठिकाणी केलेली आहे. या संदर्भातील संभ्रम झोपडपट्टी धारकामध्ये निर्माण होणार आहे. त्या संदर्भात स्पष्टीकरण प्रशासनाने दिले पाहिजे. मुद्या क्र 9 मध्ये नागपूर महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमीत जागा ही अतिक्रमण धारकांरकांकडुन निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येत असल्याने आता झोपडपट्टयांमध्ये छोटे उद्योग आहे. गृह उद्योग आहे. कुटीर उद्योग आहे काही छोटे छोटे दुकाने आहे वाणिज्यिक वापरासाठी काही सेमी

औद्योगीक वापरासाठी सुध्दा वापरली जाते त्या संदर्भातील कुठला उल्लेख नाही. तो माणुस एका खोलीमध्ये राहतो आणि एका खोलीमध्ये त्याचे दुकान असेल तर त्या संदर्भामध्ये कुठली स्पष्टता नाही त्यामुळे झोपडपट्टयामध्ये सुरु असलेले गृह उद्योग, कुटीर उद्योग त्यांना या करारनाम्याच्या माध्यमातुन संरक्षण देणार आहे काय? या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाच्या माध्यमातुन दयावे.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौर महोदया, सन्माननिय सदस्य गण, सन्माननिय जेष्ठ सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने पहिली गोष्ट जर झोपडपट्टीमध्ये समिश्र वापर असेल म्हणजे रेसीडेंशिल वापर असेल किंवा कमर्शीअल वापर असेल तर त्याला आपण रेगुलराईज करुन त्यांना आपण भाडेपट्टा देतो आहे. त्यानंतर जर त्या भागाचे रेट्रोफिटींग झाले म्हणजे पुनर्विकास झाला तर त्या माध्यमातुन आपल्याला मुलभूत सोयीसुविधा प्रोव्हाईड करण्याकरीता जर जागा लागत असेल तर त्यांनी ती जागा हस्तांतरीत करावी म्हणुन तो क्लॉज तेथे ठेवलेला आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, जर ती जागा हस्तांतरीत केली तर मोबदला कोण देणार आहे.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौर महोदया, मोबदला देण्याचा प्रश्न नाही आहे. कारण शासनाची जागा आहे. त्याने अतिक्रमीत केली आहे त्याला नियमाकूल करुन देत आहे. स्थानांतरीत करायचे राहिले तर आपण त्यांना दुसरीकडे स्थानांतरीत करु.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, त्याचे रेगुलराईजेशन करीत असतांना 1000 फुटाचा प्लॉट आहे. आणि आपण म्हटले की त्यांनी जर डि.सी.आर. प्रमाणे बांधकाम केले नाही. त्याने मार्जीन सोडली नाही. जर मार्जीन सोडली नसेल तर त्या स्थितीमध्ये आपण काय करणार आहे. ते अनधिकृत म्हणुन तोडणार की त्याला रेगुलराईज करणार.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौर महोदया, जो शासन निर्णय आहे त्यामध्ये 500 चौरस फुटाचे बांधकाम आहे ते जसेच्या तसे रेगुलराईज होत आहे. दुसरी गोष्ट आहे की 500 ते 1000 असेल ते पण आपण रेगुलराईज करीत आहे परंतु त्याला 10 टक्के हप्त्याची रक्कम भरावी लागेल, आणि 1500 च्या वर जर त्यांनी ऑक्युपाय केलेले क्षेत्र असेल तर ते त्याने निरस्त करुन....

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, क्षेत्रफळाच्या संदर्भात माझा आक्षेप नाही. समजा त्यांनी 1800 च्या प्लॉटवर मार्जीन स्पेस सोडलेल्या नाही. अशा स्थितीमध्ये डी.सी.आर. प्रमाणे त्याला मार्जीन सोडणे गरजेचे आहे. मागे दीड मिटर सोडायला पाहिजे त्यानी सोडली नाही. भिंत पुर्ण करुन घेतली ते बांधकाम डि.सी.आर. प्रमाणे डिसअलव्ह झाले तर त्याला आपण संरक्षण देणार की त्याला तोडून टाकणार?

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौर महोदय, त्याच माध्यमातुन मी बोलत आहे. आता मा. सदस्यांनी 1800 चा उल्लेख केला समजा 1500 च्या वर जे आहे 300 ते त्याला शासन निर्णयाप्रमाणे निरस्त करायचे आहे. म्हणजे त्याला तोडायचेच आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, समजा आपण 700 फुट घेतले आणि 500 फुटाचे बांधकाम आपण जसेच्या तसे रेगुलराईज करणार आहे. जर ते 700 फुटाचे बांधकाम मार्जीनमध्ये बसत नाही. त्या स्थितीमध्ये आपण काय करणार आहे.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौरजी, आपण सध्या पट्टा वाटप करतो आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, बांधकामाच्या संदर्भात यामध्ये लिहिले आहे की विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीच्या अनुषंगाने त्याचे बांधकाम त्याला मंजूर करुन घ्यावे लागेल, आणि जे मंजूर झालेले नाही ते त्याला काढुन टाकावे लागेल, म्हणजे याचा अर्थ असा आहे की, पट्टा जमिनीचा मिळाला आणि त्यांनी बांधकाम 100 टक्के क्षेत्रफळावर केलेले आहे. ते डि.सी.आर. प्रमाणे अनुज्ञेय होत नाही. अशा स्थितीमध्ये अतिरिक्त बांधकाम त्याचे तोडावे लागणार आहे. ही वास्तविकता आपण लोकांपुढे नेली पाहिजे. समजा हे पट्टे वाटप झाले तर संपूर्ण शहरामध्ये विचित्र स्थिती निर्माण होईल, बिल्डींग प्लॅन सॅग्शन करायला गेलो आणि त्याचे बांधकाम डिसअलव्ह झाले. फ्रंट मार्जिन सोडली नाही. बॅक मार्जीन सोडली नाही. आणखी काही गोष्टी असतील तर त्यामध्ये आपण त्यांना विशेष काही संरक्षण देणार आहे काय?

निगम आयुक्त :— मा.महापौर महोदया, मा.सदस्यांनी आता जो येथे मुद्या मांडला त्याबाबत असा खुलासा करु इच्छितो की, आता आपण पट्टे वाटपाची कारवाई करीत आहोत आणि पट्टे वाटपामध्ये जे काही ऑक्युपेशन असतील त्याच्या आधारे त्याला पट्टे दिला जाईल, त्या पट्टयावर अनुज्ञेय बांधकाम किती राहील, आणि त्या बांधकामाबाबत काय कार्यवाही केली जाईल, हा मुद्या अस्तीत्वातील डि.सी.आर.

प्रमाणे घेतला जाईल, आणि तो मुद्या फार व्यापक आहे. तो मुद्या फक्त पट्टे वाटपापुरता मर्यादीत नाही तर त्यामध्ये असे आपल्याकडे अनेक अनअथोराईज स्ट्रक्चर सापडतात की त्यामध्ये त्यांनी विनापरवानगी बांधकाम केलेले आहे. त्या संदर्भात आपली वारंवार कारवाई चालु राहते त्या पध्दतीने आहे. पट्टे वाटप सुरु असतांना आम्ही त्यांना अवगत करतो की, डि.सी.आर. प्रमाणे बांधकाम असणे आवश्यक आहे. परंतु सध्या जो विषय आहे तो पट्टे देण्याचा आहे. कारण वर्षानुवर्ष शासकीय जमिनीवर त्यांचे ऑक्युपेशन आहे आणि त्यांच्या हक्काचा त्यांना पट्टा मिळाला नव्हता त्यामुळे पट्टे वाटपाच्या संदर्भात ही कार्यवाही सुरु आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी,म्हणजे जे बांधकाम विकास नियंत्रण नियमावली नुसार नसतील त्यांचे काढले जातील.

निगम आयुक्त :— मा.महापौर, आज पट्टे वाटप केल्यानंतर ज्यांचे डी.सी.आर नियमावलीप्रमाणे नाही त्यांना काढले जातील असे म्हटल्यापेक्षा डी.सी.आर. नियमावलीप्रमाणे त्यांना अनुज्ञेय राहण्याची मुभा राहील अशा प्रकारे आपण म्हणुया.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, मा.आयुक्तांनी या ठिकाणी जे निवेदन केले आणि मुद्या क्र 8 मध्ये तफावत आहे. यामध्ये अनधिकृत असलेले बांधकाम काढुन टाकणे आवश्यक राहील. आपण म्हटले आहे. म्हणजे ते तोडावे लागेल हे स्पष्ट आहे. ही बाब लोकांपुढे जात नाही. लोकांपुढे ऐवढीच बाब जाते की फक्त पट्टे वाटप होत आहे. आणि मालकी हक्कांचे पट्टेवाटप होत आहे. त्यामुळे आपण महानगरपालिकेची जाहिरात करीत असतांना प्रेसनोट देत असतांना मालकी हक्कांचे पट्टे वाटप हा शब्दप्रयोग करणे योग्य होणार नाही. त्याठिकाणी फक्त भाडेपट्टा वाटप करणार आहे. कारण की महानगरपालिकेच्या जाहिरातीमध्ये मालकी हक्कांचे पट्टे वाटप असे लिहिले असल्याचे मला आठवते.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :— मा.महापौर महोदय, आम्ही जी जाहिरात दिली त्यामध्ये भाडेपट्टा हाच शब्दप्रयोग केलेला आहे.

निगम आयुक्त :— आपण जो भाडेपट्टा देतो आहे तो स्थायी पध्दतीचा भाडे पट्टा आहे. स्थायी भाडेपट्टा आणि साधारण भाडेपट्टा यामध्ये फरक असा आहे की, स्थायी भाडेपट्टा असल्याने त्याला पुन्हा मुदतवाढ मिळणार आहे. त्याला बोलीभाषामध्ये परमनंट भाडेप्टा म्हटले तरी चालु शकेल. त्यामुळे मालकी हक्काचा भाडेपट्टा असे बोलल्या जाते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :— मा.महापौरजी, मालकी हक्काचा भाडेपट्टा, भाडेपट्टा की, स्थायी स्वरुपाचा भाडेपट्टा हा शब्दप्रयोग एकदा निश्चित करुन टाकु, कारण याचा वापर प्रचारासाठी होत आहे. त्यामुळे तो शब्द प्रयोग निश्चित केला पाहिजे.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, आमच्या प्रभागात सध्या 3 महानगरपालिकेच्या झोपडपट्टयांवर कॅम्प सुरु आहे. शिवाजी नगर, नंदाजी नगर, आणि भुतेश्वर नगर, येथे काही लोकांकडे स्थावर विभागाचे किराया पत्राचे पट्टे आहे. काही लोकांनी 30 वर्षानंतर रिनिव करुन घेतले, ज्यांच्याकडे 500 पेक्षा जास्त पट्टे आहे त्यांच्याकरीता काहीतरी रेडीरेकनरचे नियम लावले आहे. हे सर्व करीत असतांना इस्टेट डिपार्टमेंटच्या माध्यमातुन जे नियम आणि अटीशर्ती आहे. त्यामध्ये स्पेसिफीक लिहिले असे आहे की तुम्हाला ते तारण ठेवता येत नाही. आज ते तारण ठेवता येतील असे लिहिले आहे. परंतु मला एक प्रश्न आहे की ज्यांचे भाडेपट्टा सन 2015, 2016, 2017 रिनिव झाले ज्यांच्यावर किरायपत्र लिहले आहे. तर ते किरायापत्र आता रद्द होवुन त्याला स्वतःच्या मालकीचा पट्टा किती वर्षाकरीता मिळणार आहे. त्याला मिळत असतांना स्टॅम्प डयुटी भरायची आहे कि डिमांड भरायची आहे? ती किती असणार आहे. कारण की ते सर्व गरीब लोक आहे. एखादी चुकीची माहिती त्यांच्यापर्यत गेली तर शासनाची इतकी चांगली पहिल्यांदा मी मा.देवेंद्रजी फडणवीस आणि महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो आहे की, गरीब लोकांसाठी पाहिजे तसा जी.आर. काढला की जेणेकरुन त्रास होणार नाही. परंतु याच्यामध्ये जे मुद्ये आहे ती क्लीअर असले पाहिजे, त्यांचे म्हणणे बरोबर आहे. स्थायी भाडेपट्टा, की मालकी हक्काचा भाडेपट्टा, भविष्यात किती वर्षासाठी हे सर्व आज क्लीअर केले तर आम्हाला सर्वांना सांगायला सोपे जाईल, कारण लोकांनी रांगा लावून अर्ज भरणे सुरु केले. ज्या लोकांना टॅक्स भरला, तेथे इलेक्ट्रीकचे बिल आहे. पाण्याची बिल आहे. ती जागा पोराच्या शिक्षणाकरीता, मुलींच्या लग्नाकरीता किंवा ते घर बांधण्याकरीता तारण ठेवता येत नव्हते. ती आता ठेवायची मुभा आहे असे मी वाचले आहे. पण इतर गोष्टी किती वर्षा करीता भाडेपट्टा, किती वर्षाकरीता स्थायी पट्टा, किती वर्षाकरीता मालकी हक्काचा पट्टा ते येथे क्लीअर झाले पाहिजे.

पहिले महानगरपालिकेची जी जागा आहे त्या जागेवर इस्टेट विभागांनी किरायपत्र केले आहे. लोकांनी 1000 रु. डिमांड भरली आहे. आमच्याकडे जवळपास 275 लोकांनी ती डिमांड भरली. त्यांचा किरायपत्र किंवा भाडेपट्टे इस्टेट डिपार्टमेंटने करुन दिले नाही. कारण नियम 500 पेक्षा खालचा होता. आज आपण त्यांच्याकडुन ऐवढे पैसे घेतले, कोणी 2015 मध्ये रिनिवल केले, कोणी 2016 मध्ये केले, कोणी 2017 मध्ये केले, आणि आपल्या नियमाप्रमाणे त्यांनी पैसे भरले परंतु आता मालकी हक्काचे पट्टे माझी माहिती आहे ती चुक पण राहु शकते. आपल्या घराचा जेवढा टॅक्स येतो तेवढीच डिमांड घेवुन आपण रजिस्टर करुन देणार आहोत तर जुन्या लोकांचे काय होईल, महानगरपालिकेचे पट्टे वाटप याच्या आधी इस्टेट डिपार्टमेंटचे करायचे आहे. आपल्या सुदर्शन वाल्मीकी येथील घरांचा देखील हाच प्रश्न आहे. त्यामुळे स्थिती क्लीअर व्हावी, चांगल्या योजनेला डाग लागु नये ऐवढीच अपेक्षा आहे.

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :– मा.महापौर महोदया, सन्माननिय माजी महापौर श्री.दटके साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की तो असा आहे की यापुर्वी स्थावर विभागाने वेळोवेळी महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेचा भाडेपट्टयांनी दिलेला आहे त्यामध्ये असे असु शकते की काही लोकांचा 30 वर्षाचा कालावधी संपुष्टात आला असेल, त्याला रिनिव करायचे आहे. काही लोकांचा 30 वर्षाचा कालावधी संपुष्टात यायचा आहे. त्या अनुषंगाने सभागृहाने ठराव क्र 176 दि. 20/02/2018 ला निर्णय घेतला होता की त्याचे प्रारुप कसे राहील, त्याच्यावर भुईभाडे किती आकारता येईल, त्या संदर्भात आम्ही सभागृहाला विनंती करतो की, त्यावर पण एक सभागृहात निर्णय झालेला बरा. कारण की यापुर्वी या ठरावाच्या अनुषंगाने निर्णय घेतला आहे. त्या ठरावामध्ये भुईभाडे जे होते ते 4 टक्के होते. ते जर म्हटले तर 37 रुपये चौरस फुट येते. आणि आता जो शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्या शासन निर्णयाप्रमाणे ज्यांचे अतिक्रमण नियमाकुल करुन भाडेपट्टा देतो आहे त्यांना 1 रुपया प्रति चौरस फुटाप्रमाणे वार्षिक भुईभाडे आकारायचे आहे. त्यामध्ये डिसपॅरिटी होणार आहे. की ज्यांनी ऑलरेडी इस्टेट डिपार्टमेंट कडुन भाडेपट्टा घेतला आहे त्यांच्याकडुन भुईभाडे 37 रुपयांने वसुल केले जाईल आणि शासन निर्णयाप्रमाणे आपण त्यांना भाडेपट्टा देतो त्यांच्याकडुन 1 रुपया प्रति चौरस मिटर रुपये घेण्यात येते. त्यामध्ये स्थावर विभागाने नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील झोपडपट्टीकरीता जे भाडेपट्टा दिलेले आहे तो भाडेपट्टा या ठरावानिरुप यांना सुधारित करुन देणे, हा एक निर्णय सभागृहाने घेणे अपेक्षित आहे. नागपूर महानगरपालिकेच्या जागेवर वर्षानुवर्षेपासून बसलेल्या झोपडपट्टीवासीयांना स्थावर विभागाने यापूर्वी दिलेल्या भाडेपट्टयात व शासन निर्णयाप्रमाणे सध्यास्थितीत दयावयाच्या भाडेपट्टयातील अटी व शर्तीमध्ये बरीच तफावत आहे. नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा ज्या झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित/अघोषित आहेत. सदर्हु झोपडपट्टी क्षेत्रातील अतिक्रमीत जागेकरीता नागपूर महानगरपालिकेच्या स्थावर विभागाने यापूर्वी भाडेपट्टा दिलेला आहे परंतु उक्त भाडेपट्टा हा तेव्हाचे नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 च्या तरतुदी, तेव्हाचे शासन निर्णयाच्या तरतुदीन्वये, महानगरपालिकेचे ठरावनुसार अटी व शर्ती अंतर्भूत करून भाडेपट्टा देण्यात आलेला आहे. ज्या अतिक्रमीत जागेकरीता यापूर्वी दिलेल्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करणे अपेक्षित आहे, ज्या भाडेपट्टयाकरिता कालावधी अजूनही संपुष्ठात आलेला नाही, अशा अतिक्रमणधारकांना सुध्दा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 79 खंड 'ग' मधील उपखंड 'अ' तरतुदीन्वये केलेला बदल व महाराष्ट्र शासनाने घेतलेले निर्णय यामधील अटी व शर्ती अंतर्भुत करून भाडेपट्टा दिल्यास नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर वर्षानुवर्षपासून वसलेल्या झोपडपट्टीवासियांना दिल्या जाणा–या भाडेपट्टयातील अटी व शर्तीमध्ये एकसुत्रता राहील. नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील घोषित/अघोषित झोपडपट्टी क्षेत्रातील रहीवाशांना यापूर्वी स्थावर विभागाने दिलेला भाडेपट्टा निरस्त करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 खंड 'ग' मधील उपखंड 'अ' ची तरतुद व शासन निर्णय क्र.एमसीओ–2018/प्र.क्र.309/नवि–18 दि. 07.02.2019 च्या शासन निर्णयातील तरतुदीतील अटी व शर्तीचा अंतर्भुत करून प्रस्तुत केलेल्या भाडेपट्टयाच्या प्रारूपाप्रमाणे सुधारीत भाडेपट्टा देणे व ज्या अतिक्रमणधारकांना यापूर्वी भाडेपट्टा देण्यात आलेला नव्हता अशा रहीवाशांना सुध्दा प्रस्तुत प्रारूपाप्रमाणे भाडेपट्टा देण्यात यावा.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, त्या डॉक्युमेंटवर भाडेपट्टा, असेल की मालकी हक्काचा पट्टा असेल, तो किती वर्षानी रिनिव केला पाहिजे.

सहा.आयुक्त(श्री.मेश्राम) :– मा.महापौर महोदय, आपण जे देत आहे तो शासन निर्णय दिनांक 17

नोव्हेंबर, 2018 नुसार देतो आहे. त्यानंतर 7 फेब्रुवारी, 2019 चा निर्णय, त्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 79 मध्ये सुधारीत अमेंडमेंट केलेले आहे 14 जानेवारी, 2019 ला त्यानंतर 6 मार्च, 2019 चा जो जी.आर. आलेला आहे शासनाचा त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की हा 30 वर्षाकरीता कायम स्वरुपी हा भाडेपट्टा राहील, त्यांच्याकडुन भुईभाडे वार्षिक 1 रुपया चौरस फुटाने वसुल केला जाईल, आणि त्यांना या भाडेपट्टयांचा आधारे वित्तीय संस्थाकडुन कर्ज घेण्याची मुभा राहील,

श्री.प्रविण दटकेः—मा.महापौरजी, ही जी पध्दत आपण महानगरपालिकेच्या जागेवर अवलंबितो आहे. आता मा.उपमहापौरांचा प्रभाग आहे. अर्धी जमिन महानगरपालिकेची आहे आणि अर्धी जमिन एन.आय.टी. ची आहे. तर एका बाजुला महानगरपालिका जे ठरवेल ते नियम लागतील आणि दुसरीकडे एन.आय.टी. जे ठरवेल ते नियम लागतील, याचा पण निर्णय मा.आयुक्तांच्या स्तरावर किंवा विभागाच्या स्तरावर नाहीतर या गल्लीत महानगरपालिकेचा नियम आणि या गल्लीत एन.आय.टी. चा नियम, आता आपण एन.आय.टी. ला पत्र दिले आहे. विभागीय अधिकारी उत्तर विभाग, नागपूर सुधार प्रन्यास आणि तुम्ही डिटेल पत्र दिले आहे. तरी सुध्दा एन.आय.टी. चे अधिकारी मान्य करायला तयार नाही. त्यामुळे माझी मा.महापौरांमार्फेत विनंती आहे की एक याची फायनल बैठक जे अधिकारी असतील, सर्व पदाधिकारी असतील यांच्यासमवेत त्यांचा विभाग आणि आपला विभाग आणि याचा एक निर्णय? या नागपूर शहरात एन.आय.टी. ने घाण करुन ठेवली आहे. ती परत या चांगल्या विषयात होईल, आणि एका चांगल्या विषयाला गालबोट लागेल, दुसरे मा.महापौरजींना मला अजून एक विनंती करायची आहे. नझुल विभागाने करारनामा करुन दिला आता हा करारनामा रजिस्टर करायचा आहे. जी पध्दत महानगरपालिकेने उत्तम पध्दत राबविली आहे त्या बद्दल मी मा.आयुक्त महोदयांचे आणि त्यांच्या हाताखालच्या सर्व अधिका—यांचे अभिनंदन करतो की जेवढे टॅक्स येतो आहे तेवढीच डिमांड यावी. नझुलनी पण तसेच करावे त्या संदर्भात बैठक आपल्या माध्यमातुन घ्यावी. मा.पालकमंत्री महोदय असतील, मा.सत्तापक्ष नेते, मा.विरोधी पक्ष नेते यांची सर्वांची मदत घेवुन त्याही बाबतीत असाचं रजिस्टर करारनामा मिळावा. एन.आय.टी, एन.एम.सी. आणि नझुल त्यांनी रजिस्टर करारनामा झाल्याशिवाय पट्टेवाटपाला ते डॉक्युमेंट देवु नये, नाहीतर त्याचा गैरवापर इतर लोक करतील, या सर्व सूचनांचा नीट अंतर्भाव आपण करावा. या विषयामध्ये काही राजकारण नाही. प्रत्येकाच्या प्रभागात गरीब लोक आहे. झोपडपट्टया आहे. त्यामुळे सर्वासाठी आहे. त्यामुळे मी मा.मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. मा.प्रफुल्लजींच्या काही सूचना असतील, माझ्या काही सूचना असतील त्या कायदेसंगत आहे. त्याचा अंतर्भाव करुन गरीबांचे भले करावे ऐवढीच विनंती आहे.

वरील चर्चेनंतर “सर्वांसाठी घरे-२०२२” या धोरणाचे प्रभारी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग चे शासन निर्णय एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दिनांक १७ नोव्हेंबर,२०१८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग)(अ) ची सुधारीत तरतुद बाबत दिनांक १४ जानेवारी,२०१९ रोजची महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिसूचना, शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१८/प्रक्र.३०९/नवि-१४, दिनांक ७.०२.२०१९, शासन निर्णय(शुध्दीपत्र) क्र. नासुप्र-२०१७/प्र.क्र. ५३/नवि-२६, दिनांक २६.०२.२०१९, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१७/नवि-२६, दिनांक ६.०३.२०१९ व शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१७/नवि-२६, दिनांक ८.०३.२०१९ च्या तरतुदीन्वये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवरील, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात असलेल्या सर्व शासकीय विभागांच्या (वन विभाग वगळून) जमिनीवरील, नागपूर सुधार प्रन्यास च्या जागेवरील, नागपूर महानगर विकास प्राधिकरण जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करुन भाडेपट्टयाने देणे अभिप्रेत असल्याने अतिक्रमण धारकांस द्यावयाच्या भाडेपट्टयाच्या प्रारुपांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग)(अ) च्या सुधारीत तरतुदीचा, उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदी नुसार अटी व शर्ती अंतर्भूत करणे गरजेचे असल्याने यापूर्वी नागपूर महानगरपालिका सभागृहाने ठराव क्र. १७६ दिनांक २०. ०२.२०१८ अन्वये मंजूर केलेल्या भाडेपट्टयाचे प्रारुपात बदल करणे गरजेचे आहे. खालील प्रमाणे अटी व शर्ती अंतर्भूत केलेल्या सुधारीत भाडेपट्टा करारनामा प्रारूपास मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न विचारात घेणे

.................................................., स्लम कोड क्र....................... मधील भोगवट्याखालील जागेचा
३० वर्षीय स्थायी भाडेपट्टा

अधिमुल्य राशी :-................. वार्षीक भुभाटक :-....................... बाजारमुल्य :-...........................

पार्टी क्र.१ :- आयुक्त, नागपूर महानगरपालिका मार्फत नियंत्रण अधिकारी, झो.प.वा.सेल तथा सहा. आयुक्त (कर), म.न.पा. सिव्हील लाईन्स, नागपूर

आणि

पार्टी क्र.२ :- ...................................................................... झोपडीधारक

वय :-........... वर्षे

राहणार :- ..................................................................................................
..........................................................................................................

ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका (पार्टी क्र.१) यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग), महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय एमयुएन-२०१८/प्र.क्र.१९७/नवि-१८, दिनांक १७ नोव्हेंबर,२०१८, शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र. ३०९/नवि-१७ दिनांक ०७/०२/२०१९ व शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१७/नवि-२६ दिनांक ०६/०३/२०१९ अंतर्गत तरतुदी अन्वये मौजा ....................................... खसरा क्र............................... ......... चे झोन क्र........., म.न.पा., नागपूर येथील महानगरपालिके द्वारे करण्यात आलेल्या प्लेन टेबल सर्व्हे नकाशानुसार, महानगरपालिकेचे मालकीच्या एकूण आराजी ........................... चौ.मी. जागेवरील प्लेन टेबल सर्व्हे नकाशानुसार झोपडी क्र.................... कर विभागाचे घर क्र. ................., घर टॅक्स रू.................../- वार्ड क्र.......... अंतर्गत झोपडीधारकाचे भोगवट्याखालील .............. चौ. मी. जागा खालील अटीवर ३० वर्षाचे स्थायी भाडेपट्टयावर वाटप करावयाचे ठरविलेले आहे.

आणि ज्याअर्थी, या झोपडपट्टीतील प्लेन टेबल सर्व्हे नकाशानुसार झोपडी क्र................. असलेली जागा, पार्टी क्र.२ यांचे वहीवाटीत व ताब्यात आहे.

आणि ज्याअर्थी, पार्टी क्र.२ खालील अटींवर या भुखंडाचा भाडेपट्टा घेण्यास तयार आहे.

त्याअर्थी, या भाडेपट्टयाचा करारनामा खालील अटी व शर्तीवर करण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

**१७.** महानगरपालिके द्वारे करण्यात आलेल्या प्लेन टेबल नकाशानुसार ........................... झोन कार्यालयाचे क्षेत्रातील .................................. या झोपडपट्टी अंतर्गत मौजा- .......................... खसरा क्र........................ असलेल्या जागेची एकूण आराजी .................. चौ.मी. क्षेत्रावरील महानगरपालिके द्वारे करण्यात आलेल्या प्लेन टेबल सर्व्हे नकाशानुसार झोपडी क्र. ................... व झोपडीधाकरकाचे भोगवटयाखालील असलेली ................. चौ.मी. (..................... चौ.फुट) जागा पार्टी नं. २ यांना संयुक्तपणे दिनांक ................... पासून ...................... पावेतोच्या ३० वर्षाचे भाडेपट्टयावर भाड्याचा वार्षीक दर रू.१/- प्रती चौरस फुट (अक्षरी एक रूपया चौरस फुट) दरवर्षी महानगरपालिका निधीत जमा करणेच्या अटीवर देण्यात येत आहे.

**१८.** पार्टी नं. २ अतिक्रमणधारक हे अनुसूची जाती/अनुसूचीत जमाती/इतर मागासवर्गीय प्रवर्गातील/आर्थीक दृष्ट्या दुर्बल प्रवर्गातील असल्याने अधिमुल्य रक्कमेची आकारणी तसेच महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दिनांक ०३ जानेवारी,२०१७ मधील तरतुदीनुसार त्यांना

भाडेपट्टयाने द्यावयाचे जागेकरीताचे दिनांक ०१/०१/१९९५ पासून वसुल करावयाचे एकूण एकत्रित सेवाशुल्काची आकारणी करता येणार नाही.

**१९.** १५०० चौ.फुट क्षेत्रफळापेक्षा जास्त जागेवर अतिक्रमण असलेल्या अतिक्रमणधारकांनी १५०० चौ.फुट पेक्षा जास्त/अधिकचे असलेले त्याचे अतिक्रमण स्वतः निष्काषीत केल्या शिवाय अशा अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण नियमानुकूल झाले असे गृहीत धरू नये.

**२०.** नागपूर महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करतांना अतिक्रमण धारकांनी अतिक्रमित केलेल्या जागेपैकी रस्ता, गटारे, पाणीपुरवठा यासारख्या अत्यावश्यक मुलभूत सोयी सुविधांसाठी आवश्यक असलेले क्षेत्र कोणत्याही मोबदल्याशिवाय नागपूर महानगरपालिकेकडे वर्ग करण्याची लेखी हमी अतिक्रमणधारकांनी दिलेली असल्यानेच अतिक्रमित जागा नियमानुकूल करून भाडेपट्टा देण्यात येत आहे.

**२१.** अतिक्रमणधारक यांना वार्षीक भाड्याचा दर रू.१/- प्रती चौरस फुट (अक्षरी एक रूपया चौरस फुट) प्रमाणे येणाऱ्या वार्षीक भाड्याची रक्कम वर्षाच्या प्रथम आठवडयात दरवर्षी नागपूर महापालिका निधीत जमा करणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत वार्षीक भाडे रक्कम नागपूर महापालिका निधीत जमा न केल्यास नागपूर महानगरपालिका सदहू अतिक्रमित जागेचा भाडेपट्टा रद्द करून जागेचा ताबा परत घेईल.

**२२.** जागेचा भाडेपट्टा प्रथम ३० वर्षाकरीता राहील व मुदतीनंतर महानगरपालिका व शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने त्यावेळेच्या स्थितीस अनुसरुन सक्षम प्राधिकरणाचे अनुमतीने भाडेपट्टा नुतनीकरणाचे कार्यवाहीचा निर्णय घेण्यात येईल. ही बाब पार्टी नं. २ यांना मान्य राहील.

**२३.** अतिक्रमित जागेचा पुनर्विकास करतांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील व विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार आवश्यक त्या सोईसुविधा देणेकरीता तयार केल्या जाणाऱ्या एकत्रित अभिन्यास करीता गरज भासल्यास आवश्यक जागा उपलब्ध करून देणे अतिक्रमणधारकांस बंधनकारक राहील.

**२४.** पार्टी नं. २ यांना या जागेवरील अस्तित्वात असलेले वा प्रस्तावित बांधकामास सक्षम प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त करणे व अनधिकृतरित्या असलेले बांधकाम काढून टाकणे आवश्यक राहील.

**२५.** नागपूर महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमित जागा ही अतिक्रमण धारकांकडून निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येत असल्याने व वापरली जाणार असल्याने अतिक्रमित जागा नियमानुकूल करून भाडेपट्टा देण्यात येत आहे.

**२६.** ''या भाडेपट्टयाद्वारे नियमानुकूल केलेले अतिक्रमण क्षेत्रफळा व्यतिरीक्त नागपूर महानगरपालिकेच्या वा इतर संस्थेच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आल्यास हा भाडेपट्टा रद्द करण्याचा अधिकार नागपूर महानगरपालिकेस असेल.

**२७.** भाडेपट्टा धारकाने कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास पार्टी नं. १ अथवा त्यांचेकडून नियुक्त अधिका-यास भाडेपट्टा रद्द करण्याचा अधिकार अबाधित राहील. हयामुळे पार्टी न.२ हयांना या जागेबाबत वा बांधकामाबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार राहणार नाही.

**२८.** या भाडेपट्टयातील अटी व शर्ती पार्टी नं. १ व २ ला मान्य आहेत. महाराष्ट्र शासन, नगर

विकास विभागाचे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यासंबंधीचे शासन निर्णय दिनांक १७.११.२०१८, शासन निर्णय दिनांक ०७/०२/२०१९, दिनांक ०६/०३/२०१९ व दिनांक ०३/०१/२०१७ मधील अटींचे पालन पार्टी नं. २ ला करावे लागेल. कोणत्याही शर्तीचा अथवा अटींचा अर्थ लावण्याचा अधिकार पार्टी नं. १ अथवा त्यांचेकडून नियुक्त अधिका-यास राहील व तो अर्थ पार्टी नं. २ ला बंधनकारक राहील.

**२९.** सदर भाडेपट्टा करार पंजीबध्द करण्याकरीता नियमानुसार लागणारी स्टॅम्प डयुटी खर्च व पंजियन शुल्क इ. चा भरणा करण्याची जबाबदारी ही पाटी नं. २ यांची राहील.

**३०.** या भाडेपट्टा करारामधील पार्टी नं. १ व २ मधील प्रत्येकी त्यांचे वारसान, एजंट, प्रशासक व या भुखंडापासून ज्यांना फायदे मिळतील असे सर्व लोक अंतर्भुत समजण्यात येतील.

**३१.** ......................... या स्लम क्षेत्रातील झोपडी क्र. ............. असलेल्या जागेचे संलग्न प्लेन टेबल सर्व्हे नकाशा व महानगरपालिकेत उपलब्ध घर निहाय संलग्न यादी ही या भाडेपट्टा कराराचा भाग आहे.

**३२.** अतिक्रमणधारकास घराचे बांधकाम करण्यासाठी वित्तीय संस्थांकडून आवश्यक ते कर्ज उभारणेकरीता त्यांचे नियमानुकूल करण्यात आलेले क्षेत्र/बांधकाम तारण ठेवण्यासंदर्भात महसूल विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

भाडेपट्टयाने द्यावयाचे जागेची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे :-

उत्तरेस -
दक्षिणेस -
पूर्वेस -
पश्चिमेस -

नियंत्रण अधिकारी/सहा. आयुक्त (कर)
झो.प.वा.सेल
महानगरपालिका, नागपूर

साक्षीदार :-
१) सही :-................................

नांव :-................................
रा. :- ...............................

(पाटी क्र.१)

२) सही :-................................
नांव :-................................
रा. :- ...............................

भाडेपट्टेवार
(पाटी क्र.२)

दिनांक :-

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून नागपूर शहरामध्ये अनेक ठिकाणी पीटीएस सर्वे चुकीच्या पध्दतीने झालेला आहे तो दुरूस्त करून लोकांची रजिस्ट्री करण्यात यावी या मा.विरोधी पक्ष नेते श्री. तानाजी वनवे यांनी केलेल्या सुचनेनुसार तसेच झोपडपट्टीच्या संदर्भात जो करारनामा झालेला आहे त्यात पट्टयाची लीज 30 वर्षाची केलेली आहे. 30 वर्षानंतर जे रिनिव्हल क्लॉज टाकले आहे त्यानुसार रिनिव्हल करता येईल काय? पट्टे धारकाने बांधकाम मंजूर करून घेतले पाहिजे परंतु फ्रन्ट व साईड

मार्जिन सोडल्यानंतर  बाकीच्या जागेचा उपयोग औद्योगिक वापरासाठी करता येईल काय? त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा उल्लेख करण्यात आला नाही.  झोपडपट्टयामध्ये जे उद्योग अस्तित्वात आहेत त्यांना करारनाम्याच्या माध्यमातून संरक्षण देण्यात येणार आहे काय? असे मा.सदस्य श्री.प्रफुल गुडधे यांनी सुचविल्याप्रमाणे स्थावर विभागाने किरायापत्र केले आहे. लोकांनी  1000 रूपयाची डिमांडपत्र भरलेल्या आहे. ज्यांची 500 स्केअर फुटापेक्षा जास्त जागा होती त्यांना स्थावर विभागाकडून पट्टे तयार करून देण्यात आले नाही. त्या लोकांना मालकी हक्काचे पट्टे केव्हा मिळणार आहे त्यांची रजिस्ट्री केव्हा करून देण्यात येणार आहे. तसेच मा. सदस्य श्री. प्रवीण दटके यांनी सुचीत केल्या प्रमाणे की, नागपूर महानगरपालिकेच्या जागेवर वर्षानुवर्षेपासून बसलेल्या झोपडपट्टीवासीयांना स्थावर विभागाने यापूर्वी दिलेल्या भाडेपट्टयात व शासन निर्णयाप्रमाणे सध्यास्थितीत दयावयाच्या भाडेपट्टयातील अटी व शर्तींमध्ये बरीच तफावत आहे. उक्त सुचनेच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा ज्या झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषीत/अघोषीत आहेत. सदर्हू झोपडपट्टी क्षेत्रातील अतिक्रमीत जागेकरीता नागपूर महानगरपालिकेच्या स्थावर विभागाने यापूर्वी भाडेपट्टा दिलेला आहे. परंतू उक्त भाडेपट्टा हा तेव्हाचे नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ च्या तरतुदी, तेव्हाचे शासन निर्णयाच्या तरतुदीन्वये, महानगरपालिकेचे ठराव नुसार अटी व शर्ती अंतर्भूत करून भाडेपट्टा देण्यात आलेला आहे. ज्या अतिक्रमीत जागेकरीता यापूर्वी दिलेल्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करणे अपेक्षीत आहे, ज्या भाडेपट्टयाकरीता कालावधी अजूनही संपुष्ठात आलेला नाही, अशा अतिक्रमणधारकांना सुद्धा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७९ खंड 'ग' मधील उपखंड 'अ' च्या तरतुदीन्वये केलेला बदल व महाराष्ट्र शासनाने घेतलेले तत्संबंधी निर्णय या मधील अटी व शर्ती अंतर्भूत करून भाडेपट्टा दिल्यास नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर वर्षानुवर्षेपासून वसलेल्या झोपडपट्टीवासीयांना दिल्या जाणाऱ्या भाडेपट्टयातील अटी व शर्तीमध्ये एकसुत्रता राहील याबाबत सविस्तर चर्चेत प्राप्त सुचनानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील घोषीत/अघोषीत झोपडपट्टी क्षेत्रातील रहीवाशांना यापूर्वी स्थावर विभागाने दिलेला भाडेपट्टा निरस्त करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ खंड 'ग' मधील उपखंड 'अ' ची तरतुद व शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.३०९/नवि-१८ दि.०७/०२/२०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीतील अटी व शर्तींचा अंतर्भूत करून प्रस्तूत केलेल्या भाडेपट्टयाच्या प्रारूपाप्रमाणे सुधारीत भाडेपट्टा देणे व तसेच ज्या अतिक्रमणधारकांना यापूर्वी भाडेपट्टा देण्यात आलेला नव्हता अशा रहीवाशांना सुद्धा प्रस्तूत प्रारूपाप्रमाणे भाडेपट्टा देण्यात यावा. तसेच पट्टेवाटप विषयाच्या संदर्भात एनआयटी व नझुलचे अधिकारी कोणतीही बाब मान्य करण्यास तयार होत नाही. या संपुर्ण विषयाच्या संदर्भात महापालिका स्तरावर एनआयटी, नझुल यांची बैठक घेण्यात यावी त्या बैठकीत पट्टेवाटपाच्या विषय संदर्भात ज्या सुचना येतील त्या नमुद करण्यात याव्यात या मा.सदस्य श्री.प्रवीण दटके यांनी केलेल्या सुचनेनुसार या विषयाच्या संदर्भात एनआयटी, नझुल यांची मा. पालकमंत्री स्तरावर बैठक लावण्यात येईल या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क.401 / वि.क्र.326:— प्रभाग क्र. १८ अंतर्गत साने गुरुजी उर्दु हायस्कुल राहतेकरवाडी, शिट क्र. २५७, सिटी सर्व्हे ६२२, मौजा नागपूर या जागेवर जुनी शाळा असून ती शिकस्त झाल्यामुळे शाळेची इमारत पाडण्याबाबत म.न.पा. सभेची मंजुरी प्राप्त व्हावी, याकरीता शिफारस करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या विषयाला प्राप्त उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

उपसुचना

वरील विषयान्वये माझे प्रभाग क्र. १६ अंतर्गत विश्रामनगर क्रीडांगणातील वापरात नसलेल्या पडीत खोलीत अवैध धंदे चालतात. त्यामुळे परिसरातील नागरीकांना त्रास होत आहे. या खोली कोणताही वापर चांगल्या कामाकरिता केल्या जात नाही. त्याकरिता ही पडीत खोली तात्काळ तोडणे आवश्यक आहे. करिता या उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात यावा.

सूचकः– हस्ता/– संदीप जोशी
अनुमोदकः–हस्ता/– हरीश डिकोंडवार

उपसुचना

प्रभाग क्र. 24 अंतर्गत डिप्टी सिंगल संजय नगर मनपा शाला के सामने समाज भवन जिर्ण हो गया है । उस समाज भवन के अंदर बारीश का पानी जमा हो रहा है । आपसे निवेदन करती हुॅं, यह जिर्ण समाज भवन तोडने कि मंजूरी प्रदान करे ।

सूचकः– हस्ता/– सरिता कावरे
अनुमोदकः–हस्ता/– शेषराव गोतमारे

उपसुचना

प्रभाग क्र. 9 स्थित परदेसीपुरा, गड्डीगोदाम येथील सरकारी शौचालय (सार्वजनिक) जे जीर्ण–शिर्ण झालेले आहे ते पाडण्यात यावे अशी तिथे राहणा–या नागरिकांची इच्छा आहे. सबब, परदेसीपुरा, गड्डीगोदामचे सार्वजनिक शौचालय तोडण्यास मनपा सभागृहातर्फे मान्यता प्रदान करण्यात यावी.

सूचकः– हस्ता/– निशांत गांधी
अनुमोदकः–हस्ता/– संजय बुर्रेवार

उपसुचना

राजाबाळ चिटणीस प्रा. शाळा उमरेड रोड, ही शाळा अत्यंत जिर्ण अवस्थेत असल्याने त्या शाळेची इमारत तोडने अत्यंत अनिवार्य आहे. तसेच उमरेड रोड स्थित दिघोरी चौक येथील बसस्टॉप हा जिर्ण अवस्थेत असून उमरेड रोडच्या विस्तारीकरणात तसेच वाहतुकीस बाधा निर्माण होत असल्याने हा बसस्टॉप तोडून त्याच्या मागील भागात नवीन बसस्टॉप बनविणे अनिवार्य आहे.

करीता राजाबाळा चिटणीस प्रा.शाळा उमरेड रोडची शिकस्त इमारत व दिघोरी चौक येथील बसस्टॉप पाडण्याकरिता एकमताने मंजूरी प्रदान करण्यात यावी.

सूचकः– हस्ता/– विजय झलके
अनुमोदकः–हस्ता/– लखन येरवार

उपसुचना

प्रभाग क्र. 22 सराफा बाजार इतवारी येथील सार्वजनिक शौचालय अतिशय जुने असुन शिकस्त अवस्थेत आहे. येथे नव्याने सार्वजनिक शौचालय बांधण्याचा प्रस्ताव मंजुर असुन जुने शिकस्त शौचालय तोडणे आवश्यक आहे.

सदर इमारती बांधकाम व मालकी म.न.पा. ची असल्याने सदर बांधकाम पाडण्याकरिता मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेतला.

सूचकः– हस्ता/– वंदना यंगटवार
अनुमोदकः–हस्ता/– दयाशंकर तिवारी

उपसुचना

जाटतरोडी शाळेमध्ये सुरक्षा भिंत लगत तीन शिकस्त खोल्या आहे. त्या खोल्यांमध्ये परिसरातील असामाजिक तत्वांचा जमावडा असतो. करिता जाटतरोडी शाळेच्या तीन खोल्या तोडण्यात याव्या. या शिकस्त बांधकामाकरिता झोन क्र. 4 येथील झोन समितीमध्ये हा प्रस्ताव मंजुर झाला आहे. करिता आपण

लवकरात लवकर हे बांधकाम पाडण्याकरिता मंजुरी दयावी.

काफला बस्ती स्थित रोहित बिंझाडे व लोकेश जाधव यांच्या घरासमोरील सार्वजनिक शौचालय शिकस्त व जीर्ण झालेले आहे. या जीर्ण झालेले शौचालयाचे बांधकाम लवकरात लवकर पाडण्यात यावे कारण दुर्बल घटक समितीतून या सार्वजनिक शौचालयाचे नविनीकरण करिता निधी मंजुर झालेली आहे. या शौचालयाचे जीर्ण व शिकस्त बांधकाम पाडण्याकरिता मंजूरी दयावी.

तसेच कुंदनलाल वाचनालय मैदान लगत वाल्मिकी समाज भवन ही इमारत खुप जुनी व जीर्ण झालेली असून या इमारतीचे बांधकाम पाडण्यात यावे. कारण मा. मुख्यमंत्री निधीतून नविन बांधकाम समाज भवन बांधण्याकरिता प्रस्ताव मंजूर झालेला आहेव तरी वाल्मिकी समाज भवन चे जुने व शिकस्त बांधकाम तोडण्यात यावे.

सूचकः— हस्ता/— विजय चुटेले
अनुमोदकः—हस्ता/— लखन येरवार

उपसुचना

1)तकिया धंतोली सागर टेकाम यांच्या घराजवळील सरकारी संडास 2) बाबुराव डोंगरे यांच्या घराच्या मागील सरकारी संडास हे 30 वर्षापासुनचे जुने आहे. आता हे जीर्ण अवस्थेमध्ये आहे व ते पुर्णपणे तुटलेले आहे. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरीकांना या पासुन फार त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असते. या भागातील प्रत्येक नागरिकांच्या घरी संडास झाल्यामुळे या सरकारी संडासचा कोणत्याही प्रकारचा वापर होत नाही. करीता हे दोन्ही सरकारी संडास तोडण्याकरिता म.न.पा. च्या सर्वसाधारणसभेमध्ये हया विषयाला एकमताने मंजूरी प्रदान करावी.

सूचकः— हस्ता/— लखन येरवार
अनुमोदकः—हस्ता/— लहुकुमार बेहते

उपसुचना

शंकर नगर प्रा. शाळा अनेक वर्षापासुन बंद असून, इमारत अनेक वर्षापासून रिकामी आहे. उपरोक्त जागी 'जिजाऊ स्मृती शोध संस्थान प्रकल्प' प्रस्तावित आहे. उपरोक्त प्रकल्पाला प्रशासकीय मंजूरी आणि शासकीय अनुदान प्राप्त होणार आहे. उपरोक्त जागी सद्या स्थितीतील इमारत पाडून त्या ठिकाणी 'जिजाऊ स्मृती शोध संस्थान प्रकल्प' उभारण्यासाठी मनाच्या सभेत एकमताने मंजूरी प्रदान करावी.

सूचकः— हस्ता/— संजय बंगाले
अनुमोदकः—हस्ता/— रूपा रॉय

ठराव क्र.402:— नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या अधिक्षक अभियंता (जलप्रदाय) या पदावर शासन पत्रा दि. 29 डिसेंबर 2017 नुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्र. 28306/2017 च्या निर्णयाच्या अधीन राहून खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार, वेतनमान रू. 15600—39100 ग्रेड पे 7600 या वेतनश्रेणीत प्राप्त वेतन आणि इतर भत्त्यासह खाली दर्शविलेल्या कार्य. अभियंता (स्थापत्य) यांना अधिक्षक अभियंता (जलप्रदाय) या पदावर पदोन्नती देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

| अ क्र. | ना. बि. क्र. | से जे क्र. | नांव | जात | जात वैधता प्रमाणपत्रा दिनांक | पदनाम | शैक्षणिक पात्राता | प्रथम नियुक्ती | गोपनीय अहवालाची प्रत वारी | विभागीय चौकशी | परिक्षा पास (डै.ब्ज्ज ६ स्पैण्ळण्क) | अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | — | 1 | श्री. एम. एच. तालेवार | बेलदार (विमुक्त जाती) | V.C. No. I. 626605 dt. 27/3/2014 N.T. | नगरयंत्री / कार्य. अभियंता (स्थापत्य) लोककर्म विभाग | B.E. (CIVIL), MSCIT 2004, Porject Management & Building Construction 2008, | 16/10/91 नियुक्ती कनिष्ठ अभियंता (सिव्हील) छण्ज्ज प्रवर्गात<br>16/03/93 नियुक्ती सहा. अभियंता (सिव्हील) N.T.izoxkZr | अ | नाही | MSCIT Sept. 2004 | कार्य. अभियंता (स्थापत्य) या पदावर दि. 16/11/2015 रोजी खुल्या संवर्गात पदोन्नती दिलेली असून या | पात्र |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | PGD | | | | | पदावरील अनुभव– 3 वर्षे पूर्ण | |

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.403ः— नागपूर महानगरपालिका ठराव क्र. 31 दि. 12/04/1976 नुसार हवालदार वेतनमान (सहाव्या वेतन आयोगानुसार) वेतनश्रेणी रू. 5200—20200 गेड पे 1900 या पदाला कर संग्राहकर/कनिष्ठ लिपीक/ मोहरीर/मिटर रीडर वेतनमान रू. 5200—20200 गेड पे 2000 हे पदोन्नतीनचे पद होते.

नागपूर महानगरपालिका ठराव क्र. 31 दि. 12/04/1976 नुसार कर संग्राहक/मिटर रीडर /मोहरीर या पदाला कनिष्ठ निरीक्षक वेतनमान रू. 5200—20200 गेड पे 2400 (सहाव्या वेतन आयोगानुसार) हे पदोन्नतीचे पद होते.

नागपूर महानगरपालिका ठराव क्र. 28 दि. 05/05/2017 नुसार कर संग्राहक/कनिष्ठ लिपीक/मिटर रीडर/मोहरीर/हवालदार/एम.एस.डब्ल्यु/एस.एफ.डब्ल्यु/किटक संग्राहक या पदाचे वेतनमान रू. 5200—20200 ग्रेड पे 1900 (सहाव्या वेतन आयोगानुसार) करण्यात आलेले आहे.

हवालदार या पदाची कर्तव्य व कर संग्राहक/मिटर रीडर/मोहरीर या पदाची कर्तव्य समान असल्यामुळे व वेतनश्रेणी समान असल्यामुळे ज्या प्रमाणे कर संग्राहक/मिटर रीडर/मोहरीर यांना पूढील पदोन्नतीचे पद कनिष्ठ निरीक्षक आहे त्याप्रमाणेचे हवालदार या पदाला देखील पदोन्नतीचे पद ''कनिष्ठ निरीक्षक '' करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच कनिष्ठ निरीक्षक या पदावर पदोन्नती देतांना कर संग्राहक/मिटर रीडर/मोहरीर यांच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीत ''हवालदार'' या पदावरील कर्मचा—यांना समावेश करून हा ठराव कार्यान्वीत झाल्याचे दिनांकापासुन हवालदार या पदावरील कार्यरत कर्मचा—यांना त्यांचे हवालदार या पदाचे सेवाजेष्ठता क्रमानुसार कर संग्राहक/मिटर रीडर /मोहरीर या पदाच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीच्या अंतीम क्रमानंतर समाविष्ट करण्यात येवून कनिष्ठ निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

++ ++ ++ ++

श्री.तानाजी वनवे :— मा.महापौरजी, यामध्ये हवलदार, कनिष्ठ निरीक्षक म्हणुन पदोन्नती देण्यासंदर्भात देण्याचा जो विषय आहे त्यामध्ये कॉमन सिनॅरिटी नुसार सर्वांना लागू करावे. कोणासाठी वेगवेगळे असे बदल करण्यात येवू नये. कॉमन सिनॅरिटी ही सर्वांना लागू करावी ही माझी सूचना आहे.

श्री.प्रविण दटके :— मा.महापौरजी, क्लास 4 मधुन सर्व कॅटॅगिरीवर एका दिवशी प्रमोशन झाले. एक कर्मचारी हवालदार झाला, एक कर्मचारी कनिष्ठ लिपीक झाला. परंतु आज प्रमोशन देतांना जुणे प्रमोशन चॅनल होते की हवालदाराचा कनिष्ठ लिपीक आणि कनिष्ठ लिपीकाचा कनिष्ठ निरीक्षक पण याच्यामध्ये डिसपॅरिटी अशी होत आहे की, कोणी क्लास 4 मधुन हवलदार मध्ये गेले कोणी कनिष्ठ लिपीक मध्ये गेले आणि एका संवर्गाला जास्त लाभ होत आहे. त्यामुळे डिसपॅरिटी ठेवु नये. ज्या दिवशी एकसाथ प्रमोशन झाले त्याच दिवशी समोरची पण पध्दत असावी कारण हवलदार या पदावर अन्याय होत आहे. ग्रेड पे सारखे असूनही कनिष्ठ लिपीकाला वरीष्ठ लिपीकाचे आणि हवलदाराला कनिष्ठ लिपीकाचे मिळत असेल तर तसे न करता सर्वासांठी सारखा न्याय वापरावा. ती जी सूचना त्याला मी अनुमोदन करतो. मा. महापौरजी, जर प्रशासनाची काही वेगळी भूमिका असेल तर ती आता निश्चित करायची आहे. कारण प्रशासन नेहमी येथे विषय झाले की, अ, ब, क, मग अ मंजूर केला की बाकी ठेवून देते, त्यामुळे त्यांनी काही अडचणीची भूमिका असेल आम्ही त्यांच्या विरोधात बोलत असू तर येथे येवून भुमिका स्पष्ट करावी, नाहीतर सभागृहाचा निर्णय मान्य केला पाहिजे. याच्या आधी 2 अधिकारी रिलीव्ह झाले. माझे कोणाच्या बद्दल वैयक्तीक आकस नाही. आणि 2 अधिकारी तिथेच आहे. तुमचा निर्णय होता. त्यामुळे प्रशासनाची काही वेगळी भूमिका असेल आणि आमची भूमिका जर नियमासंगत नसेल, तर ती त्यांनी समजून सांगावी आम्ही मान्य करतो. नाहीतर येथून निर्णय झाला तर कागदी घोडे नाचविणे हे चालणार नाही.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी, या संबंधाने मी माहिती देवू इच्छितो की, सध्या आपले पदोन्नती चॅनल आहे. हवालदार पदावरुन कनिष्ठ लिपीक, मिटर रिडर, मोहरीर, टॅक्स कलेक्टर या पदावर पदोन्नती देतो. आणि हवालदार पदाची ग्रेड पे आहे सध्याची ती ग्रेड पे 1900 आहे. आणि कनिष्ठ लिपीक, मोहरीर, आणि मिटर रिडर या पदाची ग्रेड पे ती 2000 आधी होती नंतर ते ग्रेड पे 1900 केली होती. 2017 ला आपला ठराव झाला होता की शासनामध्ये असे दोन वेगवेगळे ग्रेड पे नाही आहे. त्यामुळे आपण सुध्दा शासनाप्रमाणे कनिष्ठ लिपीक, मिटर रिडर, मोहरीर या पदाची ग्रेड पे 1900 केला. त्यामुळे दोन्ही पदाचा ग्रेड पे सारखा झाल्यामुळे हा प्रस्ताव आपण पुट अप केलेला आहे. म्हणजे आधी हवलदार वरुन टॅक्स कलेक्टर आणि कनिष्ठ निरीक्षक अशाप्रमाणे पदोन्नतीचे चॅनल होते. आता दोघांचेही वेतन श्रेणी सारखी असल्यामुळे हवालदार या पदाला मिटर रिडर किंवा टॅक्स कलेक्टर या पदावर पदोन्नती दिली तर त्यांना फायननशिअल बेनिफीट काहीच मिळत नाही. म्हणुन आपण पदोन्नती चॅनलमध्ये हवालदार पदावरुन कनिष्ठ निरीक्षक करावे अशी युनियनची देखील मागणी होती आणि ते न्यायसंगत होती म्हणुन आपण तशा स्वरुपाचा प्रस्ताव पुटअप केलेला आहे. आता मा.सदस्य जे म्हणतात त्याप्रमाणे करता येईल परंतु आता जे कार्यरत कनिष्ठ लिपीक, मोहरीर, टॅक्स कलेक्टर किंवा मिटर रिडर आहे ते आधीपासुन वर्ग 3 च्या 2000 च्या स्केलवर आहे त्यांच्यावर अन्याय होईल.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, आमचा मुद्या आहे की मिटर रिडर, हवलदार या क्लास 4 च्या कर्मचाऱ्यांचे ज्यांचे एकाच दिवशी प्रमोशन झाले हा त्याच्या बाबतीतील मुद्या आहे. जे सिनिअर असतील मला त्यांच्या संदर्भात काहीच बोलायचे नाही. 4 कर्मचाऱ्याचे क्लास 4 मधुन क्लास 3 मध्ये प्रमोशन झाले. कोणी हवलदार झाला, कोणी लिपीक झाला, कोणी मिटर रिडर झाला, त्यांच्या बाबतीत आमचे म्हणणे आहे. मी सिनिअर कर्मचा–या संदर्भात बोलत नाही.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी, ज्या हवलदार या पदावरुन पदोन्नती झाली आहे. ती 1900 च्या ग्रेड पे वर झालेली आहे. त्यामध्ये 8 वी पास हा क्वॅालिफाईंग क्रायटेरिया होता. त्यांना मिटर रिडर आणि मोहरीर केले तर त्यांचा आक्षेप येवु शकेल असा माझे म्हणणे आहे.

श्री.तानाजी वनवे :– मा.महापौरजी, यामध्ये आमचे म्हणणे वेगळे नाही. यामध्ये प्रविणजी जसे बोलले कॉमन सिनॅरिटी लिस्टप्रमाणे सर्वांना ते लागू करावे.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी,कनिष्ठ निरीक्षक पदावर पदोन्नती करत असतांना आपण आधी मिटर रिडर, मोहरीर आणि टॅक्स कलेक्टरची कॉमन सिनॅरिटी करत होतो आता हवालदार त्या पदाला त्या पदोन्नती चॅनलमध्ये समाविष्ट करायचे आहे म्हणुन त्याची कॉमन सिनॅरिटी करणार आहे. मग त्यांना कुठे घ्यायचे तो एक मुद्या आहे. शेवटी मग त्या आधीचे मिटर रिडर, आणि मोहरीर आहे त्यांच्यावरती पण येवु शकते मग हे लोक.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, जसे लाड आणि पागे समिती आहे. त्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार ज्यांनी एस.आय. चा डिप्लोमा केला तो डायरेक्ट इन्सपॅक्टर झाला, आणि त्याच्यापेक्षा सिनीअर कर्मचाऱ्यांनी एस.आय. चा डिप्लोमा नव्हता केला तो जमदारच आहे. तुम्ही 12/04/1976 चा विषय म्हणता, तेव्हा आपले एस्टॅब्लिशमेंट झाले, तेव्हा ग्रेड पे वेगवेगळे होते, ते तुम्ही आता एकत्रित केले, तुम्ही ते न प्रमोशन केले.

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी, त्यामध्ये चॅनलप्रमाणे झाले नव्हते.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, त्यामध्ये चॅनलप्रमाणे झाले नव्हते ते कर्मचाऱ्यांची चुक आहे काय?

सहा.आयुक्त (श्री.धामेचा) :– मा.महापौरजी, पदोन्नती चॅनलमध्ये हवालदार या पदावरुन पदोन्नती मध्ये टॅक्स कलेक्टर आणि मिटर रिडर असेच आहे.

श्री.प्रविण दटके :– मा.महापौरजी, आता विषयांतर करायचे असेल तर मी खूप भाषणे देवु शकतो. फाईलीच आणल्या, अनेक ठिकाणी चॅनल असतांना किंवा नसतांना निगम सचिव असेल, सांख्यिकी अधिकारी असेल, समजा आम्ही नियमाच्या विरुध्द बोलत असु किंवा तो प्रस्ताव अयोग्य असेल तर ठिक आहे. कायदयामध्ये असेल आणि आपल्याला अडचण चालली म्हणुन आपण करीत असु तर हे अयोग्य आहे. हा कर्मचाऱ्यांवरचा अन्याय आहे. एवढीच विनंती आहे आहे ती तपासून घ्यावी, करायच्या अगोदर जर ते कायदेसंगत असेल तो मा.महापौरांकडे दयावा, आणि नंतर निर्णय घ्यावा. दुसरे मा.महापौरजी, विषय ओ ॲन्ड एम चा असो त्या बद्दल एकच विनंती आहे. अनेक कर्मचाऱ्यांच्या म्हणजे सहा.आयुक्तांच्या किंवा उपायुक्तांच्या प्रमोशन पासून ते डेप्युटी इंजिनिअर, ज्युनिअर इंजिनिअर इथपासून अनेक लोकांच्या

प्रमोशनच्या फाईली ओ ॲन्ड एम विभागातून निट वेळेच्या वेळी होत नाही. हे दुर्देव्य आहे. अनेक कर्मचारी रिटायर्ड झाले. शेवटच्या दिवशी विनंती करतात, ए.सी. असतील, सी.ई. असतील कार्यकारी अभियंता असतील, की मी उद्या रिटायर्ड होतो आहे माझा विषय आज घ्या. त्यामुळे ओ ॲन्ड एम सेक्शनच्या संदर्भात आपण मा.आयुक्तांना आदेश दिले पाहिजे एक तर माझे मत वैयक्तीक आहे ते कायद्यामध्ये बसते किंवा नाही ते तपासून घ्यावे. या पदावर सहा.आयुक्त असणारा माणुस याच्यापेक्षा बाहेरचा किंवा उपायुक्त दर्जाचा माणुस, तिराहीक माणुस पाहिजे तेव्हा तेथील स्वार्थ बाजूला होईल नाहीतर मी माझ्या मर्जीने फाईल तयार करतो. उदा. सांगायचे  झाले तर मा.स्थायी समिती अध्यक्षांनी एखादी बदली मागितली तर होत नाही चांगल्या विषयाकरीता पण तशाच एका माणसाला मा.आयुक्तांकडे प्रमोशन झाले म्हणुन पाठवून देतात. अशा गोष्टी आपल्या ओ ॲन्ड एम विभागामध्ये घडतात. त्यामुळे माझी विनंती आहे की या डिपार्टमेंट मध्ये एक थर्ड पार्टी माणुस म्हणजे तिऱ्हाईक माणुस, पहिले याचा प्रमुख सचिव होता तो बघायचा, आता कायदा बदलला, सर्व बदलले त्यामुळे सचिव आता बघत नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की सरकार कडुन या क्षेत्रातील चांगला एक माणुस आणला तर निरपेक्ष भावनेने ते काम होईल, मग डिपीसी ची तारीख नीट होईल, विषय नीट होईल, अहवाल नीट होईल, आणि आपल्या कर्मचाऱ्यांचे योग्य प्रमोशन होईल, जेथे आपला स्वार्थ आहे तेथे शासनाचे नियम वापरतो, आणि जेथे आपला स्वार्थ नाही मग तेथे 12/4/1976, आकृती बंध वापरतो. त्यामुळे या सर्व डिसपॅरिटी या विभागात आहे. त्यामुळे माझी आपल्याला जाणिवपुर्वक विनंती आहे की मा.आयुक्तांना आपण सूचना करावी. या विभागात निरपेक्ष असा अधिकारी असावा, येथे जो अधिकारी आहे त्या बद्दल आमचे काही दुमत नाही. पण तेथील जो निरपेक्ष भावना पाहिजे, जो नियम पाहिजे, जो कायदा पाहिजे, शासनाचा, महानगरपालिकेचा कायदा, की 12/04/1976 की आकृतीबंध असतील तो दिसत नाही. 10–10 वर्ष झाले डिपार्टमेंटल इनक्वायरी संपल्या तरी सुध्दा कर्मचारी हेलपाटा मारत आहे. एखादा अधिकारी वाईट वागला असेल, तर त्यांना शिक्षा दिली पाहिजे. परंतु या सर्व गोष्टी वेळेच्या वेळी घडल्या पाहिजे. त्या घडत नाही. त्यामुळे माझी हात जोडुन विनंती आहे. आपल्या माध्यमातुन मा.आयुक्तांना, प्रशासनाला येथे निरपेक्ष भावनेने चांगला अधिकारी असला पाहिजे. कर्मचा–यांना माहिती असायला पाहिजे की 2021 मध्ये माझे प्रमोशन होणार आहे. 2025 मध्ये माझी ही सिनॅरिटी असणार आहे. हे कळले पाहीजे हे आपल्या विभागात  कळतच नाही. त्याचे अनेक कारणे आहे. त्याला आम्हीपण कुठेतरी दोषी असेल, त्यामुळे मी कधी कधी दोषी असेल, पण ही या चुका सुधारल्या पाहिजे, यामध्ये कर्मचाऱ्यांचे नुकसान आहे. आणि जेथे महानगरपालिकेचे पद आहे तेथे महानगरपालिकेचाच कर्मचारी असला पाहिजे. आणि जिथे सरकारचे पद आहे तेथे सरकारचाच कर्मचारी असला पाहिजे. ऐवढीच विनंती आहे.

ॲड.धर्मपाल मेश्राम :– मा.महापौरजी, मी पहिल्यांदा यासाठी येथे उभा आहे की मी सत्तापक्ष नेत्यांचे, मा.जेष्ठ सदस्य श्री.प्रविणजी दटके यांचे, जेष्ठ सदस्य श्री.दयाशंकरजी तिवारी यांचे आणि सर्व सभागृहाचा आभारी आहे. मी निश्चितपणाने श्री.प्रफुल्ल गुडधेजींचे देखील आभारी आहे. पण उभा यासाठी आहे की पहिल्यांदा विधी समिती सोबत हा सामान्य प्रशासन विभाग क्लब केलेला आहे. 1 वर्षाची संधी माझ्याकडे आहे. त्यामुळे जेष्ठ सदस्यांनी माझ्यावरती विश्वास सोपविलेला आहे. त्याच पध्दतीने या विषयावर काम कारण्यासाठी मला संधी देण्यात यावी.

वरील चर्चेनंतर नागपूर महानगरपालिका ठराव क्र. 31 दि. 12/04/1976 नुसार हवालदार वेतनमान (सहाव्या वेतन आयोगानुसार) वेतनश्रेणी  रू. 5200–20200 गेड पे 1900 या पदाला कर संग्राहकर/कनिष्ठ लिपीक/ मोहरीर/मिटर रीडर वेतनमान  रू. 5200–20200 गेड पे 2000 हे पदोन्नतीनचे पद होते.

नागपूर महानगरपालिका ठराव क्र. 31 दि. 12/04/1976 नुसार कर संग्राहक/मिटर रीडर /मोहरीर या पदाला कनिष्ठ निरीक्षक वेतनमान रू. 5200–20200 गेड पे 2400 (सहाव्या वेतन आयोगानुसार) हे पदोन्नतीचे पद होते.

नागपूर महानगरपालिका ठराव क्र. 28 दि. 05/05/2017 नुसार कर संग्राहक/कनिष्ठ लिपीक/मिटर रीडर/मोहरीर/हवालदार/एम.एस.डब्ल्यु/एस.एफ.डब्ल्यु/किटक संग्राहक या पदाचे वेतनमान रू. 5200–20200 ग्रेड पे 1900 (सहाव्या वेतन आयोगानुसार) करण्यात आलेले आहे.

हवालदार या पदाची कर्तव्य व कर संग्राहक/मिटर रीडर/मोहरीर या पदाची कर्तव्य समान असल्यामुळे व वेतनश्रेणी समान असल्यामुळे ज्या प्रमाणे कर संग्राहक/मिटर रीडर/मोहरीर यांना पूढील

पदोन्नतीचे पद कनिष्ठ निरीक्षक आहे त्याप्रमाणेचे हवालदार या पदाला देखील पदोन्नतीचे पद ''कनिष्ठ निरीक्षक '' करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच कनिष्ठ निरीक्षक या पदावर पदोन्नती देतांना कर संग्राहक/मिटर रीडर/मोहरीर यांच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीत ''हवालदार'' या पदावरील कर्मचा–यांना समावेश करून हा ठराव कार्यान्वीत झाल्याचे दिनांकापासुन हवालदार या पदावरील कार्यरत कर्मचा–यांना त्यांचे हवालदार या पदाचे सेवाजेष्ठता क्रमानुसार कर संग्राहक/मिटर रीडर /मोहरीर या पदाच्या संयुक्त सेवाजेष्ठता यादीच्या अंतीम क्रमानंतर समाविष्ट करण्यात येवून कनिष्ठ निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून हवालदार यांना कनिश्ठ निरीक्षक या पदावर पदोन्नती देतांना कॉमन सिनेरेटी लिस्टनुसार देण्यात यावी.या विरोधी पक्षनेते श्री.तानाजी वनवे यांनी केलेल्या सुचनेनुसार हवालदार/ कर संग्राहक/ मिटर रिडर / मोहरीर यांना पदोन्नती देतांना सगळयांना सारखा नियम लावण्यात यावा तसेच स्थापना विभागाकरिता एक चांगला निरपेक्षरित्या काम करणारा अधिकारी षासनाकडून बोलविण्यात यावा. या मा. सदस्य श्री.प्रवीण दटके यांनी केलेल्या सुचनेसह हा विशय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोशणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.मनोज सांगोळे :– मा.महापौरजी, सामान्य प्रशासन विभागाशी सुसंगत एक सूचना आहे की, देशामध्ये रोस्टर पध्दत लागु होणार आहे. ती झाली काय? एक कर्मचारी 7–7 लोकांचे काम करते. त्याचा खुलासा करण्यात यावा. रोस्टर पध्दती लागू झाली किंवा नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :– मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका सभेचे खालील कार्यवृत्त कायम करणे, यामध्ये एक ते दोन फेरबदल आहे. दि.20/12/2018 सर्व साधारण सभा ठराव क्र 311 यामध्ये गणेश टेकडी उड्डाण पुल तोडण्याच्या विषयाला लावण्यात आलेल्या उपसूचनेसह विषय मंजूर करण्यात आला असून कॉम्प्रेहेन्सीव मोबॅलिटी प्लॅन सभागृहाच्या पुढच्या सभेत ठेवण्यात यावा या मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सूचनेसह ठराव मंजूर आहे. उपरोक्त अनुषंगाने महासभेसमोर कॉम्प्रेहेन्सीव मोबॅलिटी प्लॅन सादर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली. मा.महापौरजी हा विषय एकमताने मान्य झाला नाही. त्यामध्ये माझा विरोध नोंदविला होता की, गणेश टेकडीचा जो पुल आहे तो तोडण्यास मी विरोध नोंदविला होता तो नोंदवून हा करेक्ट करण्यात यावा. मा.महापौरजी. दि. 05/03/2019 ची विशेष सभा त्यामध्ये ठराव क्र 364 यामध्ये ओ.सी.डब्लु. चा जो वन टाईम सेटलमेंटचा जो विषय होता त्यामध्ये शेवटचा पॅरीग्राफ आहे. स्थायी समितीने पारीत केलेल्या व ठराव क्र 824 दि. 21/02/2019 अन्वये झालेल्या प्रस्तावास मंजूरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून श्री.प्रफुल्ल गुडधे यांचा या विषयाच्या संदर्भात विरोध दर्शवून या विषयाच्या संदर्भात संपूर्ण ए.टी.आर. हा पुढच्या सभेत ठेवण्यात यावा. या सूचनेसह मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली असे लिहीण्यात आले. माझ्या आठवणीप्रमाणे माझ्यासह कॉंग्रेसच्या सर्व नगरसेवकांनी आपला आक्षेप नोंदविला होता तो नोंदवून हा विषय बहुमताने मंजूर करावा. त्याचप्रमाणे इतिवृत्त कायम करीत असतांना अनेक विषयामध्ये पुढच्या सभेमध्ये अहवाल ठेवण्याचे आपण प्रशासनाला निर्देश दिले, यापैकी किती अहवाल ठेवले आणि पुढच्या सभेमध्ये आपण ठेवणार आहे काय? या संदर्भात आपण प्रशासनाला निर्देश दयावे.

ठराव क्रमांक 404 :– नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका, सभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा. विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे व मा.सदस्य श्री.प्रफुल गुडधे यांनी सुचविलेल्या दुरूस्तीसह खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

दुरूस्ती :– म.न.पा. सर्व साधारण सभा दिनांक 20.12.2018 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त कायम करतांना ठराव क्रमांक 311 मध्ये गणेश टेकडी उड्डाणपुल तोडण्याच्या विषयास मा. सदस्य श्री. प्रफुल गुडधे यांचा विरोध नोंदवून उपरोक्त ठरावास सभागृहाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

दुरूस्ती :– म.न.पा. विशेष सभा दिनांक 05.03.2019 सकाळी 11.55 वाजता चे कार्यवृत्त कायम करतांना ठराव क्रमांक 364 मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातील सर्व मा.सदस्यांचा विरोध नोंदवून ओ.सी. डब्ल्यू.ला थकबाकी प्रदान करण्याच्या संदर्भातील संपुर्ण ए.टी.आर. सभागृहापुढे ठेवण्यात यावा या मा.विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे यांच्या सुचनेसहित ठराव मंजूर करण्यात यावा या सुचनेसह या मा.महापौरजी यांनी

केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने बहुमताने मान्यता प्रदान केली.

1. म.न.पा. विशेष सभा दिनांक 07.12.2018 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. सर्व साधारण सभा दिनांक 20.12.2018 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. विशेष सभा दिनांक 29.01.2019 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
4. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 29.01.2019 सकाळी 11.30 वाजता चे कार्यवृत्त
5. म.न.पा. स्थगित विशेष सभा दिनांक 29.01.2019 दुपारी 12.20 वाजता चे कार्यवृत्त
6. म.न.पा. सर्व साधारण सभा दिनांक 20.02.2019 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
7. म.न.पा. स्थगित सर्व साधारण सभा दिनांक 20.02.2019 सकाळी 11.55 वाजता चे कार्यवृत्त
8. म.न.पा. स्थगित सर्व साधारण सभा दिनांक 26.02.2019 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
9. म.न.पा. विशेष सभा दिनांक 05.03.2019 सकाळी 11.55 वाजता चे कार्यवृत्त
10. म.न.पा. सर्व साधारण सभा दिनांक 20.03.2019 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
11. म.न.पा. स्थगितसर्व साधारण सभा दिनांक 20.03.2019 सकाळी 11.55 वाजता चे कार्यवृत्त

ठराव क्रमांक 405 :– नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे खालील तिमाही अहवाल कायम करण्याच्या प्रश्नाची सभागृहाने नोंद घेतली.

1. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०२–०१–२०१९ रोजी दुपारी ०३–०० वाजता
2. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १४–०१–२०१९ रोजी दुपारी १२–०० वाजता
3. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २५–०१–२०१९ रोजी दुपारी ०३–०० वाजता
4. म.न.पा. स्थायी समिती विशेष सभा दिनांक ३०–०१–२०१९ रोजी सकाळी ११–०० वाजता
5. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०५–०२–२०१९ रोजी दुपारी ०३–०० वाजता
6. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १४–०२–२०१९ रोजी दुपारी ०३–०० वाजता
7. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २१–०२–२०१९ रोजी दुपारी ०३–०० वाजता
8. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २८–०२–२०१९ रोजी सकाळी ११–०० वाजता
9. म.न.पा. स्थायी समिती विशेष सभा दिनांक २८–०२–२०१९ रोजी दुपारी १–०० वाजता

ठराव क्रमांक 406 :– नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.

1. वैद्यकिय सेवा व आरोग्य विशेष समिती
   1. शुक्रवार दि. 08.02.2019 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत
2. विधी विशेष समिती
   1. गुरुवार दि. 14.02.2019 दुपारी 02.00 वाजता चे कार्यवृत
   2. सोमवार दि. 25.02.2019 दुपारी 04.00 वाजता चे कार्यवृत्त
3. शिक्षण विशेष समिती
   1. शुक्रवार दि. 22.02.2019 दुपारी 01.00 वाजता चे कार्यवृत्त

4 गलिच्छ वस्ती निर्मुलन व घर बांधणी विशेष समिती
   1. शुक्रवार दि. 16.02.2019 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त

5 महिला व बालकल्याण विशेष समिती
   1. सोमवार दि. 18.02.2019 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त

6 कर आकारणी व कर संकलन विशेष समिती
   1. गुरुवार दि. 07.03.2019 दुपारी 03.00 वाजता चे कार्यवृत्त

ठराव क्र.407:– नागपूर महानगरपालिकेतर्फे प्राथमिक व माध्यमिक शाळा संचालित केल्या जातात. या शाळांमध्ये गरीब व होतकरू विद्यार्थी शिक्षण घेतात. आजचे युग हे संगणकीय ज्ञानाचे व स्पर्धेचे युग आहे. याकरीता विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणे आवश्यक आहे. मनपाच्या विद्यार्थ्यांना आधुनिक युगात आपले भविष्य घडविण्यासाठी या विद्यार्थ्यांना दर्जेदार व इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून मनपाच्या सर्व 5 ते 10 वर्ग असलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये मागणीनुसार सेमी इंग्रजी विषयाचे वर्ग चालू सत्रामध्ये सुरू करण्यासाठी महासभेपुढे ठेवण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या

आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

महापौर
नागपूर महानगरपालिका,नागपूर